म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ५५८

REFBK-0004612

ग्रं. मं. ठाणे
नोंदी
५५९८

म. मं. ठाणे
ग्रंथ संग्रहालय
अ. नि. नं.
ता. २९।७।३३
ठाणे

# ...न्यायपणा

## कीं

# तुरुंगवास.

लेखक—माधव खंडेराव बागल.

---

**MR. G. K. DEVDHAR, M. A. C. I. E.**
(President Servants of India Society.)—

.........It is a thought provoking book and its read-
g is educative and instructive. You have tried
our best to advocate vigorously therein equality
treatment to women. The history of woman's
osition given by you culled from several sources
English is a very instructive one to the average
der in Marathi and the arguments that you have
rshelled in it bringing home to the readers the
d for equal treatment are very convincing.

# पुस्तकावरील अभिप्राय.

## सारांशानें.

**दिवाणबहादुर प्रो. लठ्ठे,** M. A LL B — " आपलें पुस्तक शेवटच्या प्रकरणांत आपल्या पुस्तकाचें सार दिलें आहे. त्यांत सर्व लेखांतील सांगितलेला उद्देश सफल होणें हिंदुसमाजाच्या उन्नतीस आहे. आपलें प्रतिपादन एकंदरींत अंतःकरणाच्या उमाळ्याचें अस त्याचा वाचकांच्या मनावर चांगला परिणाम होईल."

**प्रो. माधवराव पटवर्धन** M A. ( माधव ज्युलियन )— कायदेशीर दास्यदुर्दशेकडे लक्ष्य वेधणारें आपलें पुस्तक वाचू झाला. तो पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. स्त्रियांची गुलामगिरी आज ती पुरुषजातीला लांछनास्पद आहे व मनुष्यजातीस अपायकारक अ विषयीं शंका नाहीं. ही गोष्ट आपण कळकळीनें व परिणामकारव दाखविली आहे.

**ज्ञानकोशकार डॉ. केतकर**—आपल्या पुस्तकांत अनेक प्र माहिती एकत्रित केली आहे. आपल्या पुस्तकासारखीं पुस्तकें वाचकां व्यापक करण्यासाठीं उपयोगी पडतील.

**र. धों. कर्वे,** M. A –" आपल्या पुस्तकांतील बराच भाग विचार

**S. K KELEOKAR** BAR--AT--LAW:—One cann admire the courage of Madhavarao Bagal in takin most vital yet delicate social question the relation to woman in a frank and outspoken way to the a Indian brought up in the orthodoxy of tra and religion. The angle of vision brought to bear subject by the author will come as a surprise and m the views exposed may cause a shock, yet a little t will soon convince him that we in this country learn at last to view life not in the narrow co tive specified way laid down for us by our prog thousands of years ago, but we must bring to bear on blems a broader outlook more consonant with the stat present day knowledge and more in accordance with principles of justice and love.

**द. वा. तोफखाने संस्थापक विद्यापीठ, कोल्हापूर**–आपलें लग्नबंधन कीं तुरुंगवास हें पुस्तक अत्यंत काळजीपूर्वक वाचून पाहिलें. त्यांतील विचार आपल्या नेहमीच्या वृत्तीला अनुसरून अगदीं सडेतोडपणानें व निर्भीडपणें मांडले गेलेले असले तरी त्यांत कोठेंही सदभिरुचि थोडी देखील सुटलेली नसल्यामुळें व जागजागीं सदसद्विवेकबुद्धीनें पूर्ण अशी स्त्रीजातिविषयक आपली कळकळ अगदीं ओथंबलेली असल्याकारणानें आपल्या या लिखाणाचा कोणत्याही विचारी माणसाला सहानुभूतीनेंच विचार करणें भाग झालें आहे. "वाटेल तो अनाचार करण्याला मोकळीक म्हणजे स्वातंत्र्य नव्हे," या वाक्यानें केलेलें आपल्या स्वातंत्र्यविषयक कल्पनांचें स्पष्टीकरण तसेंच परस्परांतील गुणदोषांकडे न पाहतां केवळ वरून दिसणाऱ्या रूपालाच भुलून लग्नाला उभे राहणाऱ्यांची "पण यौवनाचा भर ओसरल्यावर, प्रेमाच्या वस्तूचा उपभोग घेतल्यानंतर तसें प्रेम, तेंच अगत्य रहात नसतें, या सूचक शब्दांनीं जी कानउघाडणी आपण केली आहे, त्यापेक्षां अगदीं जुन्या वळणाच्या पण अर्थात् विचारवान् माणसाची तरी दुसरी कोणती अपेक्षा असणार ?

"आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांनींही नोकरी करावी, निराळे पैसे मिळवावेत, आपलें हित नवऱ्यापासून निराळें करावें असेंच कांहीं नव्हे" या आपल्या वाक्यांतून ग्रथित झालेली कल्पना कोणालाही आवडावी अशीच आहे. आपत्कालींही स्त्रियांनीं स्वतःच्या पायावर उभे राहण्यास समर्थ नसावें असें इच्छिणारांची केव्हांही कोणाला कींवच येईल.

आपल्या मताअन्वयें 'मातृत्वाचें पवित्र मंदिर अभेद्य करण्यासाठीं' असो, अगर सामान्य जनतेला परिचित असें कौटुंबिक स्वास्थ्य टिकविण्यासाठीं असो; पण लग्नबंधनाबाबत आपण दिलेल्या अंतिम निर्णयामुळें आपण झाडून सर्वांचें प्रियच साधलें आहे. विशेषतः हें बंधन टिकविण्याच्या आड शंकापिशाच्च व सहिष्णुतेचा अभाव ही जोडी कशी येते हें सोदाहरण सांगतांना, ग्रीक लोकांत असलेल्या चालीचा आपण केलेला उल्लेख निखालस हृदयंगम आहे. पुरुषवर्ग इतक्या थोरपणानें जर वागूं लागेल, तर त्याची तितकीच थोर प्रतिक्रिया स्त्रियांवरही झाल्याविना राहणार नाहीं. "स्त्री-पुरुषांच्या आयुष्यांत 'लग्नबंधन' हें चित्र दोघांनीं रंगविण्याचें अस-

त्यामुळें, त्या चित्रावर काळें फांसणाऱ्या गोष्टीस दोघांनींही फार महत्व देतां कामा नये" हें बहारीचें वाक्य आपल्यासारख्या खऱ्या कलावंताच्याच कुंचल्यातून बाहेर निघणारें असून त्यांत लग्नबंधनाच्या नीतीचें सारसर्वस्व सांठविलें आहे असें मला तरी निश्चित वाटतें. खरेंच "लग्नबंधन ही एकच गोष्ट प्रकाशमय झाली पाहिजे." हें चित्र खराब न व्हावें म्हणून उभयतांनींही "क्षुल्लक चुका पोटांत घातल्या पाहिजेत." उभयतांच्या स्वभावांतील भिन्न भिन्न तारा मिळवून त्यांतूनच ऐक्याचा सूर जेव्हां निघूं लागेल तेव्हांच ही लग्नबंधनरूपी वीणा गोड, मंजुळ बोल बोलूं लागेल. कवीचीं हीं सुखस्वप्नें ईशकृपेनें लवकरच फळास येवोत.

---

## "महात्माजींची कामधेनू" वरील अभिप्राय

**तरुण भारत—बेळगांव**—भाषा सोपी आहे. विवेचन मनाला पटेल असें आहे. प्रसिद्ध लेखकांची अवतरणें विखुरलेलीं आहेत. असलें सुंदर पुस्तक लिहिल्याबद्दल श्री. बागल यांचें आम्हीं अभिनंदन करतों.

**कर्मयोगी सोलापूर**—खादीवरील हा एक थोडक्यांत साधार सोपपत्तिक सुटसुटीत असा निबंध होय. पुस्तकांतील विचारसरणी प्रत्येक माणसास पटण्यासारखी आहे.

**दीनबंधु पुणें**—आजपर्यंत महात्मा गांधींच्या खादीबद्दल जितके आक्षेप आले आहेत तितके यांत सप्रमाण खोडून काढले आहेत.

---

चरख्याच्या उपयुक्ततेसंबंधीं कोणाचा कसाही मतभेद असला तरी हें पुस्तक वाचलें म्हणजे तो नष्ट होऊन चरखा चालविणें व वापरणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे अशी खात्री झाल्याशिवाय रहात नाहीं.

—सुबोधपत्रिका.

# लग्नबंधन
## कीं
# तुरुंगवास

नोंद नं. ६८८०८
ठाणे,
सं. ग्रं. नं.
ता. २८/७/३३
ठाणे.

लेखक व प्रकाशक—
माधव खंडेराव बागल

REFBK-0004612

मुद्रक—
वासुदेव नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रेस कोल्हापूर

सन १९३२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४६९८

किंमत ६ आणे.

# अर्पणपत्रिका

माझे स्नेही

श्रीयुत दत्ताजीराव धनवडे ( M B B. S. )

यांनीं सामाजिक व धार्मिक गुलामगिरी फेकून देऊन,

स्वतःच्या कर्तबगारीनें आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झालेल्या

प्रौढ व सुशिक्षित अशा

कु० चंपूताई चव्हाण ( L C P S. )

यांचेबरोबर मिश्र-विवाह करून

पुस्तकांतील अंतिम ध्येय पुष्कळांशीं साधल्यामुळें

अभिनंदनार्थ म्हणून या

—दांपत्यास—

हें पुस्तक अर्पण करीत आहे.

माधव खंडेराव बागल.

४६१८
सं. ... नं. ...
ता. १५/४/३३
ठाणे.

# लेखकाचा खुलासा.



**काय मी पामर जाणे अर्थभेद ।**
**वदवी गोविंद तेचि वदे. ॥**

—तुकाराम.

कोणत्याहि विचारसरणीचा पगडा, मग ती गोष्ट चांगली असो कीं वाईट असो, पुष्कळ वर्षें गेलीं म्हणजे तिला रूढीचें स्वरूप येतें. रूढीमुळें मनामध्यें अंधश्रद्धा उत्पन्न होते. अंधश्रद्धेमुळें चांगलें वाईट निवडण्याची बुध्दि नाहींशी होते. सत्यशोधनाची वृत्ति कमी झाली म्हणजे "बाबा वाक्यं प्रमाणं" मनोवृत्ति बनत जाते. चौकसबुद्धि कमी होईल त्या मानानें तो माणुसकी गमावतो. असा मनानें गुलाम झालेला मनुष्य देहानें सहजच गुलाम होतो.

चांगलें वाईट जाणणाऱ्या बुद्धीलाच आपण सद्सद्विवेक बुद्धि म्हणतों. पण ही विवेचकबुद्धि सभोंवतालच्या वातावरणापासून मिळणाऱ्या शिक्षणावरूनच बनत असते. समाजाचा, परिस्थितीचा, परंपरेचा म्हणजे रूढीचा, तिच्यावर परिणाम होऊन ती संशयाच्या बुचकळ्यांत पडते. फार काय, वाईट गोष्टी मनाला पटल्या तरी, संवयीमुळें त्या टाकून देण्याचें धाडस होत नाहीं. भूतदयेला किंवा सर्वसाधारण नीतीला सुटून असलेल्या गोष्टीसुद्धां सोडण्याची भीति वाटते.

या पापी रूढींनाच आज धर्माचें स्वरूप आलें आहे. याच धर्माच्या पांघरुणाखालीं विषमतेनें आपले पाय पसरले आहेत. झाडाच्या मुळ्या-प्रमाणें ते पाय सारखे वाढत आहेत. त्या निर्जीव करावयाच्या तर अंध-श्रद्धेला पाणी पुरवणें बंद केलें पाहिजे. अंधश्रद्धाच रूढीचें रूप धारण करून सत्याची निर्मल गंगा गढूळ करीत असते. म्हणून जनतेनें राजहंसा-प्रमाणें गढूळ झालेलें पाणी एकीकडे करून सत्याची निवड केली पाहिजे.

आणि याच मनोवृत्तीनें वाचकांनीं लेखकाच्या विचाराकडे पहावें अशी त्यांना नम्र प्रार्थना आहे. लेखकानें जात्यभिमान टाकूनच लेखणी उचलली आहे व ही वृत्ति कायम ठेवण्याचा लेखकाचा निर्धार आहे.

"नव्या पिढीचें राजकारण" या पुस्तकाचा स्वीकार बहुतेक मराठी-पत्रांनीं माझ्याविषयींची जातिभावना टाकून स्वच्छ मनानें केला आहे. तीच मनोवृत्ति हें पुस्तक वाचतांनाही वाचक ठेवतील अशी आशा आहे. लेखकाच्या लेखणीचा आघात जरी एखाद्या वर्गावरती झाला असेल, तरी तो सत्यशोधनामुळें झाला आहे. एवढें समजण्याचें औदार्य वाचकांनीं ठेवावें.

असो, पुढील विचार स्वतःला जीं मतें पटलीं आहेत, आवडलीं आहेत, त्याला अनुसरून तीं जनतेपुढें मांडलीं आहेत. सत्याला स्मरून लिहिल्यामुळें जनतेनें तिचा आदर केला किंवा अनादर केला तरी त्यांत खऱ्या गोष्टी असतील तर त्या केव्हांही टिकतील, म्हणून स्तुतिनिंदा 'सत्य' देवालाच लेखकानें अर्पण केल्या आहेत.

मज हंसतील लोक। परि मी गाईन निःशंक
तुझें नामीं (सत्य) मी निर्लज्ज। काय जनासवें काज."

—तुकाराम.

# लग्नबंधन कीं तुरुंगवास?

## प्रकरण पहिलें

### रानटी मनुष्य.

" Of all the evils for which man has made himself responsible none is so degrading so shocking, so brutal as his abuse of the better half of humanity —*M. K. Gandhi.*"

" आतांपर्यंत केलेल्या सर्व पापांत अधिक हीन अधिक क्रूर व अधिक भयानक अशा कोणच्या पापांबद्दल पुरुषवर्ग अधिक जबाबदार असेल तर तो आपल्या अर्धांगावरच्या अन्यायाबद्दल होय.—महात्मा गांधी.



धर्माची, सत्तेची व पोटाची गुलाम

एक काल असा होता कीं, त्या वेळीं मनुष्य पशुपक्षाच्या व जनावरांच्या संगतींत दिवस काढीत होता. वानराप्रमाणें झाडाची ढोली हें त्याचें घर होतें. विनासायास मिळणाऱ्या वस्तूंवर तो उपजीविका करीत होता. झाडास लागलेलीं आयतीं फळें, सहजीं सांपडणारीं कंदमुळें व दृष्टीच्या टापूंत आढळणारीं पांखरें, व जनावरें यांवर तो आपली भूक भागवत होता.

नेहमींच इच्छा होईल त्यावेळीं बसल्या-जागीं फळें किंवा धान्य मिळत नाहीं. हंगामाखेरीज फळें मिळत नाहींत. कष्टा-खेरीज धान्य मिळत नाहीं. ज्या वेळीं भूक लागेल त्यावेळीं मिळण्याजोगीं म्हणजे जनावरेंच होत. त्यांना धरून बांधून घालणें व वेळ पडेल त्यावेळीं मारून खाणें, अधिक सोईचें वाटल्यानें गुरांना धरून आणून बाळगण्याचा परिपाठ सुरू झाला.

## कळप व समाज.

पुष्कळ जनावरांत, एका ठिकाणीं कळप करून राहण्याची बुद्धि असते. कळप झाल्यानंतर त्यांत एक म्होरक्या होतो. त्या कळपाच्या संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर पडते. एका गाईच्या खिल्लारांतील वळू दुसऱ्यावर चाल करून जात असल्याचें आपल्याला नेहमीं पाहाण्यास सांपडतें. Man is a social animal

मनुष्य हाहि सहवासप्रिय आहे. तेहि पुढें पुढें एका ठिकाणीं राहूं लागले. त्यांचा समाज बनूं लागला. ते सोईप्रमाणें ठिकठिकाणीं वस्ती करूं लागले. एके ठिकाणीं राहूं लागल्यानंतर त्यांच्यांत साहजिकच संघटना व एकी उत्पन्न झाली. ते एकजुटीनें आपलें संरक्षण करूं लागले. धान्य पिकवण्याची माहिती झाल्यानंतर सामुदायिक कोठारें झालीं. पण त्याअगोदर पोटासाठीं जनावरांचे सामुदायिक गोठे बांधावे लागले. त्यांची काळजी घ्यावी लागली. अशा प्रकारें पाळलेलीं जनावरें, त्यांना वाटेल तेव्हां भूक शमवण्यास उपयोगीं पडूं लागलीं.

## समाज व गोठा.

सामुदायिक गोठे परिपाठांत आल्यानंतर त्या माणसांच्या कळपांतील म्होरक्याचें नांव त्या गोठ्याला पडूं लागलें. तो 'गोठा' त्या मुख्याच्या म्हणजे म्होरक्याच्या नांवानें ओळखूं लागला. सामुदायिक मालकी, सामुदायिक सत्ता व समता या गोठ्यांत नांदत होती. उच्च नीच भेद नव्हता. त्या गोठ्यांतील' सर्व स्त्रीपुरुष एकाच दर्जाचे मानले जात होते. पुरुषाची, सत्ता स्त्रीवर, तशीच स्त्रीची पुरुषावर सारखीच चालत होती. त्यांच्यामध्यें ताबेदारीचे संबंध नव्हते. ऋग्वेदांतील कांहीं मंडळांत स्त्रिया पुरुषांशीं फारच उघड्या मनानें व स्पष्ट शब्दांनीं बोलत असल्याचें दिसतें. इतकें कीं, ती भाषा पुस्तकांत वापरणें अशक्य आहे. इंद्राणी इंद्रास, कक्षीवानाची कन्या घोषा अश्वीस फारच स्पष्ट भाषेंत आळवते. यावरून मर्यादेचा आडपडदा त्यावेळीं मुळींच नसावा असें वाटतें. परस्परांच्या इच्छे-प्रमाणें त्यांचे शरीरसंबंध होत. जुलुम, सक्ती, मालकी, निर्बंध या गोष्टी अद्याप गोठ्यांत शिरल्या नव्हत्या. स्त्री—पुरुष—सहवासांपासून होणारें मूल हें अर्थात् स्त्रीचें समजलें जात होतें. कारण गोठ्यांतील स्त्री, ही कांहीं

एकाच्या मालकीची समजली जात नव्हती. व्यक्तीच्या मालकीची कल्पना गोठ्यांतील समसमान हक्काच्या माणसावर चालणें शक्य नव्हतें. अशा-प्रकारचे समाज आतापर्यंत हिमालयाकडील तिबेटांत, तसेंच सिलोन–सिंहलीज जातींत आहेत. बायका व पुरुष त्या समाजांत इच्छेप्रमाणें वाटेल त्या स्त्रीशीं व स्त्री वाटेल त्या पुरुषाशीं सहवास करूं शकतात व ती गोष्ट अनीतीची समजली जात नाहीं असें म्हणतात.

## मालकीची कल्पना.

जनावरांचे कळप सामुदायिक झाले. पण जनावरांची राखण करणें व तीं पकडून आणणें या गोष्टी सर्व समाज एकाच वेळीं कांहीं करत नव्हता; तेव्हां धरून आणलेलें जनावर हें आपलें, आपल्या 'मालकीचें' ही स्वार्थी कल्पना डोक्यांत खेळूं लागली. राखतांना सुद्धां 'हें माझें' जनावर ही भावना येऊं लागली. गोठ्यांतील जनावरें सर्वांची, पण धरून आणलेलें 'आपलें' होऊन समाईक गोठ्यांत, मालकीच्या जनावरांचा भरणा होऊं लागला. हा परिपाठ पडतां पडता, मालकीचें जनावर असणें ही कल्पना रुजूं लागली. स्वार्थाच्या कल्पनेनें डोक्यांत ठाणें दिल्यानंतर ती एका जागेवर केव्हांच खिळून राहिलेली नाहीं. तिची वाढ होत गेलेली आहे.

## गोठा व गोत्र.

गाय, घोडा, बैल, कुत्रीं, मांजरें स्वतःचीं असणें ही वृत्ति वाढत गेल्या-नंतर स्त्री ही आपली असावी, तिच्यावर आपली सत्ता असावी, आपल्या इच्छेप्रमाणें तिनें वागावें, तीही आपली उपभोग्य वस्तू असावी असें वाटणें स्वार्थाच्या वाढीला धरूनच आहे. पण एकाच गोठ्यांतील स्त्रीवर मालकी सांगणें शक्य नव्हतें. ही गुलामगिरी बरोबरच्या नात्यानें वागत असलेली गोठ्यांतील स्त्री कशी कबूल करणार? तेव्हां मालकीची स्त्री पाहिजे असल्यास त्यानें दुसऱ्या गोठ्यांतील स्त्री आणावी व मग तिला आपली म्हणावी, तिच्यावर सत्ता गाजवावी, ही कल्पना "गोठ्याला" पटली.

एका गोठ्यांतील स्त्रीवर पुरुषानें मालकी सांगायची नाहीं, तर मालकीसाठीं दुसऱ्या गोठ्यांतील स्त्री आणावी ही चाल अद्याप हिंदु समाजांत राहिलेली

आहे. गोठा या शब्दापासूनच 'गोत्र' हा शब्द आला आहे. एका गोठ्यांतील म्हणजे एका 'गोत्रांतील' स्त्रीशीं लग्न करण्यास धर्मानें मनाई केली आहे. त्याला कारण हीच मूळची परंपरा दिसते.

## राक्षसविवाह.

दुसऱ्या गोत्रांतील म्हणजे गोठ्यांतील स्त्री आणावयाची तर आपखुषीनें दुसऱ्याची गुलाम होण्याला ती येणें शक्य नाहीं; तेव्हां तिला पळवून, जबरदस्तीनेंच आणणें भाग होतें. याच जबरदस्तीच्या पद्धतीला 'राक्षसविवाह' म्हणतात. कारण या विवाहपद्धतींत हिंसेचाच सर्व प्रकार आहे.

" हत्वा छित्वा च भित्वा च क्रोशन्तीं रुदतीं गृहात् ।
प्रसह्य कन्याहरणं राक्षसो विधिरुच्यते ॥ —( मनुस्मृति. )

प्रतिबंध करणाऱ्या कन्येच्या आप्तांस मारून, तोडून व त्यांचीं मस्तकें फोडून आक्रोश करणाऱ्या कन्येस घरांतून बलात्कारानें नेणें यास राक्षसविधि म्हणतात.

## राक्षस विवाहाचे अवशेष.

या राक्षसी विवाहपद्धतींचा अवशेष आजच्याहि लग्नपद्धतींत राहिलेला आहे. लग्नसमारंभांत नवऱ्याचे हातांत सुरा किंवा तलवार धरण्याची वहिवाट, लग्नप्रसंगीं होणारे बंदुकींचे बार, ही चाल विवाहप्रसंगीं पूर्वी शस्त्रांचा होणारा उपयोग दाखविते. वरातीनंतर नवरी वराच्या घरीं उतरतांना तिला कडेवरून आणण्याची चाल आहे. याचा अर्थ हाच कीं, ती मुलगी स्वखुषीनें घरांत येत नाहीं. आपणहून दुसऱ्याच्या गोठ्यांत येत नाहीं. तेव्हां तिला बळजबरीनें उचलून आणावयाची. नंतर नवरी उंबरठ्यांत पाऊल टाकण्याअगोदर, तिच्याकडून धान्याचें भांडें लाथाडण्यांत येतें. याचा अर्थ हाच कीं ती नवऱ्याच्या घरीं हातपाय झाडत येते. तिच्या संमतीनें विवाह झालेला नसतो. पाश्चिमात्यांच्यांतहि ही राक्षसविवाहाची पद्धत प्रथम होती. "Rape of Sabines" 'सॅबीनवरचा बलात्कार' हें त्याचें एक प्रसिद्ध उदाहरण आहे.

" Marriage by capture has existed both among Semitic and Indo-European peoples. " —*Marriage--Westermarck:*

' सेमिटिक व इंडो–युरोपियन वंशांत राक्षसी विवाहाची चाल होती.' आस्ट्रेलिया व हाय अल्बेनिया भागांत ही अद्याप दिसून येते. पूर्वी ग्रीसमध्यें ही चाल सर्रहा होती.

## कुटुंबाची स्त्री.

मालकीची कल्पना रुजली खरी; पण तिची वाढ व्यक्तीच्या मालकींत एकदम झाली नाहीं. दुसऱ्या गोत्रांतील मुलगी पळवून आणायची तर तें एकट्या दुकट्याचें काम नव्हे. या लुटीसाठीं जवळच्या नातेवाईकांना गोळा करावें लागे. तेव्हां नातेवाईकांच्या मदतीनें आणलेली स्त्री पळवून आणण्यास मदत करणाऱ्या सर्व नातेवाईकांची ती झाली. म्हणजे एका एका कुटुंबाची मालकी स्त्रीवर चालूं लागली. पुढें वेळोवेळीं अशी लूट झाल्यानें एक एक घरांत एक स्त्री पडूं लागली. पांच पांडवांत एक स्त्री हें या चालीचें ठळक उदाहरण आहे.

## इस्टेटींत जमा.

(धनाची लालसा व सत्तेची अभिलाषा वाढत गेल्यानंतर, स्त्री आपल्या व्यक्तिविषयक मालकीची असावी, तिजवर आपली संपूर्ण मालकी असावी, आपलें पडेल तें काम करण्याला, आपली विषयलालसा अनिर्बंधित भोगण्याला हक्काची स्त्री असावी म्हणून स्त्री गुलामाच्या मालिकेंत येऊन बसली.

स्त्रीची जमा उपयुक्त वस्तूंमध्यें होऊं लागल्यानें स्त्रिया, मुलें, ढोरें एकाच सदरांत आलीं. इतर वस्तूंना जसें स्वतंत्र अस्तित्व नसतें, तसेंच स्त्रीचेंहि नाहींसें झालें. तिच्या व तिच्या मुलांच्या मिळकतीवरची मालकी नष्ट झाली. धनोत्पादनाचीं तीं साधनें झाली.)

मनुस्मृतिकार म्हणतातः—

" भार्या, पुत्र व दास हे तिघेहि धनशून्य असतात. यास्तव ते जें कांहीं मिळवतात तें धन ज्याचे ते असतील त्या धन्याचें होय. "

ऋग्वेदांतहि याच कल्पनेला दुजोरा मिळतो. म्हणजे स्त्री, मूल व धन या गोष्टी संपत्तींत मोडूं लागल्या. युरोपमध्येंहि पूर्वी हीच स्थिति होती. रोमन कायद्यानें स्त्रीच्या व मुलाच्या जीवितत्वावरहि पुरुषाचा हक्क मान्य केला होता.

वरील मनुस्मृतींतील आज्ञेबरहुकूम युरोपांतहि कायदा होता हें पाहून पुरुषाची मनोवृत्ति कशी चहूंकडेच स्वार्थानें प्रवृत्त झालेली होती हें पाहण्याजोगें आहे. अधिक मुलें, अधिक स्त्रिया वाढतील त्या मानानें पुरुषाची सत्ता वाढूं लागली. तितके सेवक वाढले, उत्पन्न वाढलें. राजसत्तेचा उगम हीं याच वृत्तींतून निर्माण झाला आहे.

## सत्तेची गुलाम.

(स्त्रीवर अशी सत्ता गाजवण्यापूर्वी तिला आपल्या इच्छेप्रमाणें दुसऱ्या कोणाहि पुरुषाशीं सहवास करणें तिच्या मर्जीची गोष्ट होती. पण हा तिचा हक्क, गुलामगिरीच्या पद्धतीनें हिरावून घेतला. भीतीमुळें, बळजबरीनें, सत्ता उपभोगणाऱ्या पुरुषाबरोबरच तिला नांदावें लागे. एखाद्या विशेष सुंदर स्त्रीबद्दल पुरुषापुरुषांत भांडणें, कलह, मारामाऱ्या, खून, रक्तपात होत, पण शेवटीं स्त्री ही त्या विजयी पुरुषाच्या वाट्याला जाऊन त्याची गुलाम होई. म्हणजे स्त्री ही कुणाच्या तरी मालमत्तेंत जमा होऊं लागली.)

## मनाची गुलाम.

अशा प्रकारें सत्तेच्या बळावर स्त्रियांचें स्वातंत्र्य नष्ट केल्यावर, सत्तेला कायमपणा यावा, नेहमींच सत्तेचा उपयोग करण्याची जरूरी पडूं नये, स्त्रियांच्यावर प्रत्यक्ष देखरेख व पाळत न ठेवतां, त्या कसलाहि प्रतिकार न करतां, मालकाच्या घरीं रहाव्यात म्हणून कांहीं युक्ति डोक्यांतून काढावी लागली. समाजांत कांहीं जसे देहानें बलवान् असतात तसे कांहीं बुद्धीनें चाणाक्ष असतातच. त्यांनीं स्त्रिया मनानें गुलाम व्हाव्यात म्हणून आपलें डोकें खर्चलें. मनामध्यें भीति उत्पन्न करण्याला दुसरा कांहीं आधार लागतोच; तो देवबापाचा आधार त्यांना सहज मिळाला. चंद्र, सूर्य, तारे, वीज, पर्जन्य अशा सृष्टींतील चमत्कारांना देव मानून धावा करण्याची मनोवृत्ति

पुरातन कालापासून चालत आलेली आहे. ऋग्वेद या गोष्टींनीं भरला आहे. तेव्हां या देवाचा आधार घेऊन, भीति दाखविणें सोपें झालें. दगडाचा देव उभा करून त्याच्या न बोलत्या तोंडांत वाटेल ते विचार कोंबतां आले.

## धर्माचा आधार.

आपल्याला सुचतील असे विचार पद्धतशीरपणें मांडून त्याला धर्मग्रंथ हें नांव दिलें. व त्या ग्रंथाची आज्ञा मोडणाऱ्यांना देवाच्या हुकुमानें नरकांत ढकलण्याची धमकी दिली. अशाप्रकारें स्त्रियांना व मुलांना धर्माज्ञेनें बांधून टाकलें. हें स्वार्थनीतीला धरूनच आहे. असा धर्माचा आधार पुरुषवर्गानें चहूंकडेच घेतला आहे.

या नीतीला धरूनच मनुस्मृतिकारांनीं पुरुषाची सत्ता अबाधित राहील अशी चोख व्यवस्था करून ठेवली आहे. त्यांची बुद्धिमत्ता व आपले विचार पद्धतशीर मांडण्याची शैली जगांतील मोठमोठ्यांनाहि खालीं पहाण्यास लावील. (स्त्रियांना डोकें वर काढण्याची संधि मनुस्मृतिकारांनीं ठेवली नाहीं. ते म्हणतात—

" आतां स्त्रियांचे धर्म सांगतों ते ऐका. बाल्यावस्थेंत पित्याच्या आधीन रहावें, तरुणपणीं पतीच्या आज्ञेंत असावें व पति मरण पावल्यानंतर पुत्राच्या संमतीनें चालावें. पण स्त्रीनें कधींहि स्वतंत्र होऊं नये. पति सदाचारशून्य असो, तो कसाहि जरी असला तरी साध्वी स्त्रीनें देवाप्रमाणें त्याची सेवा करावी."

यापेक्षां आणखी अधिक पक्षपात कुठें सांपडेल? याच धर्मग्रंथाचा वारसा हिंदुकायद्यानें आपल्याकडे घेतला आहे.)

## गुलामगिरीचा छाप.

(स्त्रियांना सत्तेचे गुलाम केल्यानंतर त्यांना मनाच्या गुलाम बनवल्या. आतां यापुढें आपण गुलाम आहोंत, आपल्याला स्वातंत्र्य नाहीं, आपण नवऱ्याशीं मनानें, देहानें, बुद्धीनें बांधल्या गेलों आहोंत ही भावना सारखी



मनाची गुलाम

जागृत रहावी म्हणून त्यांच्या देहावर कांहीं गुलामगिरीचीं चिन्हें लादण्यांत आलीं. अमकी स्त्री आतां दुसऱ्याची झाली आहे, तिच्यावर आतां दुसऱ्याला कुणाला हक्क सांगतां येणार नाहीं हें लोकांना समजण्याकरितां कांहीं चिन्हें हुडकून काढलीं.

इंग्लडमध्यें सहाव्या एडवर्डच्या अमदानींत १५४७ सालीं, गुलामांना ओळखण्याकरितां त्यांच्या कपाळावर किंवा पाठीवर अक्षरें डागून काढण्यांत येत असत. गळ्यांत, व पायांत लोखंडी वेड्याहि टोकत. त्यामुळें मालकाला आपला गुलाम कोणचा तें समजणें सोपें होई.

हेंच तत्व आम्ही स्त्रियांच्या बाबतींत उचललें असावें असें दिसतें. लग्न झाल्यानंतर, म्हणजे स्त्री पुरुषाची गुलाम झाल्यानंतर लोकांना कळावें म्हणून गळ्यांत मंगळसूत्र, नाकांत नथ, कानांत बुगड्या, हातांत कांकणें, पायांत जोडवीं, कपाळाला कुंकू अशीं कमजास्त चिन्हें लावून त्याला सौभाग्य अलंकार असें संबोधण्यांत आलें. रुढीला पुढें धर्माचें स्वरूप येत असतें, त्याप्रमाणें या पवित्र धार्मिक गोष्टी झाल्या आहेत. या बाबतींत अभद्र बोलणें पाप झालें आहे. (पुरुषांनीं पसरलेल्या या जाळ्यांत स्त्रिया आज स्वखुषीनें येऊन पडतात.)

राजकीय धोरणांतहि हीच गोष्ट, हेंच तत्व दिसून येतें. प्रथम सत्तेच्या जोरावर देश जिंकायचा, नंतर राजाबद्दल भक्ति उत्पन्न करायची. आपल्याला

पाहिजे तशी शिक्षणपद्धति आंखून देऊन त्यांना बौद्धिक गुलाम बनवायाचे आणि नंतर त्यांना पदव्या दान देऊन कायमचें बांधून घ्यायचें! पुरुषसम्राटांनीं आपल्या स्त्री प्रजेवर हाच प्रयोग अमलांत आणून त्यांना बंदे गुलाम बनवलें आहे.

## स्त्रियांची विक्री.

'राक्षसी विवाह रूढ झाल्यानंतर पुढें लग्नाला देवघेवीचें स्वरूप येऊं लागलें! समाजांतील लुटालुटीचे प्रकार कमी झाले. पण स्त्री ही एक इस्टेटच समजली गेल्यामुळें, लुटीच्या जबरदस्तीच्या ऐवजीं, उपयोगाची वस्तू म्हणून तिला विकत घेण्यादेण्याचा परिपाठ सुरू झाला. पैशाच्या रूपानें देवाणघेवाण सुरू झाली. त्यांत इतर जिनसाबरोबर स्त्रीची विक्री होऊं लागली. तक्षशिला नगरींत तरुण स्त्रिया बाजारामध्यें विकावयास आणीत व जो अतिशय किंमत देईल त्यास विकल्या जात असें ग्रीक इतिहासकारांनीं लिहून ठेविलें आहे. पांडूचा विवाह, भीष्मानें माद्रीला विकत आणूनच लावलेला आहे. पुरुष आपल्या बायकांचें गुणवर्णन करून तिची योग्यता पटवून देत व तिची किंमत वाढवत, असा स्त्रियांच्या विक्रीचा प्रकार भूतानच्या भागांत आज चालू आहे असें म्हणतात. द्यूत खेळतांना इतर मालकीच्या वस्तू हरल्यानंतर द्रौपदीला पणाला लावल्याचें उदाहरण सर्वांना माहीत आहेच.

अशी विक्रीची पद्धत रूढ झाल्यानंतर बापाला आपली मुलगी चांगल्या ठिकाणीं पडावी, घर श्रीमंताचें, सुखवस्तूचें मिळावें—म्हणून मुलाचे बापास पैसा देणें म्हणजे हुंडा देणें सुरू झालें. असें राक्षसी विवाहाचें रूपांतर होत होत तें आजच्या हुंडापद्धतींत येऊन थडकलें आहे.)

# प्रकरण दुसरें.

## नीतीच्या भिन्नभिन्न कल्पना व भिन्न रूढी



"नीति ही कल्पना सापेक्ष आहे, तिचे सिद्धांत कालस्थलाबाधित नाहींत. परिस्थिती-प्रमाणें मनुष्याच्या नीतिविषयक कल्पनांत इतका फरक पडतो कीं, आजची नीति उद्या अनीति ठरते. नीति आणि अनीति या केवळ समजुतीच्या गोष्टी आहेत. या नीतीच्या एकाच मापानें सर्वांना सर्रहा मोजण्याचा हक्क आपणास नाहीं."

—विवेकानंद.

It is sheer bigotry to contend that any people were immoral because there rules have differed from our own.

—*E. H. Halderman Julias.*

नीतीच्या कल्पना चहूंकडे सारख्या नाहींत. स्त्री ही पुरुषाची गुलाम मग ती एका पुरुषाची असो किंवा अधिक पुरुषांची असो. देशपरिस्थिती-प्रमाणें यांत फरक पडलेला दिसतो.

रामाचें एकपत्निव्रत, श्रीकृष्णाच्या सोळासहस्त्र नारी तर दुसरीकडे पांच पांडवांतील द्रौपदीचें उदाहरण आपल्याच देशांतील निरनिराळया चाली दाखवतात.

आफ्रिकेमध्यें अनेकपत्नित्वाची चाल परमावधीला गेलेली आढळते. तेथील बेनिनच्या राजाच्या बायकांची मोजदाद ४००० पर्यंत गेली आहे. अशांति प्रांतांतील कायद्यानें राजांच्या बायकांची मर्यादा ३३३३ चे पुढें वाढूं नये अशी मर्यादा घातली आहे. युगांदाचा राजा टेसा व लोंगोचा राजा यांच्या बायकांची संख्या ७००० पर्यंत पोचली होती. तसेंच प्रसिद्ध सालो-

मन या ऐतिहासिक व्यक्तीच्या बायका ७०० राजकन्या असून त्याखेरीज ३०० रखेल्या होत्या. जोधपुरच्या राजाची अगदीं अलीकडची गोष्ट. महाराज वारल्यानंतर त्यांच्या ४००० स्त्रिया असल्याचें दिसून आलें. हैद्राबादच्या राजाचाही असाच तांडा आहे म्हणतात. एकपत्निव्रताची चाल असलेल्या लोकांना या उदाहरणानें गारठाच येईल. कांहीं लोकांत तर अशी चाल आहे कीं, लग्न झाल्याबरोबर खंडणी म्हणून आपल्या राजाकडे आपली बायको प्रथम धाडायची! फ्रेंच क्रांतीपर्यंत युरोपमध्यें कित्येक सरदार या हक्काबद्दलची म्हणून खंडणी वसूल करीत. लडिया प्रांतांतील मुली आपल्या लग्नाचा खर्च अगोदर स्वतःचा देहविक्रय करून मिळवीत.

जी गोष्ट आपल्या कल्पनेलाहि कशीशीच वाटते ती एखाद्या देशांत पूर्ण रुढ झालेली असते. हिंदुस्थान देशांतच आजसुद्धां कितीतरी विचित्र चाली चालू आहेत.

एका स्त्रीनें अनेक पति करण्याची चाल चंद्रवंशी आर्यलोकांत होती असें म्हणतात. तशी माहिती महाभारतांत आढळते. हिमालयांतील पहाडी लोकांत व काश्मीरकडील भागांत ही चाल अद्याप आहे. सर्व भावांत एक बायको व त्या बायकोचीं मुलें वडील भावाचीं समजण्यांत येतात. आसामकडेहि ही चाल आज अस्तित्वांत आहे. ऋग्वेदकालीं भावाबहिणींचींहि लग्नें होत असत. “ यम म्हणतो जेव्हां भाऊ बहिणीशीं लग्न करीत नाहींत असा आतां पुढील काल येत आहे ” ( ऋग्वेद मंडळ १० ). यावरून ही पद्धत त्यावेळीं परिपाठांत होती हें स्पष्टच आहे. मुसलमान समाजांत चुलत बहिणींशीं लग्नें आजहि लावून घेत असतात.

राजे लोकांत भावाबहिणींची लग्नें करून घेण्याची प्रवृत्ति झालेली दिसते. आपल्या राज्याचा उपभोग दुसऱ्यास घेतां येऊं नये या स्वार्थानें अशीं लग्नें कुठें कुठें झालेलीं दिसतात. अथेनियन व सेमेटीज लोकांमध्यें अशीं लग्नें झालीं आहेत. अब्राहामनें आपली सावत्र बहीण सॉरा इजबरोबर लग्न लावलें आहे. पण ही चाल आतां मोडत आलेली आहे. ती मनुष्यस्वभावाला अनुसरूनच मोडत आली आहे.

ज्यावेळीं इतराशीं संबंध वाढलेला नव्हता. व्यवहार संकुचित होता, त्यावेळीं आपआपसांतील संबंधांतच लग्न करणें भाग होतें. पुढें व्यापार वाढल्यानंतर इतर समाजाशीं दळणवळण सुरू झालें. त्याबरोबर दुसऱ्या स्त्रियाशीं लग्नें सुरू झालीं. केव्हांही नेहमींच्या वसतींतील स्त्रीपेक्षां अनोळखी स्त्रीवरच साहजिक मनुष्याचें लक्ष वेधतें. यामुळें साहजिकच भावाबहिणींचीं लग्नें कमी कमी येत आलीं असावीं. कामुकांची इच्छा परक्याकडेच प्रथम धांव घेते. तसेंच एकाच घराण्यात संबंध होत गेले तर त्या त्या घराण्यांतील शारिरिक दोष त्या पिढींत येत जातात असें शास्त्रज्ञ म्हणतात.

स्त्री ही पुरुषाची सुखभोगाची ठरल्यानंतर एखादी सुंदर वस्तू पाहुण्याला देण्यांत अभिमानच वाटतो, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत व युरोपांत असा पाहुण्यांचा सत्कार कांहीं जातींत होत होता. मद्रासकडील कांहीं जातींत आजहि हा प्रकार आहे म्हणतात. "नॅसमोनियन जातींत लग्न झाल्यानंतर नवरीनें सर्व आतिथ्यांचा सत्कार असाच करण्याचा प्रघात आहे." (डॉ. इव्हान ब्लॉश) तिबेटकडे लग्नापूर्वीं पुरुषाशीं समागम घडला नाहीं अशा स्त्रीशीं लग्न करूं नये अशी रुढी आहे. नायर जातींत लग्नाचे 'तालिकेट्टु व संबंधम्' असे दोन प्रकार आहेत. एक मंगळसूत्राचा औपचारिक धनी व दुसरा देहाचा धनी असे दोन नवरे असतात. हे 'संबंधम्' विवाहाचे नवरे नंबुद्री ब्राह्मणांतले असतात. कारण नंबुद्री जातींत फक्त वडील मुलग्यालाच लग्न करण्याचा हक्क असतो. यामुळें इतर धाकटे बंधूचे नायर शूद्र स्त्रीशीं 'संबंधविवाह' होत असतात. अलजेरिया प्रांतांत शेतहंगामाच्या सणांत पुरुष एकमेकांच्या बायकांशीं आवडीप्रमाणें समागम करतात व या गोष्टीला या सणापुरती धर्मानें परवानगी दिली आहे. "बॅबिलानमध्यें प्रत्येक स्त्रीला व्हीनस देवीच्या देवळांत आयुष्यांतून एकदां परपुरुष सहवास करावाच लागत असे" (डॉ. फोरेल.) अशाच प्रकारची चाल अमृतसरकडील एका प्रख्यात देवालयांत आज चालू आहे असें कांहीं प्रवासी सांगतात. आफ्रिकेंत व आस्ट्रेलियांतील कांहीं प्रांतांत लग्नानंतर कांहीं दिवस स्वतःची स्त्री इतर स्नेहासोबत्यांकडे पाठवण्याची रुढी आहे. आयर्लंडमध्येंही असाच प्रकार

चालू होता. लोब्रियांद ग्रेटांत व इतर कांहीं जातींत मूल हें देव देत असतो असें समजल्यामुळें त्यांत पापापुण्याचा विचार येत नाहीं. वाईट धंदा करून म्हणजे देह विकून पैसे मिळवणाऱ्या स्त्रियांचा धंदा जपानमध्यें कमीपणाचा समजला जात नसल्यामुळें, अशा स्त्रिया मोठमोठ्या उमरावाशींहि सहज लग्न करूं शकतात. व त्यांत त्यांनाही कसला कमीपणा वाटत नाहीं. अशी ही उदाहरण मालिका आणखी पुष्कळ वाढवतां येईल.

## धर्म व परिस्थितीचा परिणाम.

एक पत्नी, एक पति, अनेक पत्नी व अनेक पति ( Monagamy: polygamy, polyandry ) अशा चाली समाजांत रूढ होण्याला तशीच परिस्थिति कारण होत असते. तसेंच ज्या लोकांत जो धर्मसंस्थापक झाला असेल त्याच्या विचाराचा पगडा त्या लोकांवर पडलेला आहे, आर्थिक परिस्थितीचाहि परिणाम लग्नसंबंधावर नेहमीं होत असतो.

सुबत्ता असल्यास अधिक बायका करण्याकडे प्रवृत्ति होते. " It was long regarded almost as statistical axiom that the number of marriages varies inversely with the price of corn (Westermarck ) धान्याचे महागाईत लग्नाचें प्रमाण कमी व स्वस्ताईत जास्त होत असल्याचें आढळलें आहे. म्हणजे आर्थिक स्थितीचा परिणाम लग्नसंस्थेवर कसा होत असतो हें दिसून येतें.

आपला पंथ अधिक वाढावा, धर्माचा प्रसार अधिक होऊन एकनिष्ठ अनुयायी वाढावेत, म्हणूनहि अनेकपत्नित्वाची चाल पडली आहे. महमदीधर्मानें अनेकपत्नित्वास परवानगी देण्यांत हें एक कारण असावें असें दिसतें. दुसऱ्या धर्मातील लोकांच्या बायका करून त्यांना आपल्या जातींत घेतल्या म्हणजे त्यांना होणारीं मुलें आपल्या धर्माचीं साहजीकच होत असतात. एक नवरा व अधिक बायकांना बायकोवार मुलें होतील पण अधिक नवरे व एक स्त्री यांना तशीं होत नाहींत. अधिक नवऱ्याची चाल मुलाला अपायकारक आहे असेंहि कांहीं शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. ज्या देशांत स्त्री पुरुष संख्येनें सारखीं असतात, तेथें एक पत्निव्रतानें राहणें सोपें असतें. पण ज्या देशांत बायकांचा भरणा अधिक आहे, तेथें

एकपत्निवत हें फक्त वर दिसण्यापुरतेंच पाळलें जातें. मनुष्यस्वभावाला धर्म बांधू शकत नसतो.

" It is an indisputable fact that human beings woman as well as men are certainly not naturally monagamous "

" *Woman-by-Dr. Bauer.*"

'स्त्री किंवा पुरुष हे स्वभावतःच एकव्रती नसतात हें सिद्धच आहे"

इंग्लंडमध्यें व इतर युरोपियन राष्ट्रामध्यें जेथें ख्रिश्चन धर्म चालू आहे तेथें एकपत्निव्रत धर्मानें पाळावें लागतें. पण पर्वाच्या जर्मन युद्धांत तरुण नागरिक कामास आल्यामुळें युरोपांत व विशेषतः फ्रान्समध्यें पुरुषांचा तुटवडा आला. स्त्रियांची संख्या अधिक झाली. एका मनुष्याला एका-पेक्षां जास्त स्त्रियांशीं लग्न लावण्याची परवानगी धर्मानें व कायद्यानें दिली नसल्यानें, लग्न न झालेल्या स्त्रिया फार राहिल्या आहेत. याचा परिणाम अनीति बोकाळली आहे. ती थांबवणें अशक्य असल्यामुळें व अनेक-पत्नित्वास धर्माची बंदी असल्यामुळें अनीतीच्या प्रकाराबाबतींत डोळ्यावर पांवरूण ओढून घेणें भाग झालें आहे. एवढेंच नाहीं तर, लोकसंख्येंत भर पडून राष्ट्राचें बळ वाढावें म्हणून बिनलग्नाच्या मुलांचा संभाळ करणें सरकारनें आपल्या शिरावर घेतलें आहे व अधिक मुलें होणाऱ्या जोडप्यांस पैशाची मदत देण्यांत येत आहे. अशा प्रसंगीं अनेकपत्नित्वाला परवानगी असणेंच राष्ट्रनीतिला पोषक झालें असतें. एका बायकोपेक्षां बायका अधिक करण्याचें मनाईमुळें चोरटा प्रकार वाढणें हें साहजिक आहे. त्याला आळा घालणें अशक्य आहे.

असो. वरील माहितीवरून पापपुण्याची म्हणजे नीतीची कल्पना चहूं-कडे एक अशी नाहीं. आपल्यावर ज्या रूढीचा, संस्काराचा व धर्माचा परिणाम झालेला असतो त्याच चाली आपल्याला चांगल्या वाटतात. हा मनुष्य-स्वभावच आहे. पण लग्नसंबंध कसे असावेत, याचा विचार करतांना, आपल्यावर असलेले रूढीचे संस्कार थोडा वेळ तरी बाजूस टाकून अगदीं निःपक्षपातानेंच या गोष्टीचा विचार केला पाहिजे. स्त्रिया या उपजतांच पुरुषांच्या गुलाम आहेत. देहानें, मनानें व बुद्धीनें पुरुषांपेक्षां कमकुवत आहेत.

असें गृहीत धरून चालल्यास पुढें विचारच खुंटून बसेल. बुद्धीची पारख करण्याकरितां संशोधक थोरामोठ्यांचे मेंदू तपासतात. अधिक बुद्धिवानांचा मेंदू जास्त असतो म्हणतात. तशी परीक्षा केल्यानंतर स्त्रीचा मेंदू कांहीं वेळां मोठ्या विद्वानापेक्षांही अधिक भरला आहे.

" A man who had weighed many human brains said that the heaviest he knew of was that of woman."—*J. S Mill.*

"पुष्कळ मेंदू तपासलेल्या एका संशोधकाला सर्वांत अधिक वजनाचा मेंदू स्त्रीचाच आढळला." ( जे. एस्. मिल्. )

देहरचनेंत कांहीं ठराविक भेद आहेत; म्हणून या दोन मानव जातींचा दर्जा ईश्वरानें उपजत कमीअधिक ठरवलेला आहे असें म्हणतां येणार नाहीं. जगाचा संसारगाडा चालायचा तर या दोहोंची सारखीच जरूरी आहे. संसारगाडा चालवण्याचीं तीं समसमान चाकें आहेत, हें आपण विसरूं नये. पिढ्यान्‌पिढ्या स्त्रियांना गुलाम बनवल्यामुळें, त्यांच्या देहाच्या व बुद्धीच्या वाढीला वाव न मिळाल्यामुळें, त्यांचे सर्व गुण दडून राहिले आहेत. पण संधि मिळाल्याबरोबर त्यांनीं पुरुषाबरोबरचीं कामें केलीं आहेत. केव्हां केव्हां कांकणभर सरसच झालीं आहेत.

खालील उदाहरणें या म्हणण्याची सत्यता पटवूं शकतील.

## पुरुषांची बरोबरी



प्राचीन कालचीच गोष्ट घेऊं. पांडवांची द्रौपदी ही 'पंडिता' म्हणून मानली जात असे. द्रौपदीचें युधिष्ठिराशीं झालेलें भाषण पंडिता स्त्रीस शोभेसेंच आहे. विराटकन्या उत्तरा ही अनेक कलांत पारंगत होती. तसेंच गार्गी, वाचक्नवी, सुलभा, अरुंधती वगैरे विद्वान् स्त्रिया होऊन गेल्या आहेत. आपल्या मुलांना आत्मनिष्ठ ज्ञानी बनवणारी माता मदालसा ही स्त्रीच होती. शांतिपर्वांत दिलेला सुलभा व जनकाचा वक्तृत्वपूर्ण संवाद मनन करण्याजोगा आहे. हिंदुधर्मातील अत्यंत पवित्र ग्रंथ जो

ऋग्वेद त्यांतील कित्येक सूक्तें विश्ववारा, घोषा, इंद्राणी, रोमशा, लोपामुद्रा, सूर्या, शची, सार्पराज्ञी वगैरे स्त्रियांनीं लिहिलीं आहेत. प्रसिद्ध कायदेपंडित लक्ष्मीदेवी इनें मिताक्षरावर स्वतःची विस्तृत टीका लिहिली आहे. महा-साध्वी, पतिव्रता, वंदनीय अशा अहिल्या, सीता, सावित्री, मंदोदरीसारख्या स्त्रिया होऊन गेल्या आहेत. फत्तेआबादच्या लढाईत पळ काढून आलेल्या नवऱ्याची निर्भत्सना करून त्याची वीरवृत्ति जागृत करणारी ही त्याची स्त्रीच होती. वीरस्त्रियांत अहमदनगरचा किल्ला लढविणारी चांदबिबी, शूरत्वांत शूरपुरुषांना लाजवणारी चितोडच्या भीमसिंगाची वीरपत्नी पद्मावती, जिच्या शाहीराच्या कडव्यांनीं पुरुषांना स्फुरण चढतें ती झांशीची राणी लक्ष्मीबाई, संग्रामनायिका तोडा ताराबाई, मुत्सद्दी राजकारणपटु करवीर राज्यसंस्थापक छत्रपती ताराबाई, इंदूरचें राज्य चालवणारी पुण्यश्लोक अहिल्याबाई, अशा स्त्रीरत्न मणिमालिकेंत रोज रोज भर पडत आहे.

लढाईतही स्त्रियांच्या पथकांनीं काम केलें आहे. राजाच्या रक्षणाकरितां शिकारीचे प्रसंगीं हत्यारबंद स्त्रिया असत असा महाभारतांत उल्लेख आहे. ख्रिस्तशकाच्या ३०० वर्षांमागें हिंदुस्थानच्या दक्षिण टोकाला पांड्यांचें राज्य होतें, व स्त्रीसैनिकेचा एक लक्ष पन्नासहजार पायदळ व पांचहजार हत्ती इतक्या सैन्यावर ताबा होता असा उल्लेख आढळतो.

In onehalf at least of the savage and barbaric peoples she is not subordinate and not inferior in strength. —*McCabe.*

" रानटी लोकांतील निम्या अधिक जातींत तरी स्त्रिया पुरुषांपेक्षां शक्तीनें कमी नाहींतच, पण दर्जानेंही कमी नाहींत.

आसामकडील प्रदेशांत ( Garos ) गरोज जातींत स्त्रियाच राज्य करीत असत. पॅसिफिक समुद्राच्या कांहीं बेटांवर सर्व घरगुती कामें पुरु-षांना करावयाला लावून बायकाच शौर्याचीं कामें करीत. नवऱ्याला बायकोचें आर्जेत रहावें लागे. गॉल्स लोकांत पुरुषांपेक्षां बायकाच सशक्त होत्या. कांगो, वेटेशा, ईस्ट ऑफ्रिका, एंडोनीज, पॅपूआन्स या जातींत बायकाच अधिक सशक्त आहेत. गॅगर्स, आफ्रिकन जातींत लढाईत सेनानायिकांचें काम व आंतील सैनिकाचें काम सर्व बायकाच करीत. लॅसडेमोनियन स्त्रिया ताकतीनें पुरुषांबरोबर असल्याचें प्लुटार्चनें लिहलें आहे.

स्वातंत्र्यासाठीं जिवाचें जोहार करणारी फ्रान्सची वीर बाला " जोन ऑफ आर्क, " मोठमोठ्या शाहण्यांना खेळवणारी मुत्सद्दी इंग्लंडची राणी इलिझाबेथ व आपल्या सौंदर्यानें जगांतील सम्राटांना झुलवणारी क्लिओपॅट्रा, कलाभिज्ञ कॅथरीन डी मेडिसी, अॅग्रीपीना, मेरी स्टुअर्ट, जगमान्य थिऑसोफिस्ट अॅनी बेझंट, मॅडम ब्लॅव्हाटस्की, अशा एकाहून एक सरस स्त्रिया तिकडे झाल्या आहेत. देहबळांत पुरुषांचा पाडाव करणाऱ्या ग्रीक " अमेझान्स " नांवाच्या मल्लस्त्रिया व स्पार्टन स्त्रिया यांनींहि पुरुषांनाच शक्तीचीं व शौर्याचीं कामें करतां येतात हें म्हणणें कृतीनें खोडून काढलें आहे. अलीकडे इंग्लिश खाडी पोहून जाण्याचें काम स्त्रियांनीं धाडसानें घेऊन यश मिळवलें आहे. गरट्रुड इडरले या बाईनें पोहण्याबाबत मागील सर्व ( रेकार्ड ) पोहणाऱ्यांना मागें टाकलें आहे. मिसेस् क्लेमिंग्टन कॉर्सन या तीन मुलांच्या आईनें पाण्याचा जोराचा ओघ काटून इंग्लिश खाडी ओलांडली. मिस् व्हायवोलेट पेर्सी इनें ३ तासांत २६ मैल धांव मारून शर्यत जिंकली आहे. ही यादी आणखी किती तरी वाढूं शकेल.

हिंदुस्थानांत अगदीं अलीकडे सत्याग्रह युद्धांत जगाला हिंदी स्त्रियांच्या शौर्याची ओळख पटली आहे. तसेंच सरोजिनी देवींनीं हिंदुस्थाननें दिलेलें कांग्रेसचें अध्यक्षपद स्वीकारून व राउंड टेबलमध्यें भाग घेऊन आपली व आपल्या जातीची योग्यता जगाचे निदर्शनास आणली आहे.

बुद्धीनें, देहानें, तसेंच मुत्सद्देगिरीनें, स्त्रियांनीं आपण पुरुषांच्या बरोबरच्या आहोंत हें सिद्ध केलें आहे. तेव्हां यापुढें स्त्रिया पुरुषाबरोबरच्या समसमान हक्क भोगण्याला पात्र आहेत हें समजून त्यांच्यासंबंधाचा विचार करणें भाग आहे.

---

# प्रकरण तिसरें

"'Sex is a natural need like food and drink though man can survive without it" *Marriage and Morals*–B. Russell

## नैसर्गिक आकर्षण.



नैसर्गिक आकर्षण हें ईश्वरी अबाधित तत्त्व आहे. प्रेमाकर्षणानें विश्व बांधलें गेलें आहे. न्यूटननें हें कोडें उलगडून त्या प्रेमाची ओळख पुनः जगाला पटवून दिली आहे. सूर्य चंद्र तारे पृथ्वी हीं प्रेमानेंच बांधलीं गेलीं आहेत. हा जिवंत प्रेमाचा धागा तुटला तरी तेजःपुंज तारा मृतप्राय होऊन पृथ्वीचे मांडीवरच आपला देह टाकतो. स्त्री-पुरुषांचें आकर्षण निसर्गाला मुळींच सुटून नाहीं. पौर्णिमेच्या चंद्राला आलिंगन देण्यासाठीं समुद्राच्या प्रेममय अंतःकरणाला भरती येऊन तो आलिंगनासाठीं आपले हात पुढें कां करतो? कमलिनी नाथाला पाहून कां फुलते? सूर्यफूल सूर्यदर्शनासाठीं इतकें कां वेडें असतें? रासायनिक प्रयोगानें बोलतां चालतां येत नाहीं असे जड पदार्थ एकमेकाची गांठ पडतांच परस्परांत एकजीव कां होतात? "यांच्या अंतरींचा हेतू कोणचा"? प्रेमाकर्षण हाच तो हेतू होय!

स्त्रीपुरुष लग्नसंबंधांत गुलामगिरीचा बराचसा भाग असला, तरी स्त्री–पुरुष सहवासांत राक्षसी प्रकार मुळींच नाहीं. लग्नसंबंधांत मालकी हक्काची कल्पना असली, तरी 'स्त्री–पुरुष आकर्षण निसर्गसिद्ध आहे. ही निसर्गाची भूक आहे; इतर इंद्रियांच्या गरजेप्रमाणेंच, अन्नपाण्याप्रमाणेंच ती एक भूक आहे. मात्र स्त्री–पुरुषसहवासाखेरीज मनुष्याला जगणें अशक्य आहे असें नाहीं. सहवासाशिवाय स्त्री–पुरुष जगत असला तरी पुढची पिढी मीलनाशिवाय निर्माण होणार नाहीं. जगाची वाढ खुंटून बसेल. ईश्वराची आज्ञा मोडली जाईल! तेव्हां या संबंधाला आळा घालण्यांत दैवी हेतूच्या आडच येण्यासारखें आहे. जनावरांत तसें मनुष्यांत परस्पर सहवासाची इच्छा सृष्टिक्रम चालविण्यासाठीं ईश्वरानेंच ठेविली आहे. इतर इंद्रियाच्या गोष्टींत तहान, भूक, झोंप या गोष्टींत अनीतीचा कांहीं संबंध येत नाहीं. मग या गोष्टींत समजण्याचेंहि कांहीं कारण नाहीं.

स्त्री–पुरुष सहवासांत घुसटलेल्या नीतीच्या कल्पना समाजव्यवस्थेसाठ वीं देहरक्षणासाठीं आहेत. कोणच्याहि गोष्टीचा अतिरेक वाईट. अन्न जास्त खाणें, झोप जास्त घेणें, कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक करणें देहास अनिष्ट आहे. तसेंच अतिसहवास वाईट आहे. म्हणून प्रकृति व समाजव्यवस्थेसाठीं कांहीं निर्बंध घालणें भाग आहे. पापपुण्याचा यांत कांहीं संबंध नाहीं. 'स्त्री-पुरुषसहवासांतील पापाच्या कल्पनेनें मनुष्याच्या स्वभावावर अत्यंत अनिष्ट परिणाम घडून आला आहे.' तेव्हां यांतील पापाची कल्पना काढून टाकूनच 'सहवासाच्या' प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

## विषय.

मनुष्यप्राणी बालवयांतून यौवनावस्थेंत आला म्हणजे त्याच्यामध्यें इंद्रिय सुखलालसा आपोआपच उत्पन्न होत असते. पशूंत व मनुष्यांत ती सारखीच असते. ही इंद्रियलालसा सहवासाशिवाय तृप्त होत नाहीं. स्त्री–पुरुषांमधील सहानुभूति किंवा प्रेम याचा उगम याच लालसेंतून आहे. विषयसुखाचा वाराहि नाहीं असें प्रेम फक्त कविकल्पनेंतच राहूं शकतें.

"Mutual sympathy between man and woman is really nothing but the unconscious desire for sexual union."

Woman-by-Dr. Bieur

"स्त्री–पुरुषामधील सहानुभूतींत व प्रेमांत विषय सुखाची इच्छाच झांकलेली असतें."

ह्या सहवासांत पापाचा कांहीं संबंध नाहीं. ही गोष्ट अत्यंत पवित्र आहे. प्राणज्योत या पिढीकडून भावी पिढीच्या हवालीं करण्याचें पवित्र काम स्त्री–पुरुषसहवासानें होत असतें. जाति उत्पत्ती हा सृष्टीचा मोठा नियम आहे. त्याला अपवित्र मानण्याचा अधिकार मनुष्याचा नाहीं. "अंग अंगाशीं, हृदय हृदयाशीं, जीव जिवाशीं मुक्या बोलांनीं बोलत असतां नादब्रह्माचा विलय होतो" (पुण्यप्रभाव) त्याला पाप कसें म्हणावें?

## प्रेम.

सहवासांतूनच प्रेमाची उत्पत्ति होते. प्रेमापासून सौंदर्यसृष्टि निर्माण होते. काव्य, चित्रकला, शिल्पकला, गान, वाङ्मय यांना चालना देणारें प्रेमच आहे. विश्वबंधुत्वाची ओळख या प्रेमांतूनच होत असते. प्रेमवेड्याला

सर्व विश्व प्रेममय होतें. आपली प्रियकरणी रहात असेल त्या जागेबद्दल, त्या प्रांताबद्दल आपलेपणा वाटतो. त्या दिशेकडे जाणारा वारा व तिकडून वाहणारा वारा, त्या वाऱ्यावर वाहणारे मेघ हे त्यांचे 'मेघदूत' होतात. जगांतील सुंदर वस्तूंत, वृक्षलता-वेलींत त्याला प्रियेचा संदेश वाचतां येतो. प्रियकरणीनें तुडवलेली जमीन, त्याला पुण्यभूमि वाटते. ज्या ज्या पदार्थाला तिचा हात लागला असेल, ज्यांच्या ज्यांच्यावर तिचें प्रेम असेल तिचा सर्व परिवार त्याला आपल्या जिव्हाळ्याचा वाटतो. असा प्रेमवेडा जगाकडे प्रेममय दृष्टीनें पाहत असतो. प्रेमवेडा म्हणतो—

" तव वसतीच्या दिशेवरी जी तारा लखलखते
नेत्रयुग्म हें तीवर खिळतें न च कधिंही हलतें— ( गडकरी )

सीतेच्या विरहानें प्रेमवेडा झालेला राम, लैलीसाठीं प्रेमांध झालेला मजनू, बियाट्रीस वेडा डांटे, ज्युलियटचा रोमियो, असेच वेडे झाले होते. शेले, बॉयरन किंवा गटे यांचें काव्य प्रेमाखेरीज बाहेर आलें नसतें. याच प्रेमांतून विश्वप्रेमाचा साठा सांपडला आहे. जगांतील नवरत्नांपैकीं रत्न "ताजमहाल" हें काव्य शहाजहानच्या प्रेममय हृदयाचें मूर्त स्वरूप आहे. ताज ही इमारत नव्हे, तो एक पवित्र प्रेमाचा अश्रुबिंदु आहे. कवि रवींद्रनाथ म्हणतात—

" Oh Shahajahan ! you made imperishable a tear drop of love ' ( Tagore. )

' प्रेमाच्या अश्रुबिंदूला तूं चिरस्थायीं केलें आहेस. "

प्रेमामुळें मनुष्याची वृत्ति कशी पालटते, त्याचें प्रत्यक्ष उदाहरण खालीं देत आहे. लेखकानें त्याच्या प्रेमवेड्या मित्राला पत्र न पाठवल्याबद्दल रागावून त्याचें कारण विचारलें असतां तो लिहितो. (पत्र आहे तसेंच शब्दशः देत आहे. मराठींत भाषांतर करणें व्यर्थ आहे म्हणून तो प्रयत्न करीत नाहीं.)

" My dear friend.

You ask me why didn't I write to you ! Well you ought to know! I was not in a mood to write. This is the plain blunt truth which I can forward to you.........

I had put myself in an another world, mysterious and quite different from the common lot ! Visions sweet and subtle, serene and sacred, memories, glad and sorrowful,

 4498

brush past me like an evening breeze, laiden with heavy scents and alive with silent whispers. And there I lie entranced. Recollections of the days gone by, of the hours I enjoyed, of the dreams I realised-are sufficient to cheer my. poor heart. Now weeping over the past happiness, though it still exists, exists but in sorrow, sorrow beautiful and devine"

My friend I am bappy with the vision. And I only wish I should die with the same vision. Is it not a consoling idea that there is some lonely quarter is a soul shedding its sorrowul tears. Some sympathetic heart sending her sighs! I could feel them through the rustling of the leaves, through the soft breeze of the the wind! would you dare break this vision ? "

साधारण मनुष्याला प्रेम कवि बनवतें तर दैवी वरदहस्त असलेल्याना तें किती उच्चस्थानीं नेईल! प्रेमवेड्या बोक्याशियोच्या काव्यानेंच स्फूर्तिदायी काव्यांना चालना दिली आहे. चॉसर शेक्सपिअर बेन जॉनसन, ड्रायडन, कीट्स गटे वगैरे कवींच्यांतसुद्धां बोक्याशियोच्या प्रेममय काव्यांनीं स्फूर्ति उत्पन्न केली आहे.

चित्रकारांच्या कुंचल्यांतून प्रतिसृष्टि निर्माण करणारे, शिल्पकारांच्या हातांतून स्वर्गीय अप्सरांना आडवून ठेवणारे, हिंस्रपशूंना आपल्या तानेनें डोलविणारें हें प्रेम म्हणजे जगांतील एक अद्‌भुत गोष्ट आहे. या प्रेमाची ओळख आपल्या हृदयस्थ सिंहासनावर प्रियकरणी विराजमान झाल्यानें लवकर होऊं शकतें. " प्रेमाच्या विकासाचा पहिला धडा पुरुषाला स्त्रीकडून मिळतो. स्त्री तुमच्या प्रेमाला जागृत करते. सर्व जगाशीं ऐक्य अनुभवण्याचें कामीं तिचें सहाय्य व्हावें हाच विवाहाचा हेतू आहे." —(रामतीर्थ)

प्रेमाला जातिनिर्बंध नाहीं. प्रेमांत उच्चनीच भेद नाहीं. मनुष्यानें स्वार्थासाठीं, सोईसाठीं उत्पन्न केलेली समाजरूढिबंधनें प्रेमापुढें टिकूं शकत नाहींत. अफाट समुद्राच्या उत्तान लाटेवर स्वार होणारा सूर्यनारायण, शांत स्फटिकवत् सरोवरांत ध्यानस्थ बसतो. कमलपुष्पांनीं बहरलेल्या तलावांत तो गुंग होतो, तसाच एकाद्या गलिच्छ डबक्यालाही आपल्या पवित्र किरणांनीं पावन करून घेतो. प्रेम हें असें पवित्र आहे. तें भेदाभेद मानीत

नाहीं. प्रेमवेडी राजकन्या यःकश्चित् मनुष्याच्या प्रेमाचा आधार सांपडतांच राज्यत्याग करण्यासही कमी करत नाहीं. या प्रेममीलनाला पाप कसें म्हणावें? निःस्वार्थ, निर्मल, निष्पाप दोन हृदयांची जुळणी पापमूलक कशी होऊं शकेल ? प्रेमवेडी राधा विश्वाशी कशी तन्मय झाली त्याचें वर्णन गडकऱ्यांनीं आपलें कवितेंत केलें आहे. राधा धांवा करत आहे. तिला कृष्ण चहूंकडे दिसत आहे. "अणुरेणुहि देही स्वैर, भिन्नता विसरली वैर, अवनंदलाल कर खैर, प्रेमाची दुनिया उरलि ॥ जन्माचें झालें चीज, कायमची मेली नीज, विश्वाचे गवसें बीज, चिद्वृत्ति त्यांत अवतरली ॥"

या प्रेमाची महती गावी तितकी थोडीच. या प्रेममय वातावरणांत लेखकही वाहिला असल्यास प्रेमच त्याला जबाबदार आहे. विवेकानंद म्हणतात, प्रेमाची मूर्ति हें राधेचें स्वरूप आहे. तुम्ही राधा व्हा कीं कृष्णदर्शन ठेवलेच. कृष्णदर्शनाला राधा होण्यावांचून दुसरा मार्ग नाहीं, भक्तानें सीता होऊन रामरूपांत रहावें."

खऱ्या स्त्रीप्रेमांतून स्वार्थत्यागाची शिकवण मिळाली आहे. अनेक उच्च गुणांची प्रेरणा याच प्रेमांतून झाली आहे. प्रेमाची पूर्तता मीलनांत असली तरी मनुष्याचें अंतिम ध्येय मात्र विषयसुख हें नाहीं. केवळ विषयोपभोगांत सर्व सुखाचा ठेवा आहे असें माणसाला केव्हांच वाटत नाहीं. विषयसुखानंतर प्रेमाचा ठेवा सांपडला नाहीं तर आयुष्य सुखकर होत नाहीं.

## जिवाची सोबत.

आपण कुणावरती तरी प्रेम करावें, दुसऱ्यानें आपल्यावर प्रेम करावें, आपल्या सुखदुःखाचे वांटेकरी दुसरे कोण तरी असावें, आपला आनंद, आपलें सुख, आपले विचार, आपल्या अडचणी मनमोकळें करून कुणाला तरी सांगाव्यात, आपल्या जन्माची भागीदारी कुणीतरी पतकरावी, अशी इच्छा प्रत्येक स्त्री–पुरुषांमध्यें असते. स्त्री–प्रेम हें कांहीं निव्वळ विषयसुखासाठीं नसतें. विषयसुख हेंच जर प्रेमाचें ध्येय असतें तर शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या आयुष्याचा हेवा करण्याजोगी स्थिति झाली असती व कायमच्या लग्नाची ब्याद मनुष्यानें आपल्यामागें लावून घेतली नसती. याच स्त्रियांवर मनुष्यांनीं आपलें आयुष्य काढलें असतें.

मनुष्य अगदी रानटी स्थितींतला असो किंवा सुसंस्कृत असो स्त्रीची गरज जर त्याला केवळ विषयसुखासाठींच असती तर विषयाची वासना नष्ट झाल्यानंतर म्हणजे म्हातारपणीं त्याला स्त्रीची जरूर भासणार नाहीं. पण म्हातारपणींच स्त्रीचा कळकळीचा आधार त्याला पाहिजे असतो. आपल्या सुखदु:खाशीं एकरूप झालेली व्यक्ति, स्त्रीखेरीज मिळणें दुर्मिळ. निसर्गाच्या गरजेमुळें ते देहानें एक होतात. सहवास मनानें एक करतो, परस्परावलंबनामुळें त्यांना व्यवहारी जगाशीं टक्कर द्यावी लागते, त्यामुळें त्यांचें व्यवहारी हिताहितही एक होतें. या दोघांना जवळ आणण्याकरितां, व जगाची घडी चालावी म्हणून 'इंद्रियसुख' ईश्वरानें एक आमिष ठेवलें आहे. आयुष्यांतील सर्वस्व कांहीं तें नव्हे. व ते सर्वस्वी ताज्यही नव्हे.

प्रेम, कांहीं काम व महत्वाकांक्षा या गोष्टी मनुष्याच्या आयुष्यांत महत्वाच्या असतात. या गोष्टीला मदतनीस अशी सहधर्मचारिणी मिळाली, सुखदु:खाची वांटेकरीण, जिवाची मैत्रीण मिळाली तर मनुष्याचा आयुष्यक्रम कितीतरी सुखाचा होतो. प्रेमाशिवाय अशी जोडी मनानें एकजीव होऊं शकत नाहीं. त्यांचे हितसंबंध एक होऊं शकत नाहींत.

लग्नसंबंधानें बांधली गेलेलीं व म्हणून एकाठिकाणीं राहणारीं पण मनानें पूर्ण पारखी असलेलीं दांपत्यें पुष्कळ आढळतील. खाण्यापिण्याला कमी नाहीं, विषयसुखाची कमतरता नाहीं, संपत्तीची उणीव नाहीं, असें असूनहि जिवाला वैतागलेली, एकत्र असून एकलकोंडी जोडपीं कितीतरी सांपडतील. निष्प्रेम आयुष्य इतर सर्वसुखें असूनही कंटाळवाणें वाटतें. म्हणून गडकऱ्यांनीं एका कवितेंत म्हटलें आहे:—

क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव पडो मरणाचा ॥
निष्प्रेम चिरंजीवन तें । जगीं दगडालाहि मिळतें ॥

मनुष्याला प्रेम हें जीवन आहे. त्या व्यतिरिक्त त्याच्यांत आणि पशूंत फारसा भेद नाहीं. जनावरांतलें प्रेम नकळत ( Instinctive ) असतें मनुष्याचें बुद्धिपुरस्सर असतें हा त्यांत फरक आहे. भटांच्या पुटपुटण्यानें, अक्षतांच्या माऱ्यानें किंवा मंगलाष्टकांच्या सुस्वर गाण्यानें प्रेमाची पेरणी होत नसते.

निसर्गनिर्मित इंद्रियलालसा व परस्पर सहवासापासून होणाऱ्या पवित्र प्रेमाचा व विवाहविधीचा कांहीं संबंध नाहीं. लग्नसंबंध घडवून आणला म्हणजे प्रेमसंबंध घडवून आणला असें होत नाहीं. तरुण स्त्री—पुरुष एकमेकाकडे स्वाभाविक आकर्षले जाणें हें सृष्टिनियमाला धरून आहे. भटपुरोहिताच्या परवानगीची या बाबतींत कोणीहि जगांत वाट पाहिलेली नाहीं. स्वतः भट पुरोहितहि यांतून सुटलेला नाहीं.

प्रेमाची पण हीच गोष्ट आहे. " प्रेमाच्या बाजारांतील देवघेव दलालामार्फत होत नसते " [ पुण्यप्रभाव ]. एखाद्या वस्तूवर, प्राण्यावर तसेंच स्त्रीवर प्रेम बसायला त्रयस्थाच्या परवानगीची वांट कोणाहि मनुष्यानें पाहिलेली नाहीं. लग्नबंधनाचा राजरोस परवानगी मिळण्याअगोदर स्त्रीपुरुषाचें प्रेम एकमेकांवर बसलें आहे व या परवानगीशिवायहि अत्यंत सात्विकपणें परस्परसहवासांत एकत्रपणें काल घालवीत असलेलीं शेंकडो उदाहरणें आहेत. तेव्हां सहवास व प्रेम यांचा व लग्नबंधनाचा संबंध नाहीं हें कळणें कांहीं फार जड जाईल असें वाटत नाहीं.

## नवाईनंतर.

प्रेम हें सुद्धां आहे तसेंच व तितकेंच जन्मभर टिकत असतें असें नाहीं. यौवनभरांतील प्रेम बहुधा अविचारी असतें. इंद्रियलालसा हाच त्यांत प्राधान्य हेतू असतो. प्रेमानें किंवा तारुण्यमदानें बेहोष होऊन वेडीं झालेलीं जोडपीं प्रथम जिवाला जीव देतील, परस्परासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवतील; पण यौवनाचा भर ओसरल्यानंतर, प्रेमाच्या वस्तूचा उपभोग घेतल्यानंतर, नाविन्याची गोडी गेल्यानंतर, तसें प्रेम, तसेंच अगत्य रहात नसतें. आशेंत जें सुख सांठवलें आहे तें प्राप्तींत नसतें. हा एक मनुष्यस्वभाव आहे. त्याला धरून, तारुण्याची धुंदी उतरल्यानंतर, परस्परांतील गुणदोषाकडे दृष्टि जाते. जगांतील गुणाची, सौंदर्याची खाण वाटणारी प्रिय स्त्री इतर स्त्रियांप्रमाणेंच गुणदोषाची वाटूं लागते. अशा स्थितींत परस्परसंबंध जुळून जर प्रेम टिकलें तर तें कायम राहूं शकतें. अशा जोडप्यांचा लग्नसंबंध धार्मिक विधीनें झाल्यास व त्याला समाजानें मान्यता दिल्यास तो कुणालाच बंधनकारक वाटणार नाहीं. तें बंधन गुलामगिरी असें न वाटतां,

तो एक प्रेमसंरक्षण करणारा किल्लाच बनेल. अशा जोडप्यांचा समाज परस्परसहाय्यक होऊन राष्ट्रोन्नतीला पोषकच होईल. अशाप्रकारें घडून आलेल्या संबंधांतून आपली सुटका करून घेण्याची कल्पनाहि कुणाला शिवणार नाहीं, तर उलट, स्त्री–पुरुष आपणहून, हीं बंधनें समाजासाठीं व स्वार्थासाठीं स्वखुषीनें लावून घेतील. अशा दांपत्यांना नीतीचीं बंधनेंहि घालण्याची जरूर पडणार नाहीं. लग्न संबंधाचा शिक्कामोर्तब पडला नाहीं तरी सुद्धां तें आदर्शनीय कुटुंब होईल.

असें असतां लग्नाची आवश्यकता कां? ही पद्धत आमलांत कां आली याचा आपण विचार करूं.

लग्नसंबंधांत चांगल्या तशाच अनेक वाईट गोष्टींचाहि मिलाफ झाला आहे, सर्व वाईटच आहे असें म्हणतां येणार नाहीं.

## लग्नबंधन व स्वार्थनीति.

पशुकोटीहून मनुष्य निराळा आहे. त्याच्यांत 'आहार, निद्रा, भय, मैथुन' याखेरीज उच्च गुण आहेत. जनावराप्रमाणेंच त्याचे सर्व व्यवहार होत नाहींत. स्वार्थासाठीं, समाजासाठीं व भावीपिढीसाठीं कांहीं निर्बंध घालून घेणें त्याला भाग पडलें आहे.

स्त्री–पुरुष संबंधांत प्रथम निसर्गाकर्षण, नंतर प्रेम, प्रेमानंतर मत्सरहि उत्पन्न होतो. त्यांत मालकीच्या कल्पनेचीं घाण शिरते. अशा चांगल्या वाइट विकारांचा परिणाम या लग्नसंस्थेवर झाला आहे.

आपली स्त्री 'आपली' असावी. तिच्यावर दुसऱ्याला कसलाहि हक्क सांगतां येऊं नये. ती आपल्या पूर्ण 'मालकीची' असावी असें वाटूं लागतें. शारीरिक भूक, नंतर प्रेम, नंतर स्वार्थ, नंतर मत्सर वाढत गेल्यामुळें, प्रेम–बंधनावर, सामाजिक व धार्मिक बंधनें लादलीं गेलीं. स्वार्थ व मत्सर यांना उच्चनीतीचा आधार नसला तरी, मनुष्यनिर्मित धर्मग्रंथांनीं व कायद्यांनीं त्यांना मान्यता दिली व समाजानें त्यांना उचलून धरलें. सर्वांना सारखें लेखणारें 'सत्यतत्त्व' म्हणजेच 'ईश्वर' या वासनांना पाठिंबा कसा देईल?

Was it possible that God could be vindictive and jealous like men?"
— *Woman–De–Maupasaut.*

" मनुष्याप्रमाणें ईश्वरही खुनशी व मत्सरी असेल काय ? "

काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर, अहंकार हे दुर्गुणच आहेत. केव्हांहि व कोणत्याहि स्थितींत ते त्याज्य आहेत.

पुरुषवर्गानें आपल्या स्वार्थासाठीं लग्नसंस्थेला लग्नबंधन करून त्यांत स्त्रियांना बांधून टाकलें आहे ! व हा तुरुंग धर्म व रूढीच्या सीमेंटनें पक्का मजबूत बनवून कायद्यांचे सरकारी शिपाई त्यावर पहाऱ्यास ठेवले आहेत. व यांत स्त्रियांच्या स्वातंत्र्याला कडीकुलपांत ठेवलें आहे ! !

स्त्रियांच्या बाजूचा समतेच्या तत्वाला धरून विचार केलेला नाहीं. कर्तव्याची जबाबदारी व नीतीचीं बंधनें फक्त एकाच पक्षावर लादलीं आहेत. उपरोधिक दृष्ट्या एक प्रसिद्ध कादंबरीकार म्हणतात,

" Duty is what one expects from others, it is not one does oneself—Oscarwilde.

" कर्तव्याची अपेक्षा मनुष्य नेहमीं दुसऱ्यापासून करतो, स्वतः मात्र तें करीत नाहीं " या उलट्या नीतीला अनुसरून पुरुषवर्गानें कर्तव्याची अपेक्षा फक्त स्त्रियांकडूनच केली आहे. हा एकांगीपणा काढून टाकला म्हणजे लग्नबंधन नको असें वाटणार नाहीं.

लग्नसंबंध हा पाहिजेच पाहिजे. समाजाची घडी विस्कळूं नये, समाज-स्वास्थ्यास धक्का लागूं नये व पुढील पिढीची योग्य जोपासना व्हावी, स्त्री–पुरुषांनीं ही जबाबदारी अंगावरून टाकूं नये, याकरितां या संस्थेची आवश्यकता आहे.

## लग्नसंबंध स्वभाव बदलूं शकत नाहीं.

लग्नसंबंध ही सामाजिक गोष्ट आहे. स्त्री–पुरुष सहवास ही सामाजिक गोष्ट नाहीं, ही पूर्ण व्यक्तिविषयक गोष्ट आहे. लग्नसंबंध निसर्गाला आळा घालूं शकत नाहींत. तशी कुणी अपेक्षा केल्यास ती साफ चुकीची ठरेल.

समाजाच्या पावित्र्याच्या आजच्या कल्पनेला धरून लग्न झालेलें एकहि दांपत्य वागत असेल असें मानतां येणार नाहीं. ' पापी दृष्टीनें परस्त्रीकडे नुसतें पाहणें, हा व्यभिचार होय ' असें बायबल म्हणतें. या कसाला जगांतील एक तरी जोडपें मिळेल काय ? लग्नसंबंधापूर्वी मनानें किंवा कृतीनें

आपण निष्पाप आहोंत असें छातीठोकपणें कुणाला प्रामाणिकपणें सांगतां येईल काय? बायबलमध्येंच एक उदाहरण आहे. एका स्त्रीला ती पाप करीत असतांना लोकांनीं पकडली व तिची निर्भत्सना करून त्यांनीं तिला दगडानें ठेचण्यास सुरवात केली. तेव्हां ती धांवत जाऊन येशूख्रिस्ताच्या पायांवर पडली. तेव्हां येशूख्रिस्तांनीं लोकांना बजावलें कीं, जो निष्पाप असेल त्यानेंच या स्त्रीवर दगड फेकावा, त्यावर सर्व खजील होऊन परतले. एकाचीहि दगड मारण्याची छाती झाली नाहीं. कारण पाप हे प्रत्येक पुरुषाच्या हातून झालें होतें. निष्पाप कोणीहि नव्हता.

लग्नसंबंध झाला म्हणून काय झालें? लग्नबंधनानें देहहि बांधला जात नाहीं किंवा मनहि बांधलें जात नाहीं. देह कदाचित् बांधला गेला तर मनाला कोण आवरून धरणार? आणि मनानें भ्रष्ट झालेला मनुष्य धर्माची, समाजाची म्हणजे लोकनिंदेची व कायद्याची भीति नसती तर कृतीनें भ्रष्ट झालाच असता. यांत विशेष असें कांहीं नाहीं.

अनेक दांपत्यें औपचारिकदृष्टया जरी एकपति किंवा एकपत्निव्रतानें रहात असलीं तरी वस्तुतः तीं तशीं क्वचितच राहिलेलीं असतात. मनुष्य-स्वभाव असा चमत्कारिक बनला आहे कीं, तो कृती पचवून घेतो पण त्याला हे विचार मात्र खपत नाहींत. निसर्गस्वभावाला सोडून भलती अपेक्षा करणें, ती स्वतः न पाळून स्त्रियांकरवींच पाळण्याचा प्रयत्न करणें किती हास्यास्पद आहे. ‘स्वतःवरून जग ओळखावें’ म्हणतात. आपल्या स्वभावावरून स्त्रियांच्याहि मनोवृत्तीची कल्पना करतां येईल. त्या माणूस सोडून निराळ्या नाहींत. पण दुर्दैवानें स्त्रियांतील मनुष्यत्वाला पुरुषानें कबूली दिलेली नाहीं. त्यांची जमा निव्वळ उपभोग्य वस्तूंत होत असते.

---

# प्रकरण ४ थें.

## लग्नावर संन्याशाचा शाप.

गले बीच सैली कफनी डारा, बांधा लाल जरतारी ।
ऐसा खूप बना है सिद्ध, अंदरकी गत न्यारी ॥ —कबीर

लग्नबंधन पुरुषाच्या मत्सरी व स्वार्थी स्वभावामुळें झालें आहे पण संन्यासी लोकांनीं त्यावर पापाचाहि शिक्का मारला आहे. ख्रिश्चन धर्मानें तर पाप्यांची अनावर इच्छा आवरून वेण्याला एक सवलत म्हणून लग्नाला परवानगी दिली आहे एवढेंच. प्रत्येक धर्मातील संन्यासी वर्गानें लग्नाला अशुद्ध ठरवून त्याला कांटेरी कुंपणाचें स्वरूप दिलें आहे. स्त्रिया या पुरुषाच्या मोक्षमार्गाआड येणाऱ्या, त्याचा अधःपात करणाऱ्या व अपवित्र होत; त्यांच्या संसर्गापासून दूर रहावें, ईश्वरप्राप्तीची इच्छा करणाऱ्यांनीं त्यांच्या वाऱ्यासहि राहूं नये. अशा प्रकारच्या आज्ञा संन्यासी वर्गानें सोडल्या आहेत.

ज्यांनीं मनुष्यप्राण्याला जन्म दिला, ज्यांनीं आपल्याला असंख्य यातना सहन करून जन्म दिला, लहानाचें मोठें केलें, शुश्रूषा केली, ज्यांच्या प्रेमामुळेंच मनुष्य जगला, त्यांच्याबद्दल असे अनुदार उद्गार काढावेत हें आश्चर्य नव्हे काय?

"The glutton, the voluptuary and the ascetic are all self absorbed persons whose horizon is limited by their own desires either by way of satisfaction or by way of renunciation."
*Burtrand Russell.*

'खाद्यलोलुप, विषयलोलुप व संन्यासी हे सर्व स्वयंलोलुप (स्वार्थी) असतात, त्यांच्या दृष्टिकोनाची मर्यादा त्यांच्या ध्येयाला धरून स्वार्थ किंवा संन्यास अशी असते.'

## उल्लूंचा वागा.

स्वतःच्या वासनेवर ताबा न ठेवतां त्या त्या जिनसांना नांवें ठेवित सुटणें हा मूर्खपणा आहे. यावेळीं एक मौजेची गोष्ट आठवते. "मेजवानी होती. राजा मेजवानीस गेला होता. वांगीभात राजाला आवडला. गोंचल

खुषमसकऱ्या म्हणतो—वांगें ईश्वराच्याही आवडीचें आहे महाराज. देवानें म्हणूनच त्याचे डोक्यावर छत्र धरलें आहे. राजानें जरा अधिक ताव मारला. पोटांत कळ सुरू झाली. खुषमस्कऱ्यानें लगेच पगडी फिरवली. वांगें खरोखर वाईटच. महाराज देवानें ही त्याला शिक्षा केली आहे. वाईट म्हणून त्याला काट्याच्या सुळावर चढवलें आहे. ”

स्वतःच्या मनावर ताबा न ठेवतां स्त्रियावर सूड उगवणें हा वरच्या गोष्टीसारखा प्रकार आहे. विषयाला पाप समजायचें तर, पुरुषाला बिघडावयाला स्त्रिया कारण होत असतील, त्यापेक्षां आज तरी स्त्रियांना पापमार्गाला लावण्याला पुरुषच अधिक कारण होतात. पण धर्मशास्त्रें हीं पुरुषांच्या हातचीं असल्यामुळें स्त्रियांचा दर्जा पुरुषांनीं कमी ठरवला आहे. त्यांना धर्मविधीपासून, पवित्र मानलेल्या गोष्टीपासून दूर ठेवलें आहे.

“ स्त्रियांच्या जातकर्मादि क्रिया मंत्रांच्या योगानें करूं नये अशी शास्त्राची मर्यादा आहे. श्रुति व स्मृति हीं धर्माचीं प्रमाणें असून त्याचा स्त्रियांस अधिकार नसल्यामुळें त्या धर्मज्ञ नसतात. पापांचा नाश करणारा जो मंत्राचा जप तो त्यास करितां येत नसल्यामुळें पाप झालें तरी त्यास घालविण्यास त्या असमर्थ व असत्याप्रमाणें अशुभ असतात. व्यभिचारशीलत्व हा स्त्रियांचा स्वभावच आहे.” अशीं मतें प्रतिपादन करणारें धर्मावतार(?) बहुतेक सर्व देशांत व धर्मांत निर्माण झाले आहेत. वरती दिलेल्या गोष्टीप्रमाणें ‘वांग्यालाच, शिव्या देत सुटण्याचाच हा प्रकार नव्हे काय? इंग्रजांनीं हिंदुस्थानला गुलाम केल्यानंतर “ law and order ” कायदा व शिस्त या नांवाखालीं आपली सत्ता अबाधित राहील असे सोईस्कर कायदे करणें, राजद्रोहाची वाटेल तशी व्याख्या करणें या वृत्तींत व वरील वृत्तींत कांहीं अंतर नाहीं. ही वृत्ति कांहीं हिंदुस्थानपुरतीच नाहीं. लॅप्स लोकांत कांहीं विशिष्ट गोष्टींना स्त्रियांनीं हात लावयाचा नाहीं, यज्ञयागांत (sacrificial rites) भाग घ्यायचीं नाहीं. व त्या बाजूला दृष्टीही टाकायची नाहीं. चिनी लोकांत स्त्रियांनीं देवालयांत प्रार्थना करायची नाहीं. मॅक्सिको, व्होटक ( votyak ) नायकुरगुआ, शमॅनिस्ट (सैबेरिया) वगैरे जातींत व धर्मांत कमी अधिक प्रमाणानें स्त्रियांना हिणवलें आहे.

ईश्वराकडे जाण्याच्या मार्गांत भक्तिमार्गाला सर्व संतमहात्म्यांनीं

महत्व दिलें आहे. कबीर कमाल तुकाराम, चोखामेळा, रायदास, वगैरे संत भक्तीच्या जोरावरच मुक्त झाले. स्त्री ही मूर्तिमंत प्रेम व भक्ति होय. मुक्ताई, जनाई, मिरा या भक्तीच्याच जोरावर देवाप्रत पोचल्या! रामकृष्ण परमहंसांना देवीच्या ध्यानांतच समाधि लागत असे. त्या पवित्र जननीला पुरुषांनीं पापी ठरवणें यासारखे आणखी दुसरें पाप तें कोणतें?

भक्तीला ज्ञानापेक्षांही संतांनीं महत्व दिलें आहे.

भक्ति प्रेमेवीण ज्ञान नको देवा। अभिमान नित्य नवा तयामाजी ॥—तुका.

दया, क्षमा शांति या भक्तीच्याच बहिणी आहेत. हे गुण पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या अंगींच अधिक आहेत व 'दया, क्षमा, शांति तेथें देवाची वसती' असते हें सर्वांना मान्य आहे.

स्वार्थानें पूर्णपणें भरलेल्या, विषयसुखाच्या अतिरेकानें विटलेल्या किंवा पावित्र्याच्या विचित्र कल्पनेनें वेडावलेल्या विशिष्ट वर्गानें लग्नबंधन हा एक स्त्रीपुरुषांना डांबून ठेवण्याचा तुरुंग बनवला, तरी त्याच तुरुंगाचीं द्वारें याच वर्गानें मोडलेलीं दिसतात.

बुद्धधर्मानें संन्यासाला महत्व दिलें. पण अरण्यांत जाऊन बसल्यानें जशी विषयवासना कमी होत नाहीं; तसेंच संसारलोलुप झाल्यामुळेंहि मनुष्य सुखी झालेला नाहीं. मनावर ताबा बसल्याखेरीज असे उपाय व्यर्थ आहेत.

बौद्ध व जैन भिक्षूंनीं तत्त्व या दृष्टीनें संन्यासवृत्ति पतकरली खरी, पण त्यांतीलच पुष्कळ लोक अनीतिमान बनले. भिक्षु आणि भिक्षुकिणी यांनीं गच्च भरलेले शहरवजा झालेले विहार अनीतीचें माहेरघर बनले! कबीर व तुकाराम महाराजांनीं या लोकांची चांगलीच हजिरी घेतली आहे. कबीरजी म्हणतात—"कैसा जोग कमाया बे, ये क्या ढोंग मचाया बे॥ भगवे कपडे शीर मुंडावे, कहेता मै संन्यासी। संन्यासीकी गत है न्यारी, ये तो पेटनके उपदेशी॥"

असेंच ग्रीक लोकांत होमरच्या वेळेस, प्रथम प्रवृत्तीचें प्राबल्य होतें पण तें कमी होऊन पुढें निवृत्तीकडे वळलें. पायथ्यागोरासचे अनुयायी 'विवाहसुद्धां' करणें श्रेयस्कर नाहीं असें मानीत. या वृत्तीचा कळस होऊन 'डायोजेनीस' हा सर्वसंगपरित्याग करून एका पिपांत जन्मभर

राहिला. आपल्याकडेहि डोक्यावर, एका हातावर, एका पायावर सरकस करून, आत्मिक शक्ति वाढवण्याचा प्रयोग अनेक संन्याशांनीं केला आहे. ऋग्वेदकालअखेर प्रवृत्तीचें प्रस्थ माजलें. यज्ञयागादि खर्चांत डामडौल वाढले. अथर्व वेदांत जारणमारण, मोहनी, तोडगे, यांतच आत्मविद्या आहे असें समजून देहदंडास महत्व आलें. ज्यू लोकांतहि असाच निवृत्ति मार्ग बोकाळला आहे. हे लोक अविवाहित राहून देवाची भक्ति करणें हाच मुक्तिमार्ग मानीत. ख्रिस्ती धर्मावरहि या मताचा पगडा बसला आहे. संन्यासी स्त्रीचें लग्न ख्रिस्ताबरोबर झालें आहे, असें समजून ती इतरांबरोबर वागते. त्यांच्यांतहि मंक म्हणजे संन्यासी वाढूं लागले. पावित्र्याच्या विक्षिप्त कल्पनेचा अतिरेक झाला. स्वतःचें शरीर स्वच्छ ठेवणें व त्याची निगा राखणें, फार काय, आपला देह आपण पाहणें होंहि वाईट असें समजलें जाऊं लागलें. देहाची व वस्त्राची स्वच्छता म्हणजे आत्म्याची मलीनता असे साधू सेंट पॉल हे समजत. सेंट अब्राहामची गोष्ट सांगतात कीं, संन्यासदीक्षा घेतल्यानंतर पुढें ५० वर्षें त्यानें हातपाय, तोंड धुतलें नाहीं. सेंट आमन यानें दीक्षेनंतर स्वतःला उघडें कधीं पाहिलें नाहीं. सिल्व्हिया नांवच्या एका संन्यासिनीनें बोटाखेरीज देहाचा दुसरा कोणताहि भाग धुतला नाहीं. तसेंच एका मठांतील (१३०) संन्यासिनींनीं स्नानाचा अपवित्रपणा केव्हांच पतकरला नाहीं किंवा पायहि कधीं धुतले नाहींत! केन नांवच्या एका तत्त्वज्ञान्यानें लग्न ठरल्यादिवशींच पळ काढून लग्न चुकवलें. सेंट अब्राहाम यांची स्वारी लग्नरात्रीं पापाच्या कल्पनेला भिऊन रामदासाप्रमाणें 'सावधान' म्हणतांच 'सावधान' होऊन त्याच रात्रीं पसार झाली. 'तसेंच पोलंडच्या एका राजदांपत्यानें लग्नरात्रींच ब्रम्हचर्याची शपथ वाहून ती कडेपर्यंत पाळली' हीं एका मासल्याचीं उदाहरणें झालीं. आतां दुसऱ्या टोकाकडे पाहूं.

## मठांचे कुंटीणखाने.

कडक शिस्तीचा प्रकार असा एकीकडे चालत असतांना, औपचारिकदृष्ट्या संन्यासाच्या कडक ढोंगाचें सोंग करून चोरून पापाची परमावधि झाली. संन्याशांचे मठ अनीतीचे अड्डे व कुंटणखाने बनले. हे पोप

सुद्धां दुराचारी बनले. पोप सातव्या ग्रीगरीनें, पाद्रींनीं अंगवस्त्रें बाळगूं नयेत म्हणून फार उग्र स्वरूप धारण केलें होतें. तर तेविसावा पोप जॉन याचा अत्यंत अनीतिमान म्हणून दुर्लौकिक झाला होता. कँटरबरीचा ॲबट सेंट आगस्टीन याची एकाच खेड्यांत बिनलग्नाचीं सतरा मुलें होतीं. १२७४ सालीं बिशप तिसरा हेनरी याला त्याच्या बदफैली वागणुकीबद्दल गादीवरून पदच्युत केलें. त्याला बिनलग्नाचीं २५ मुलें असल्याचें आढळून आलें. रोमचें मुख्य पीठ, वेश्या स्त्रियांपासून कराच्या रूपानें प्राप्ति करून घेऊं लागलें. तें उत्पन्न २०००० डुकट नाण्याइतकें वाढलें होतें. मुख्य पाद्र्यापासून तें खालीं जोगीजोगिणीपर्यंत स्वाभाविक अस्वाभाविक सर्व प्रकारचे अनीतिमान प्रकार वाढले होते.

... "Often they preach an idealised asceticism while in secret they commit the most disgusting sexual excesses"
—Forel—Sexual Question.

" अंगीं लावूनिया राख, डोळे झांकुनि करिती पाप । दावुनि वैराग्याची कळा, भोगी विषयाचा सोहाळा," बुद्ध विहारांत असे सोहळे वाढले. हिंदुधर्मांतही देवाच्या नांवावर आयुष्य खर्चण्यासाठीं संन्यासदीक्षा घेतलेल्या देवदासी, देवळी, बसवी, मुरळी, जोगतीण जोगवीण, भावीण, नायकीण, कलावंतीण, मातंगी, शरणी वगैरे समाजमान्य धर्मकन्या वेश्या बनल्या आहेत. देहविक्रय हाच त्यांचा पोटाचा धंदा होऊन बसला आहे.

## ब्रह्मचर्य.

अति कोणतीही गोष्ट वाईट. इंद्रियांचे चोचले वाढवणें व त्या इंद्रियाचे गुलाम होणें वाईट. जिभेचे चोचले वाढवले तर त्याचा परिणाम पचनक्रियेवर होतो आणि त्यामुळें प्रकृति बिघडते. म्हणून कोणत्याही संवयी मर्यादित असणें, आरोग्यास पोषकच असतात. खादाडपणा वाईट म्हणून खाणेंच वर्ज्य करणें तितकेंच अपायकारक आहे. अपचन झालें असतां उपवास चांगला म्हणून उपवासच करत सुटल्यास तो प्रकृतीस अपायकारक झाल्याशिवाय राहणार नाहीं. भुकेनें प्राण कासावीस होऊन प्राण जाणार. विषयसुखाचा विचार करतांनासुद्धां असाच विचार करावा

लागेल. ब्रह्मचर्याची कल्पनासुद्धां 'प्रमाणापेक्षां अधिक ताणणें' निसर्गाचे हेतुविरुद्धच आहे.

ब्रह्मचर्य अगदीं शब्दशः पाळणें अशक्य आहे. ब्रह्मचर्य पाळण्याचा जो प्रमाणापेक्षां अधिक प्रयत्न करतो त्याचेच मनाला अधिक यातना होत असतात. वासनेपासून दूर पळण्यानें वासना सुटत नाहींत. त्यांचेवर ताबा ठेवून त्यांना आपल्या आधीन ठेवणें हेंच खऱ्या पुरुषार्थाचें लक्षण आहे. प्रपंच करून परमार्थ साधणारा हाच खरा साधक होय. जनक व श्रीकृष्णांनीं हा मार्ग आचरणानें दाखवला आहे.

प्रकृतीचा व आरोग्याचाच विचार केला तर आज असें सिद्ध झालें आहे कीं, लग्न न झालेल्यापेक्षां लग्न झालेला मनुष्यच अधिक जगतो. पुष्कळ वेळां आपल्यालाच दिसून येतें कीं, वयानें वाढलेल्या मुली लग्नापूर्वी कृश असतात पण लग्नानंतर त्यांची प्रकृति सुधारते. तसेंच वाहेरख्याली नवऱ्याच्या, किंवा म्हाताऱ्याशीं जखडून गेलेल्या व विधवा स्त्रिया, बळजबरीच्या ब्रह्मचर्यामुळें, रोगी, अशक्त, चिडखोर व त्रासिक बनल्या आहेत. नियमित समागमानेंच आयुष्य सुखमय व समाधानी होतें. त्याला इतर विचाराला वाव मिळतो. तो लोकांपासून फटकून दूर न राहतां लोकांत मिळून मिसळून लोकसेवा करूं शकतो.

चार पांच मुलें झालेल्यांनीं ब्रह्मचर्याचा उपदेश करावा व त्यांनीं तो पाळावा. त्यांना तो पाळतां येईल व फारसा त्रास होणार नाहीं. त्यांच्या प्रकृतीला तो पोषक होईल.

स्त्री–समागम केवळ मुलासाठींच असतो असें नाहीं. लग्नबंधन मुलांसाठीं असूं शकेल. स्त्रीसहवास ही एक नैसर्गिक इच्छा आहे. ब्रह्मचर्य नैसर्गिक नाहीं. तसें असतें तर स्त्री–पुरुष भेदच निर्माण केले नसते. निसर्गावर ताबा ठेवतांनासुद्धां निसर्गाची मदत घ्यावीच लागते. त्याचे गुलाम झालें नाहीं म्हणजे झालें. या बाबतींतले प्रसिद्ध संशोधक हॅव्हलॉक एलिस हे म्हणतात कीं, " नियमित समागमानें आत्मैक्याला मदतच होत असते. यामुळें मनुष्यांतील कित्येक झांकल्या गुणांना चालना मिळते. दोन व्यक्ती एकजीव होणें हें, स्वतःला विसरण्याचें हें एक साधन आहे. "

अग्नि स्वतः वाईट नाहीं त्याचा दुरुपयोग केला तरच अनिष्ट प्रकार घडून येतात. कामाग्नीचीही पण तीच गोष्ट आहे. वृद्ध ऋषींनीं, पौरुष्यहीनांनीं किंवा विषयसुखानें विटलेल्यांनीं किंवा निराश झालेल्यांनींच याला कडक बंधन घातलें आहे. गृहस्थाश्रमानें मनुष्य पतन पावतो असें हिंदुधर्म कांहीं मानत नाहीं.

'कुटुंबवत्सलाचे घरींच उतरावें. ज्याचें लग्न झालें नाहीं त्याचे घरीं पाहुणचार घेऊं नये व अन्न सेवन करूं नये' ही आज्ञा ब्रह्मचर्याविरुद्धच आहे. रामदास म्हणतात–

"आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ विवेका। येथें आळस करूं नका। विवेकी हो ॥ १ ॥ प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण। प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा ॥ २ ॥ याकारणें गृहस्थाश्रम। सकळांमध्यें उत्तमोत्तम। परंतु पाहिजे स्वधर्म। आणि भूतदया ॥

आशा न टाकतां वरपांगी सोंगानें वासनात्याग होत नाहीं, तर तो उलट बळावतो. त्रिकाल स्नानानें, भस्माच्या चोपडण्यानें, जटाभारानें किंवा भादरण्यानें संन्यासी होत नसतो. "कान फाड कर नाथ कहत है अनाथ घरघर फिरे। धागा भरके कंथा पहिरे आंगा ब्रभूत भरपूरे ॥ संतत संपत सुखके छपावे रामभजन का टारा। माया लोभी झूटे भडवे कोइ न पावे धारा।
—कबीर.

## निसर्गस्वभावाला कोण बांधणार?

या परस्परविरोधी आचरणावरून हेंच अनुमान निघतें कीं, स्त्री–पुरुष सहवासावर देहाचीं, समाजाचीं, धर्माचीं किंवा कायद्याचीं बंधनें घातलीं तरी त्यानें मूळ जातिस्वभाव बदलूं शकत नाहीं. कामुक पुरुष स्त्री संन्यासी आहे कीं कुमारी आहे याचा विचार करीत बसत नसतो. "तोवरि तोवरि वैराग्याच्या गोष्टी, जोवरि सुंदर वनिता देखिली नाहीं" –(तुका). देहभूक व प्रेमभूक यांवरचीं बंधनें स्वेच्छेनें कोणी पाळत नसतात. निसर्गाला 'अभेद्य' बांध घालणें अस्वाभाविक आहे, तसा बांध घालतां येणार नाहीं हें हजारों उदाहरणांनीं सिद्ध झालें आहे व आजहि डोळ्यांसमोर व कानांवर या गोष्टी रोज आदळत आहेत. या विषयाबाबत ज्यांनीं आपलें सर्व

आयुष्य खर्चलें आहे व या विषयांतील ज्यांच्या विधानाला संशोधक मान देतात, नव्हे आधार म्हणून समजतात ते प्रसिद्ध ग्रंथकार व संशोधक हॅवलॉक एलीस म्हणतात.

" शरीरसंबंधाचा व समाजाचा कांहीं संबंध लागत नाहीं. ही गोष्ट इतर शरीरक्रियांपैकींच एक आहे. यांत डोकें घालणें म्हणजे जुलूम नसला तरी आगांतुकी खास आहे. "

असे विचार आपल्या समाजाला खपणार नाहींत, पण कृति मात्र तो सहज खपवून घेत असतो. ढळढळीत डोळ्यादेखत असें आचरण ठेवणाऱ्या श्रीमंतांचा समाज अनादर करीत नाहीं.

सहवास व प्रेम या व्यक्तिविषयक गोष्टी आहेत. मग प्रेमसंबंध घडल्यास तो संबंध तोडणें किंवा राखणें या गोष्टी एकमेकांच्या वागणुकीवरच अवलंबून असतात. पुरुषाची स्त्रीवर, किंवा स्त्रीची पुरुषावर, इस्टेटींतील इतर निर्जीव वस्तूप्रमाणें पूर्ण मालकी सांगतां येणें शक्य नाहीं. स्वतःच्या आवडीनावडीचा, सुखदुःखाचा नडीअडीचा विचार करण्यास स्त्री-पुरुष स्वतः पूर्ण समर्थ आहेत. बुद्धीनें व मनानें कोण कोणापेक्षां वरचढ आहे असें नाहीं. परिस्थितीमुळें स्त्रिया अधिक निर्बल झाल्या आहेत एवढेंच. तेव्हां लग्नसंबंधांत असें परस्परांचें स्वातंत्र्य मान्य केलें, दोघांचा दर्जा सारखा मानला म्हणजे मग विवाहसंस्कार हा बंधनकारक न वाटतां दोघांच्या प्रेमाची वाढ करणारा व त्या प्रेमाचें संरक्षण करणारा एक पवित्र संस्कार वाटूं लागेल.

ही "बंधनाची कल्पना काढून टाकली म्हणजे विवाह आजच्यापेक्षां पुष्कळ सुखाचा होईल!" ( बर्नार्ड शॉ. )

## पैशाअडक्यांत बायको जमा!

या मालकीच्या कल्पनेनेंच पुरुषांनीं स्त्रियांना पूर्ण गुलाम बनवलें आहे. धनधान्य वगैरे निर्जीव वस्तूंत स्त्रीची जमा झाली आहे. नवऱ्याच्या त्रासानें किंवा कांहीं अन्यकारणामुळें स्त्री दुसऱ्याचे घरीं नवरा सोडून गेली तर ती एक चोरी समजली जाते व दिवाणी व फौजदारी दोन्ही कायद्यांच्या पकडींत तीं जोडपीं सांपडतात.

एखाद्या वस्तूची चोरी व्हावयाची म्हणजे त्या गोष्टींची त्या वस्तूला

जाणीव नसते. त्या गोष्टीच्या संमतीचा त्यांत अभाव असतो. तेव्हां आपण संपादन केलेल्या किंवा आपल्या ताब्यांत असलेल्या वस्तूचा दुसऱ्यांनीं अपहार करूं नये व प्रत्येक मनुष्याला आर्थिक स्वास्थ्य वाटावें म्हणून कायद्यानें म्हणजेच सरकारानें त्याला संरक्षण दिलें आहे. चोरी हा गुन्हा ठरवलेला आहे.

पण स्त्रीला स्वतःचे हातपाय आहेत. मन आहे. बुद्धि आहे. तिची स्वतःची आवडनिवड आहे. संमती देणें ही गोष्ट तिच्या हातची आहे. अशा स्थितींत स्वखुषीनें परक्याच्या आश्रयाला स्त्री गेली असतां त्या मनुष्यावर चोरीचा आरोप करतां येईल काय? ती निर्जीव वस्तू नाहीं. पण सजीव असूनहि पुरुष तिला साध्या माणुसकीचे हक्क देऊं इच्छित नाहीं.

आपली वस्तू दुसऱ्यांनीं अपहार करूं नये याकरितां तिचें संरक्षण करावें लागतें. म्हणून राजसत्तेनें ती जबाबदारी पतकरली आहे. पण स्त्रियांच्या बाबतींत तें संरक्षण असूनहि चोरीच्या भीतीनें बायकांना, विशेषतः मराठा, मुसलमान वगैरे समाजांतील पुरुषांनीं कडी कुलपांत कोंडून ठेवलें आहे.

## गोषा कीं बायकोची दडवणूक?

मालकीची वस्तू दडवून ठेवणें हीच मनोवृत्ति गोषाच्या चालींत झांकलेली स्पष्ट आहे. आपली स्त्री दुसऱ्यानें नेऊं नये, आपल्या खेरीज दुसरा मनुष्य तिला दिसूं नये. दुसऱ्याचे नजरेस तिनें पडूं नये, आपल्या स्त्रीचें दुसऱ्यावर व त्याचें आपल्या स्त्रीवर लक्ष वेधूं नये म्हणून पुरुषांतील विशिष्टवर्गानें आपल्या बायकांना गोषाच्या तिजोरींत बंद करून करून ठेवलें आहे.

"संसारांत दुःख होतें तें संकुचित भावनेमुळें, मालकीच्या कल्पनेमुळें होतें. तसें झालें म्हणजे स्त्रीपुरुषांचे संबंध भिन्न होतात व तंटे उपस्थित होतात, आपल्या स्वतःच्या तसेंच आपल्या स्त्रीच्या देहावर आत्मबुद्धीनें प्रीति करणें, स्त्री ही आपली आहे अशा प्रकारची मालकीची कल्पना असणें हा मोठा दोष आहे." —स्वामी रामतीर्थ.

तिनें रात्रंदिवस घरीं रहावें. स्वयंपाक करावा, घराची झाडलोट करुन

निगा राखावी, मुलांची व आपली शुश्रूषा करावी, नवऱ्याची हुकुमाची उपभोग्य वस्तू व्हावी, अशी भूतदयाविरहित गुलामगिरी स्त्रियांवर पुरुषवर्गानें स्वार्थांध होऊन लादलेली आहे.

## जन्मठेप काळेपाणी.

एकदा कां स्त्री चतुर्भुज झाली कीं कायमची चतुर्भुजच! जन्मठेप काळ्यापाण्यांची शिक्षा यापेक्षां किती तरी चांगली! कैद्यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली तर त्यांना भरपूर ऊन, वारा मिळतो. देहाला श्रम मिळतात. सूर्यदर्शनाचा लाभ मिळतो. पण आमच्या स्त्रीवर्गाला म्हणजे गोषांतील स्त्रियांना, पुरुषवाचक सूर्याचेंहि दर्शन घडूं नये म्हणून नवऱ्यानें खबरदारी घेतलेली असते. ईश्वरनिर्मित सर्व प्राणिमात्रांना, दगडधोंड्यांना मिळणारा स्वाभाविक उन्हावाऱ्याचा, सृष्टिसौंदर्याचा फायदा घेणें स्त्रियांना बंद केलें आहे. आपल्याच हाडामांसाच्या, आपल्या सेवेसाठीं सदैव तत्पर असलेल्या आपल्या 'अर्धांगीला' आपण किती हालांत ठेवतों याचा विचार गोषा ठेवणाऱ्या वर्गानें केव्हां केला आहे काय?

लग्नापूर्वी प्रफुल्लित दिसणारा चेहरा या गोषाच्या चालीनें थोड्याच दिवसांत कोमेजून पांढरा फटफटीत पडतो. खोलीच्या किंवा माजघराच्या पलीकडे पाय टाकण्याचें स्वातंत्र्य नसल्यामुळें तिचे पाय काम देत नाहींत. देहाला हालचालींचे श्रम नसल्यामुळें कंबर जाते. त्यांत मुलाचा बोजा पडला म्हणजे बाळंतरोगाला ठाण सांपडतें व मुलाची संगोपना करण्यास ती जिवंत रहात नाहीं. हिच्या मरणानंतर मूलहि तिच्या सहवासाला पाठोपाठ जातें. म्हणजे स्वार्थासाठीं बसवलेल्या गोषानें पुढची पिढी रोगी बनत जाऊन नामशेष होण्याच्या पंथास लागते. ती जगलीच तर अकर्तृत्वान, रोगी, भूभारच होते. नीग्रोंचे व अस्पृश्यांचे तरी इतके हाल होत असतील काय? "भूतदया हाच साऱ्या धर्मांचा धर्म. भूतदयेला थारा देत नाहीं, दुःखितांचें दुःख जाणत नाहीं तो धर्म कशाचा?" —(पुण्यप्रभाव.)

सुशिक्षित मराठ्यांत ही चाल कमी होण्याऐवजीं ती नसलेली वाढत आहे, गोषाच्या चालीला समाजांत मान्यता आहे. श्रीमंतीचें व

थोरपणाचें तें लक्षण झालें आहे. कांहीं सुशिक्षित मराठे आपल्या घरीं पूर्वी नसलेली गोषाची चाल, ते श्रीमंत झाले, वडे पगारवाले झाले म्हणजे सुरू करतात. अशा गोष्टी लेखकाच्या प्रत्यक्ष पाहण्यांत आहेत, व हे लोक चांगले बी. ए., एम. ए. किंवा एल. एल. बी असे आहेत. मग ही त्यांची अधोगति कीं उन्नति म्हणावयाची?

मराठ्यांच्या बायका बहुधा अशिक्षित. श्रीमतांच्या घरीं नोकर लोक ठेवेला असल्यामुळें बाईसाहेबांना खाण्याझोंपण्याखेरीज दुसरें कोणचें काम पडत नाहीं. झाडलोट करण्याला नोकर, गाद्या बिछाइतीला नोकर, स्वयंपाकाला बाई, मुलाला दाई, चहापाण्याला पोऱ्या, अशा स्थितींत बाईसाहेबांचा दिवस पहाटे नऊ वाजतां उगवल्यास काय नवल? कांहींच काम नसल्यामुळें कंबर जाणें किंवा अंगयष्टि भरपूर स्थूल होणें हें स्वाभाविकच आहे. फुरसतीच्या वेळीं वाचतां आलेंच तर गुलबकावली, चटकचांदणी, किंवा एकआणा मालेंतील सरस गोष्टी येथपर्यंत मजल! सुग्रास अन्न, निकामी वेळ व प्रणयी गोष्टी, या नीतीला केव्हांच पोषक नसतात; तेव्हां त्यांनीं स्वैर आचार उचलल्यास त्यांत बायकांना दोष देण्यापेक्षां परिस्थिति निर्माण करणाऱ्या पुरुषांनाच द्यावा लागेल. मनरंजनार्थ पिंजऱ्यांत बाळगलेली मैना व श्रीमंतानें पडद्याआड बाळगलेली सुस्वरूप कन्या यांत कोणचें अंतर असतें? मैनेला अकल नसते व घरमैनेच्या अकलेला फाटे फुटण्याचा फार संभव असतो! तेव्हां आर्थिकदृष्ट्या नोकरांचा बोजा वाढवणारा, शारीरिक दृष्ट्या देहाची हानि करणारा, व नैतिक दृष्ट्या मनाला बिघडवणारा हा पापी पडदा मराठा तसाच मुसलमान समाजानें स्वार्थासाठीं म्हणून तरी लवकर काढला पाहिजे.

'न कश्चिद्योषितः शक्तः प्रसह्य परिरक्षितुम्। मनु. अ. ९ श्लो. ९ प्रतिबंधादि बलात्कारानें स्त्रीचें रक्षण करण्यास कोणीहि समर्थ नसतो.

गोषानें बायकांना दडवून ठेवलें म्हणजे त्यांची नीति सुधारेल, त्या शुद्ध राहतील, ही कल्पना मूर्खपणापेक्षां मत्सरानें अधिक भरली आहे. परस्परावर विश्वास व प्रेम असल्यानंतर हजारों मनुष्यांच्या सहवासांत स्त्री शुद्ध राहूं शकेल. ती वाईट इच्छेनें कुणाकडे डोळा उघडूनही बघणार नाहीं. गोषाच्या

तुरुंगांत टाकल्यानें तुरुंग मोडण्याचीच इच्छा उत्पन्न होणार. ईव्हला फळ न खाण्याची आज्ञा केल्याबरोबर तिला ती मोडावी अशी बुद्धि उत्पन्न झाली! परपुरुषाकडे पाहणें हें पाप अशी कल्पना मनांत घातली तर बुरख्यांतून चोरून पाहण्याची बुद्धि होणारच! अंधार व अज्ञान ह्या पापाच्या जागा आहेत. स्त्रियांना अज्ञानांत ठेवून पुनः अंधारांत ठेवण्यानेंच गोषांतील गुप्तरहस्यांना वाव मिळतो! मुसलमानांत तर गोषाची चाल भयंकर! आपल्या घरांत गोषाच्या बुरख्यांतून कोण स्त्री आली तर ती समजणें अशक्य! त्यामुळें परपुरुषानें बुरखा पांघरून घरीं धिंगाणा घातला तर त्याचा पत्ता लागणें मुष्कीलीचें असतें. गोषामुळें जगांतील सुशिक्षित व सुसंस्कृत लोकांची ओळख होत नाहीं. मन प्रगल्भ होत नाहीं. संबंध व सहवास जुळतो तो घरच्या झाडलोट करणाऱ्या गोण्या गोंद्याशींच! या गोषाआड, रेनाल्ड-सारख्या कादंबरीकाराला आयुष्यभर पुरण्याइतकीं रहस्यें सांपडतील! स्वच्छ निर्मल मनानें, स्वच्छ उघड्या हवेंत आणण्यानेंच स्त्रिया नीतिमान् होतील. सीता, सावित्री द्रौपदी या साध्वी या गोषांत नव्हत्या.

"Men to be men must be able to trust there woman folk." —*M K. Gandhi* विश्वासापासून विश्वास वाढतो.

ब्राह्मणांच्या स्त्रिया गोषांत नसतात व इतर देशांतल्याहि नसतात म्हणून त्या अनीतिमान् आहेत असें म्हणतां येईल काय? उघड्या वातावरणांत वावरल्यानें व्यवहार अधिक समजतो. व्यवहार समजूं लागल्यानें त्या भोंदूंच्या जाळ्यांत सहजासहजीं सांपडत नाहींत. नीतीच्या रोपट्यालासुद्धां उघडी जागा, उन्ह व वारा लागतो. अंधारांत नीतीचें रोपटेंहीं वाढत नाहीं.

स्त्रियांच्या हातीं सत्ता असती आणि त्यांनीं आपला नवरा स्त्रियांचे नजरेस पडूं नये व त्यानें आपल्याव्यतिरिक्त दुसऱ्या स्त्रीकडे पाहूं नये म्हणून जर असाच निर्बंध पुरुषांवर घातला असता तर तो सहन झाला असता काय?

पुरुषवर्गाच्या अन्यायाविरुद्ध स्त्रियांना बंडाळी करणें अशक्य झालें आहे. बंडाळीला परस्पर सहवास, ऐक्य व संघटना व्हावी लागते. स्त्रियांची अशी संघटना होणें अशक्य आहे. त्यांना एकत्र जमणें, विचार-विनिमय करणें अशक्य आहे. कारण त्यांच्यावर अनियंत्रित सत्ता चालव-णारा, त्यांची बंडाळी मोडणारा, त्यांचेवर सतत पाहरा करणारा संती घरां-

तच पतिराजाच्या रूपानें सदैव हजर आहे. तो त्यांना अशी हालचाल करूं देणार नाहीं. क्षणांत खास ऑर्डिनन्स काढून, मार्शल लॉ पुकारून प्रजेचा बंदोबस्त करण्याला 'चारी पायांवर' तो तयार आहे. (!) कारण माणुसकी सोडलेल्या माणसांना 'माणूस' ही संज्ञा तरी कशी द्यावयाची? अशा पशूंच्या सत्तेखालीं स्त्रिया चिरडल्या जात आहेत. त्या घराबाहेर पडत नाहींत, सभा भरवत नाहींत, लिखाणें लिहून आपली स्थिति लोकांपुढें मांडीत नाहींत, म्हणून त्या सुखी आहेत असें म्हणतां येईल काय?

# प्रकरण पांचवें

## स्त्रियांची पूजा.

**यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः।**

वरील, स्त्रियांच्याबद्दलचा गौरवपूर्ण श्लोक वाचला म्हणजे आपल्या हिंदुसमाजाबद्दल अभिमानच वाटायला पाहिजे. पण हें वाक्य म्हणजे पद्धतशीर बसवलेल्या गुलामगिरीला ' शर्करावगुंठन' च आहे. आजची परिस्थिति काय आहे याचा विचार केला म्हणजे आमच्या स्त्रियांची आम्ही चांगली पूजा ( ! ) करतों खरी! शाब्दिकपूजा, पाद्यपूजा (पायपोसानें) व घराबाहेर समाज पूजा करतो ती निराळीच !

स्वयंपाक घरांत सासूबाईच्या शिव्यांची संततधार सारखी सुरू असते. उंबरठ्याबाहेर ओळखीपाळखीच्या घरीं घटकाभर सोबतिणीशीं चार शब्द बोलायला गेल्यास ' इनं घराबाहेर पाऊल टाकलं ' म्हणून शेजाऱ्या आयाबाया ' कांव कांव ' करूं लागल्याच ! नवरदेव सुशिक्षित असले तर संशयाचा फायदा केव्हां केव्हां आरोपीला मिळतो, नाहीं तर बहुधा सासूबाईच्या कानफुंकीनें सूनबाईचे कान बहुधा ढिले होतात.

लहानपणीं लग्न झाल्यानें सासूबाईला पडत्या बोलांची आज्ञा मानणारी मोलकरीण मिळते खरी ! मोलकरणीच्या रूपारंगापेक्षां पैसा अडका व कुळाची बरोबरी सासूसासऱ्यानें पाहिल्यामुळें, नवऱ्याच्या गळ्यांत यांच्याच आवडीची मुलगी पडल्यामुळें नवरा मुलगा पुढें बिनलग्नाच्या मुली धुंडूं लागतो! अशी अंगवस्त्राची गांठ पडली म्हणजे लग्नगांठ सुटूं लागते ! तिच्या रूपाबद्दल ईश्वर जबाबदार असला आणि शेलक्या निवडणुकीबद्दल सासूसासरे जबाबदार असले तरी मुलाच्या बाहेरख्याली वर्तणुकीचें खापर मात्र त्या बिच्याऱ्या मुलीच्या कुरूपावर आदळतें! आहे कीं नाहीं न्याय? चोराला सोडून संन्याशाला फांशी ! आमच्या गृहदेवतांची अशी पूजा घरोघरीं चालली असते बरें !

इंग्रज सरकारच्या जाहिरनाम्यांतील गोड शब्दांचा व कृतीचा किती संबंध ठेवायचा तें सिव्हिलियन्सना बरोबर माहित असतें व ते त्या

अनुरोधानेंच त्याची अंमलबजावणी करीत असतात. तसें मनुस्मृतिकारांच्या लेखणींतून सुटलेल्या कांहीं श्लोकांना किती महत्व द्यायचें व त्याची अंमलबजावणी कुठपर्यंत करायची, हें त्यांचें हृद्गत जाणणाऱ्या ब्रह्मवृंदांनाच माहित असल्यामुळें ग्रंथाबाहेर त्या मतांना वाव मिळालेला नाहीं.

### स्त्रियांची पूजा होते खरी

देव्हाऱ्यांतल्या देवाला नटवावें, त्याला पंचपक्वान्नाचीं ताटें नैवेद्य म्हणून द्यावींत, पण खात्री असते कीं, तो कांहीं दागिने पळवत नाहीं, कीं ताट फस्त करत नाहीं.

आमच्या बायकांची पण गत हीच. त्यांना दागिन्यांनीं मढवाव्या सजवाव्या पण मुलगी माहेरीं घरीं निघाली तर मंगळसूत्राखेरीज सर्व दागिने उतरून तिला सासऱ्याच्या स्वाधीन करावे लागतात. स्वयपांकघरांत तिनें सजवून घ्यावेंसें वाटल्यास घ्यावें! किती विश्वास आणि आपलेपणा हा? मुलगी दुसऱ्या घरीं मालकीण म्हणून असली तरी सासरच्या सुतळी तोड्यावरही तिची सत्ता नसते. कांदामिरचीसाठीं पै पैसा घटकोघटकीं देणें कंटाळवाणें म्हणून घरधनीणीच्या हातीं केव्हां केव्हां पैसा खेळतो' पण त्यावरही अविश्वासाची करडी नजर राहतेच! पोटच्या पोराची सहधर्मचारिणी व होणाऱ्या वारस नातवाची आई, पण तिच्या अंगावर दागिना ठेवणें सासऱ्याला होत नाहीं. त्याची शाश्वती वाटत नाहीं!

## पोटाची गुलाम.

" Society has forged thousand and one customs to subjugate woman hoplessly to man. (Tagore.)

" स्त्रीला गुलाम करण्याकरितां माणसांनीं हजारो चाली उकरून काढल्या आहेत "—टॅगोर.

राक्षसी विवाहानें स्त्रिया सत्तेच्या गुलाम झाल्या, धर्मानें त्या बुद्धीच्या गुलाम झाल्या, रूढीनें व लोकनिंदेच्या भीतीनें त्या समाजाच्या गुलाम बनल्या व कायद्यानें सर्वांवर आपल्या मान्यतेचा शिक्का मारून त्यांचे हातपाय मोडून टाकले व आर्थिक पारतंत्र्यानें त्यांना पोटाचे गुलाम



पोटाची गुलाम.

केलें ! स्वतंत्रपणें धंदा करणें समाजभयानें बंद झालें. शिक्षणाभावी स्वतंत्र नोकरी लागणें अशक्य. घरकाम हें स्त्रियांचें स्वाभाविक काम अशी समजूत करून घेतल्यामुळें त्यांच्या श्रमाची किंमतच नाहीं. कित्येक वर्षें नवऱ्याची सेवा केली, पण कांहीं विशिष्ट प्रसंगामुळें बेबनाव होऊन जर नवऱ्यानें बायकोस घराबाहेर काढलें तर तिला पैशाचा आधार रहात नाहीं. सर्व जन्म राबलें तरी तिला हक्काचा पैसा नाहीं. यामुळें स्त्री कायावाचामनें पुरुषांची गुलाम बनली. त्यांतून तिची सुटका होणें आज अशक्य झालें आहे. स्वतंत्र राहिल्यास समाजाच्या निंदेला तोंड देण्याची त्यांच्या अंगीं ताकद नाहीं. नवऱ्याखेरीज राहणारी स्त्री म्हणजे खात्रीनें अनीतिमानच असली पाहिजे अशी समाजानें आपली ठाम समजूत करून घेतली आहे. विधवा वाट चुकली व रस्ता विचारूं लागली तर ती वाईट रस्त्याला लागली असें विधान समाज बिनदिक्कत करतो. लग्नाशिवाय

राहायचें तर उपाशीच रहायला पाहिजे. स्त्रीस स्वतंत्रपणें स्वतःच्या पायावर उभें राहून पोटास मिळवणें हिंदु समाजानें बहुतेक अशक्य करून सोडलें आहे. वेदकालीं स्त्रियांना जो मान मिळत होता तो आतां मिळत नाहीं. त्या कालीं स्त्रियांनीं लग्न केलेंच पाहिजे, नाहीं तर समाजांत त्यांना मान नाहीं, असें नव्हतें. बायकोच्या परवानगीशिवाय इस्टेटीची वाताहात करणें, कुणाला देणगी देणें, वगैरे गोष्टी नवऱ्यास करतां येत नव्हत्या. आजच्या सारखी पुनर्विवाहास बंदी नव्हती. लग्न हा स्त्रियांच्या पोटाचा प्रश्न होऊन बसल्यामुळें हे बंधन त्यांना स्वखुषीनें लावून घेणें भाग झालें आहे.

" पुरुष स्वतःच्या विषयसुखासाठीं लग्नाचा पुरस्कार करतो व स्त्रीला आर्थिक पारतंत्र्यामुळें त्याचा आधार सोडवत नाहीं " ( बर्नर्ड शॉ. ) या आर्थिक पारतंत्र्याचा फायदा पुरुषानें स्त्रियांना छळण्याकडे भरपूर करून घेतला आहे.

पुरुषाला लग्न करणें आर्थिकदृष्ट्या फार फायद्याचें पडतें. घरीं इमानानें काम करून पैशाची म्हणजे वेतनाची अपेक्षा न करणारी, निव्वळ जेवण करून पोटावारी काम करणारी मोलकरीण आज मिळत नाहीं. पगारी मिळाली तरी इमानी मिळत नाहीं. बहुधा चटणीमिठापासून लांबवालांबव करणारीच मिळते. आपलेपणानें घरची व्यवस्था करून पुनः मोबदल्याची अपेक्षा न करणारी स्त्री हिंदू स्त्रीखेरीज इतरत्र कुठें आढळणार? लग्नाच्या अक्षता पडल्या कीं पुरे, पगार नको कांहीं नको, बारा तास हमाली करून काडीवर सत्ता नसतांही सुतळी तोड्याची जिवापलीकडे काळजी घेणारी स्त्री लग्नानें पैदा होते. अंगवस्त्राचे पाय चेपून रात्रीं मध्यान्हीपुढें स्वारी घरीं आली तरी, 'नवऱ्याच्या आधीं लवंडायला मस्ती आली काय,' म्हणून लाथ मारायला नवरदेव तयारच असतात. बरें ज्याला अंगवस्त्राचा खर्च झेपत नाहीं त्यालाही लग्नाची स्त्री फारच स्वस्तांत पडते. व स्त्रीला इतर कोणचाही मार्ग समाजानें मोकळा ठेवला नसल्यामुळें पोटासाठीं नवऱ्याच्या वाटेल त्या आज्ञा त्याच्या इच्छेप्रमाणें पुऱ्या कराव्या लागतात.

पुष्कळ वेळां पैशासाठीं कुरूप नवरी स्वीकारून त्याच हुंड्यांत रखेलीची बडदास्त ठेवणारे ' हरीचे लाल ' किती तरी सांपडतील! तिचाच पैसा

घेऊन तिच्याच प्रेमाला पायाखालीं तुडवणारे, तिच्या जिवाला चितेवर ठेवून, त्याच चितेवर पोळी भाजून घेणारे नराधम या आमच्या हिंदुसमाजांत कमी अढळणार नाहींत. स्वतःच्या सुखलालसा भागल्या म्हणजे झालें. मग आपल्या विवाहित स्त्रीच्या हृदयाच्या चिंधड्या चिंधड्या झाल्या तरी तिकडे ते लक्ष देणार नाहींत. सहवासाचें सुख तरी राहूंदेच पण प्रेमाचा ओझरता शब्दही तिचे कानावर पडणार नाहीं. स्त्रीला हृदय म्हणून कांहीं पदार्थ आहे हें समजून वागणार महात्मे किती मिळतील!!

दळण कांडण करून वेळच्या वेळीं पोटाचे लाड पुरवणारें, झाडलोट सारवण करून घरचें साफसूफ करणारें व आपली विषयेच्छा इच्छेप्रमाणें पुरी पाडणारें, एक हाडामांसाचें चालतें बोलतें यंत्र म्हणजे आमची विवाहित स्त्री! असें हें यंत्र लग्नाचा फासा टाकला कीं सहज अडकून पडतें!

नवऱ्यानें वाटेल त्या गोष्टी बायकोचे डोळयासमोर केल्या, तरी तिला डोळेझांक करावी लागते. अंतःकरण दगडाचें करून दिसणाऱ्या सर्व गोष्टी नवऱ्याच्याच अन्नसाठीं म्हणून दडवाव्या लागतात. नवऱ्यानें दुराचारी व्हावें, दारूबाज व्हावें, बदफैली व्हावें, डोळ्यादेखत परस्त्रीला जवळ करावें, तिच्यादेखत तिला मारहाण करावी, पण सर्वांना सारखा पहाणारा म्हणून समजलेला कायदा स्त्रियांबाबत मात्र समान जोखणारा ताजवा टाकून देतो.

रावरंक सारखे पहाणारा, कुणाचें तोंड न पहाणारा कायदा स्त्रियांच्या बाबतींत निव्वळ डोळेझांक करून स्वस्थ बसत नाहीं; तर पुरुषाचा राजरोस पक्षपाती होतो! अन्यायाला मदत करतो. ‘पुरुष लोकमताचा’ म्हणजेच त्याला आज आपण समाज म्हणतों, तो समाजहि पुरुषवर्गाला आपलें सहाय्य देतो. धर्महि आपला आधार पुरुषालाच देतो. कारण कायदा व धर्म हा पुरुषनिर्मितच आहे. उदाहरणादाखल प्रत्यक्ष घडलेल्या व कोर्टांत आलेल्याच गोष्टी देत आहें.

“मॅजिस्ट्रेट वर्ग १ समोर एका बाईनें नवऱ्यावर पोटगीचें काम चालविलें. तिची साक्ष घेण्याचा प्रसंग आला. बाईनें आपली अडचण कोर्टाला कळवली, कीं मी साक्षीला येतें. परंतु नवरा मला वाटेंतच

आढून नेईल. कोर्टाला दया आली. आपले शिपाई तिच्या घरीं संरक्षणासाठीं पाठवून तिला कचेरींत आणली. साक्ष झाली. पुनः कोर्टानें शिपाई बरोबर देऊन तिला कोर्टाच्या हद्दीबाहेर सुरक्षित पोहोंचवली. इतक्यांत काय झालें पहा ! त्या नवऱ्यानें रस्त्यावर मोटार ठेवली होती. चार लोक बरोबर घेतले होते. बाई रस्त्यावर येतांच सर्वांनीं मिळून उचलून तिला मोटारींत घातली. ती ओरडत असतां तो दृष्टिपार वेऊन गेला. आणि तेंहि परहद्दींत. त्यामुळें बायकोचें कांहीं चाललें नाहीं. मॅजिस्ट्रेट हात आंखडून स्वस्थ बसले!"

दुसरें एक उदाहरण जरा निराळ्या नमुन्याचें आहे.

"एक इसम दुराचारी व व्यसनी निघाला. आपल्या पशुवासना शांतपणें व अप्रतिबंध चालू ठेवाव्यात, त्यांत आपल्या स्त्रीच्या मनाचाहि अडथळा येऊं नये म्हणून त्यानें कांहीं कारण नसतां बायकोला मारहाण करून घराबाहेर घालवली. पोटासाठां तिनें दुसऱ्याचीं भांडीं वासणें, स्वयंपाक करणें पतकरलें. इकडे नवऱ्याचा दुराचार वाढला. रखेलीपासून त्याला तीन चार मुलें झालीं. अशीं १५ वर्षे गेलीं. बायकोनें आपल्या पोटाचे हाल होत आहेत म्हणून सोडचिठ्ठी मागितली. नवरा सोडचिठ्ठी देईना! तिचे हाल व्हावेत, तिनें उपाशी टाचा घांसतच मरावें, स्वतः नांदवून घेऊं नये, दुसऱ्याशीं तिनें ( पाट ) पुनर्विवाह लावून घेऊं नये ही त्याची इच्छा. इतकेंहि करून तो स्वस्थ बसला नाहीं. जिथें ती नोकरी करीत होती त्या घरांतून बाहेर पडलेली दिसतांच, सोडचिठ्ठी मागितल्याचा सूड म्हणून त्यानें तिच्या केसाला धरून रस्त्यावरून फरफटत घरीं नेऊन बेदम मारलें व रोज आपल्या रखेलीचीं लुगडीं धुण्यास लावलें."

अशीं उदाहरणें रोज आपल्या समाजांत घडत आहेत, खालच्या वर्गांत, तशींच वरच्याहि वर्गांत घडत आहेत. थोरामोठ्यांतील उदाहरणें चव्हाट्यावर येत नाहींत. त्या बिचाऱ्या साध्वी आंतल्या आंत झुरून मरत असतात. या सर्व गोष्टी आज इंग्रज सरकारच्या राज्यांत व्यक्तिस्वातंत्र्याच्या काळांत चालाव्यात व त्याचा विचारही होऊं नये!!

मजकूर छापखान्यांत जाण्यापूर्वीच एक गोष्ट पत्रांतून आली आहे ती मुद्दाम देत आहे.

## सरदार घराण्यांत पतिपत्निप्रकोप.

वर दिलेल्या उदाहरणासारखीच एक गोष्ट अगदी अलिकडे घडली आहे. १९३१ नोव्हेंबर १७ च्या ज्ञानप्रकाशच्या अंकांत सरदार घराण्यांत पतिपत्निप्रकोप या मथळ्याखालीं ती प्रसिद्ध झाली आहे. ती सारांशानें देत आहें " गेल्या शनिवारीं पुणें कॅंपमधील वेस्ट अँड सिनेमा गृहांत एक मोठा चमत्कारिक प्रसंग घडून आला. चित्रपट पाहण्यासाठीं......महाराजांच्या स्नुषा...या आपल्या भगिनी......सह बसल्या होत्या. बरोबर त्यांचे बंधू ...हजर होते. भगिनी सरदार...यांच्या पत्नी होत. गेले आठ नऊ महिने त्या आपल्या पतीजवळ रहात नाहींत. त्यांची मुलें मात्र त्यांचे पति सरदार ...यांजकडेच आहेत. थिएटरमध्यें सरदार...आपल्या पत्नी यांचे मागेंच बसले होते. त्यांनीं आपल्या पत्नीशीं बोलण्याचा प्रयत्न केला व त्यांना आपल्या घरीं परत बोलावलें असें म्हणतात. सौभाग्यवतींनीं ती विनंति साफ झिडकारली व आपल्या बंधूंना उद्देशून त्या म्हणाल्या कीं ' हे पहा मला त्रास देत आहेत ' तेव्हा बंधू रा...यांनीं डयूटीवर असलेल्या सार्जंटकडे एक इसम आपल्या बहिणीला त्रास देत आहे अशी तक्रार केली. पण ते पतिपत्नींचे भांडणामध्यें आपणास पडण्याचें कारण नाहीं असें म्हणाले व अतिप्रसंग टाळण्यासाठीं घरीं जाण्यास सुचविलें. त्याबरोबर ते आपल्या भगिनीस घेऊन थिएटरमधून बाहेर पडूं लागले. तेव्हा सरदार...यांनीं आपल्या पत्नीला हात धरून बाहेर असलेल्या मोटारीकडे ओढीत नेलें व त्यांच्या किंकाळयांना न जुमानतां त्यांनीं सौभाग्यवतींना मोटारींत घातलें व मोटार चालू केली. "

दुसरी एक राक्षसी क्रूरतेची गोष्ट यंग इंडियामध्यें ( ३-१९-२९ ) दिलेली आढळून आली ती अशी.—

## समोर व्यभिचार.

आपल्या बहिणीची कर्मकथा एकानें गांधीजींच्या कानावर घातली आहे. तिचा नवरा दुराचारी होता. त्याची वागणूक तिला आवडली नाहीं व त्याला ती टाकून बोलली म्हणून नवऱ्यानें तिला खांबाला बांधून तिच्यादेखत व्यभिचारकर्म केलें. बायकोच्या असहनशीलतेमुळें नव्हे तर भावाला ही गोष्ट

सहन झाली नाहीं म्हणून गोष्ट चव्हाट्यावर आली इतकेंच. अशा गोष्टींवर डोळेझांक करून, उघड्या डोळ्यांनीं आपलें मरण पाहणाऱ्या बायका आपल्या समाजांत पुष्कळ मिळतील! स्त्रियांनाच ज्यावेळीं तोंड फुटेल, स्त्रियाच ज्यावेळीं समाजाची भीति न बाळगतां आपली स्थिति निर्भीडपणें जगापुढें मांडतील, त्याचवेळीं आजच्या लग्नसंस्थेची खरी माहिती बाहेर येईल! स्वार्थी पुरुष-जातींनीं आमच्या स्मृत्या, आमचा धर्म, आमच्या लग्नसंस्था आकाशापर्यंत नेऊन भिडवल्या तरी ती स्तुति स्वार्थपूर्णच असते. मथुलक्ष्मी रेडी सारख्या कांहीं निर्भीड स्त्रिया वगळल्या तर सुशिक्षित स्त्रियांनासुद्धा आपलें अंतः-करण उघडें करतांना अद्याप समाजाची भीति वाटते.

नवरा म्हणजे देवाचा अवतार. त्याचें मन प्रसन्न ठेवणें, त्याला आवडतील त्या गोष्टीस मदत करणें हें स्त्रीचें कर्तव्य, ही समजूत स्त्रीच्या मनामध्यें बिंबवून इतर स्त्रियांना वश करून घेण्याकरितांही कित्येक "देव" आपल्या बायकोचा उपयोग करून घेत असतात. नवऱ्याचें सुख तेंच आपलें सुख हें तत्वज्ञान माता, सासू व आयाबायांच्या तोंडून नेहमी ऐकूं आल्यामुळें या वेदांताचा फायदा बदफैली नवऱ्याला करून घेतां येतो. असे अनंत प्रकार स्त्री आपल्या अज्ञानामुळें करीत असते. स्त्री अशा प्रकारें सर्वस्वी गुलाम बनली आहे व तिला संवयीमुळें त्या गुलामगिरीचें विशेष असें वाटतही पण नाहीं. जन्मभर तुरुंगांत असलेल्याला स्वातंत्र्य नको वाटतें, त्याप्रमाणें स्त्रीला स्वातंत्र्याची कल्पनाही आपल्या समाजांत अनीतीची वाटूं लागली आहे.

## एकांगी सहिष्णुता.

लग्नबंधनामुळें एका ठिकाणीं रहात असलेलीं पण मनानें पूर्ण परकीं असलेलीं, परस्परांबद्दल आदर, प्रेम किंवा सहानुभूति काडीमात्र नसलेलीं, अशीं कित्येक जोडपीं नाइलाजानें एकत्र रहात असतात. मंगलाष्टकें (?), सामाजिक निर्बंध व कायदा यांनीं डांबून टाकलेल्या या लग्नबंधनाच्या तुरुं-गांत हालअपेष्टा भोगत असलेल्या स्त्रियांना या गुलामगिरींतून बाहेर काढा-यला नको काय? त्यांची गांजणूक करून पुनः त्यांतून मोकळें होण्याची वाट बंद केली तर त्यांनीं अन्य मार्ग स्वीकारला तर दोष कुणाचा?

## इमानी आहे कोण ?

" No husband or wife yet born keeps marriage vows or even can keep them in the ideal sense " (B. Shaw.)

" कोणीहि नवरा बायको लग्नाच्या शपथा शब्दशः पाळत नसतात व पाळूं शकत नाहींत. " (बर्नार्ड शॉ.)

हें सत्य हिंदु धर्मोला पटलें आहे. त्यानें मनुष्यस्वभावाला धरून होणाऱ्या चुकांकडे दुर्लक्ष केलेंच आहे. लग्नाच्या स्त्रीशीं आपण एकनिष्ठ राहूं म्हणून 'बहुल्यावर' शपथा घेतल्या तर त्याच घडीससुद्धां समारंभास आलेल्या एखाद्या स्त्रीशीं तरी, त्याचा दृ व्यभिचार होतच असतो. ज्यांचें डोळेसुद्धा पापी नाहींत असा मनुष्य जगांत मिळेल काय? अशा झालेल्या पापालाहि खिस्तांनीं व्यभिचारांतच टाकलें आहे. अशींहि कांहीं उदाहरणें मिळतील कीं, एक लग्न पुरें होत नाहीं तोंच, त्याच माणसाचें दुसरें लग्न त्याच आठवड्यांत त्याच बहुल्यावर झालें आहे. ही तर राजरोस गोष्ट झाली. कित्येक जणांजवळ रखेली असूनहि ते पुनः जाणूनबुजून दुसऱ्या स्त्रीशीं लग्नसंबंध करूं इच्छितात. अशा गोष्टींना समाजानें पूर्ण सवलत दिली आहे.

## इंद्रियभूक हें प्रेम नव्हे.

" Love and sexual desire are two very different things " (Dr. Bauer—Woman.)

" इंद्रियलालसा व प्रेम या गोष्टी निरनिराळ्या आहेत " हें सर्वांनाच मान्य करावें लागेल. भूक व प्रेम या क्रिया भिन्न आहेत. भूक ही देहाची गरज आहे. प्रेम हा अंतःकरणाचा उमाळा आहे. केव्हां केव्हां लालसेतून प्रेम उद्भवत असलें तरी या गोष्टी अभेद्य आहेत असें नाहीं.

एखाद्यावेळीं स्वस्त्रीच्या गैरहजरींत म्हणा किंवा कामलोलुप होऊन म्हणा जर त्याचे हातून प्रमाद घडला तर लग्नसंबंध तोडण्याइतका किंवा जन्माच्या गांठी तोडण्याइतका मोठा प्रमाद त्याला म्हणतां येणार नाहीं. कारण लग्नाच्या बायकोला टाकून द्यावी हा त्याचा उद्देश नव्हता. विषयाधीन होऊन त्याच्या देहावरचा ताबा सुटला एवढेंच. गोष्ट त्याज्य असली तरी बंधन तोडण्याइतकी ती म्हणतां येत नाहीं, व आपल्या धर्मानेंहि तशी ती मानलेली नाहीं.

तसेंच आपली स्थिति गरीबीची आहे. आपल्याला मुलें, आजच्या समाज घटनेंत, झालीं तर त्यांचा खर्च झेपणार नाहीं. किंवा त्यांची योग्य जोपासना होणार नाहीं हें जाणून त्यानें लग्नाच्या स्त्रीव्यतिरिक्त संबंध ठेवला तर निग्रहाच्या दृष्टीनें तो पतित ठरेल पण लग्नाच्या स्त्रीवरचें त्याचें प्रेम नष्ट झालें असें म्हणतां येणार नाहीं.

तसेंच स्त्री रोगी असल्यास तिला टाकून द्यावी व दुसरें लग्न करावें असें नवऱ्याला वाटतेंच असें नाहीं. त्यांचें एकमेकांवरलें प्रेम कमी झालेलें नसतें. अशा स्थितींत लग्नसंबंध न तोडतां नाइलाजानें दुसऱ्या स्त्रीशीं सहवास केला तर त्याला कृतघ्नपणा म्हणतां येईल काय ?

अशा प्रकारच्या मनुष्यस्वभावांतील दुर्बलतेचा किंवा विशिष्ट प्रसंगामुळें उद्भवणाऱ्या अडचणींचा, ख्रिश्चन लोकांनीं विचार केलेला दिसत नाहीं. लग्नाव्यतिरिक्त कसल्याहि संबंधास ख्रिश्चन धर्मानें मान्यता दिलेली नाहीं. त्यांतील प्रॉटेस्टंट लोकांनीं मात्र घटस्फोटास मान्यता दिली आहे. याला धर्मसुधारक लूथर हे कारणीभूत आहेत. हिंदुधर्मानें या बाबतींत बरीच सवलत ठेवली आहे. पण ती सर्व सवलत फक्त पुरुषवर्गच भोगत आहे. लग्नबंधनाला महत्व देऊन एवढ्या तेवढ्या चुकीसाठीं तें मोडूं नये या तत्त्वाला मान्यता मिळाली पण त्याचा फायदा पुरुषवर्गानें आपल्याच पदरांत सर्वस्वीं पाडून घेतला आहे. स्त्री–पुरुषाच्या समानत्वाला समाजानें, धर्मानें व कायद्यानें मान्यता दिलेली नाहीं.

## मेल्यावरहि एकनिष्ठपणा.

पुरुष आपल्या स्त्रीपासून कडकडीत पावित्र्याची अपेक्षा करतो हें योग्यच झालें. पण तो ही अपेक्षा आपल्या हयातीपुरतीच करून रहात नाहीं, तर आपल्या पश्चात्‌हि स्त्रीनें दुसऱ्या पुरुषाच्या आश्रयास जाऊं नये व प्रेम करूं नये अशा मत्सरानें प्रेरित होऊन पति मेल्यानंतरहि उच्च म्हणून समजल्या गेलेल्या वर्गानें त्यांच्या स्त्रियांच्या पुनर्विवाहास बंदी केली आहे. महदाश्चर्याची गोष्ट कीं, ही मेल्यानंतरची इच्छा पार पाडली जात आहे कीं नाहीं हें पाहण्याचें काम समाज जागरूकपणें पाहरेकऱ्यासारखा पाळत ठेवून पहात असतो.

 ९४७८

## केशवपन.

नवरा मेल्यानंतर पुनर्विवाहाला बंदी करून पुरुष थांबला नाहीं. त्याचा मत्सर अतिरेकाला गेला आहे. सुस्वरूप विधवेला दुसऱ्याकडे पाहणेंच लाजिरवाणें वाटावें व दुसऱ्या पुरुषाची वासना तिजवर होऊं नये म्हणून, तिचे सौंदर्य खुलविणारा देवानें दिलेला केशकलापच काढून टाकण्याची निर्घृण काळालाही काळिमा लावणारी, केशवपनाची राक्षसी रूढी उच्च वर्णानें पाडली. कालानें नवरा ओढून नेला या ईश्वरी आपत्तीबद्दल निर्दोष बालिकेला यमयातना पुरुषांनीं द्याव्यात! चोर, दरोडेखोराप्रमाणें, तिला कमी लेखून तिचें अन्न कमी करावें, मीठ कमी करावें, घरचीं सर्व हलकीं कामें तिनें करावींत व मंगल कार्यांत, ही अमंगल समजून तिला मात्र घरांत कोंडून ठेवावी!! विधुरानेंही असें बायको मेल्याचें द्योतक म्हणून भिवया काढल्याचें किंवा असें विद्रूप करून घेतल्याचें उदाहरण इतिहासांत लेखकाला तरी अद्याप कुठें आढळत नाहीं.

## स्त्रियांबद्दल किती प्रेम हें!

पुनर्विवाहाला बंदी केल्यानें कामवासना थांबली नाहीं. योग्य मनपसंत पुरुषाच्या गांठीस प्रतिबंध केल्यानें, कामवासनेची भूक घरच्या भांडीघाशा बाल्बरोबर शमवून, परिणामफल पंढरपूर अनाथबालाश्रमामध्यें किंवा कुठल्या तरी कोपऱ्यांतील पाला पाचोळ्यांत पडलें, तर तें पाप स्त्रीच्या माथ्यावर पडेल कीं अशी परिस्थिति निर्माण करणाऱ्या समाजाच्या कपाळीं पडेल? स्त्रीवर व्यभिचाराचा आरोप झाल्यास हिंदुसमाजांतील एका विशिष्ट जातीनें तिच्या पातिव्रत्याची कसोटी घेण्याचा काढलेला उपाय पाहिला म्हणजे अक्कल गुंग होते. राक्षस लोकांना याची कल्पना बरोबर आली नाहीं तरी कल्पनेंतील क्रूर राक्षसी कृत्य मात्र आम्हांकडून झाल्याचें स्पष्ट दिसतें. व्यभिचाराचा आरोप झालेल्या स्त्रीचा हात उकळत असलेल्या तेलांत घालून तो भाजला तर म्हणे ती भ्रष्ट व न भाजला तर ती पतिव्रता. या कसोटीला जगांतील बायका लावल्या तर त्या सर्वच निखालस व्यभिचारीच ठरायला पाहिजेत. असो ही गोष्ट आज शक्य नाहीं.

व्यभिचाराच्या गुन्ह्याबद्दल महात्माजींचे विचार मनन करण्याजोगे आहेत.

एक मनुष्य विलायतेला गेला. त्याच्या गैरहजेरींत त्याच्या विश्वासू मित्रानें त्याचे स्त्रीस मोहपाशांत अडकवून पातक घडवलें. तिला केल्या कर्माचा पश्चात्ताप झाला असून ती रात्रंदिवस रडत आहे. अशा स्थितींत तिचा स्वीकार करावा काय, अशी सल्ला विचारली असतां महात्माजी म्हणतात. पुरुषाच्या हातून अशा असंख्य गोष्टी घडत असतांना त्या पापाबद्दल आम्ही त्यांना जबाबदार धरत नाहीं, व धरणें अशक्य होतें, एवढ्यावरून ते कमी पापी ठरत नाहींत. स्त्रीला जर खरा पश्चात्ताप झाला असेल, तर नवऱ्यानें तिचा स्वीकार करणें व मुलाचें संगोपन करणें हें त्याचें पवित्र कर्तव्य आहे. ( १–३–१९२७ यंग इंडिया. )

लग्नसंबंध दृढावण्याला मनुष्यस्वभावजन्य दोषांचा विचार करून सहिष्णुता बाळगली पाहिजे. पश्चात्तापी स्त्रीला सुधारण्याला वाव दिला पाहिजे. अनीतीला प्रोत्साहन न मिळेल अशीच सामाजघडी बसवली पाहिजे. नाक दाबून जीवाचा कोंडमारा केला म्हणजे सुटण्यासाठीं हातपाय धडपडूं लागतात. लग्नसंबंधानें स्त्रियांची–चोहोबाजूनें गळचेपी करूं लागल्यास त्यांना त्यांत राहावेसें कां वाटेल? पुराणें, स्मृत्या, कथा व धार्मिक ग्रंथ यांत स्त्रियांना अनुकूल तसेच प्रतिकूलही आधार मिळूं शकतील पण प्रतिकूल गोष्टीच रूढ होऊन, अनुकूल गोष्टींना ग्रंथाबाहेर वाव मिळत नाहीं. "वातादि क्षोभामुळें प्रकृतीमध्यें स्थित नसलेल्या, पतित झालेल्या, नपुंसक, दूषित वीर्यामुळें निर्बीज झालेल्या व कुष्ठादि पापरोगानें युक्त असलेल्या पतीची जी स्त्री सेवा करीत नाहीं तिचा त्याग करूं नये." मनु. अ. ९ श्लोक ७९ अशी म. स्मृतिकारांनीं ही सवलत ठेवलेली दिसते.

पुनर्विवाहाला बंदी करण्यानें किती अनन्वित कृत्यें घडलीं आहेत व रोज घडत आहेत याची कल्पना समाजाला येत नाहीं काय? रोज कांहीं तरी गोष्टी उघडकीला येत असतात. निसर्ग उदाहरणांनीं समाजाला मारखे धक्के देत असूनही त्यानें जागें होऊं नये काय?

## निश्चित पातिव्रत्य.

स्त्रीच्या हातून पातिव्रत्य पाळलें जातें कीं नाहीं, ही शंकित स्थिति राहू नये म्हणून, पुरुष निव्वळ समाजावरती विश्वासून राहिला नाहीं. तर सतीची चाल अस्तित्वांत आणून त्यानें, आपल्या प्रेताबरोबरच स्त्रीनें

स्वतःला जाळून घेण्याची आज्ञा केली. व अशा जाळून घेणाऱ्या स्त्रीस साध्वी अशी उपमा दिली. पुष्कळ वेळां आगीच्या आचेनें त्या चितेंतून, सतींनीं बाहेर पडण्याचा प्रयत्न केला असतां, त्यांस त्या चितेवर काठ्यांनीं ढोसलून घासलेट ओतून जाळलें आहे, व तिच्या प्राणांतिक किंकाळ्यांनीं अंगावर शहारे येऊं नये, आपण भेदरूं नयेत, व भूतदयेचा प्रादुर्भाव उत्पन्न होऊं नये म्हणून अनेक वाद्यांच्या गलबलाटांत व किंकाळ्यांत तिला जिवंत जाळण्यांत येत असे. साध्वी स्त्रिया स्वखुषीनेंच सरणावर चढत होत्या म्हणे! रजपूत स्त्रियांना जोहार करायला लावून त्यांना जिवंतपणीं स्वर्गांत पाठवण्याचा मक्ता पुरुषांनीं घेतला होता. मनुष्यस्वभाव, सारखा असतांना, स्त्रीप्रेमाखातर स्वतःला जाळून घेतलेला पत्निभक्त एक तरी दाखवतां येईल काय? सतीच्या चालीविरुद्ध ऋग्वेद ओरडत असतांना त्याला समाजानें कुठें मानलें होतें? " हे स्त्रिये तूं ह्या मेलेल्या पतीच्या-समीप शयन केलें आहेस, तर ह्या जिवंत लोकांचा समुदाय पाहून प्रेता-जवळून ऊठ आणि इकडे ये व पुनर्विवाह करूं इच्छिणाऱ्या पाणिग्रहण करणाऱ्या या पतीच्या भार्यत्वाप्रत मुख्यत्वेंकरून तयार हो " ऋग्वेद मं. १० सू. १८ श्लोक ८. या आज्ञेला पायाखालीं तुडवून पुनः धर्माचें ढोंग करून विधवांना चितेवर जाळणारे नराधमांनीं स्वतःला धर्माभिमानीच म्हणावें!

इंग्रज सरकारच्या अमदानींत, चांगल्या गोष्टींसाठीं, लोकरोष पतकरून, रूढीला पायाखालीं तुडवून, धर्म म्हणून समजलेल्या या राक्षसी धर्माच्या धमकीस भीक न घालतां निधड्या छातीनें जर कोणची सामाजिक सुधारणेची गोष्ट झाली असेल तर ती कायद्यानें सतीची चाल मोडण्याचीच होय. याचें सर्व श्रेय व स्त्रीजातीचा आशीर्वाद लॉर्ड बेंटिंक व राजा राममोहनराय यांनाच मिळणार आहे. स्त्रीसमाजावर त्यांचे हे अगणित उपकार आहेत. याच धडाडीनें जर सामाजिक बाबतींत मन घालून सुधारणा करण्याचें मनांत आणलें असतें तर यावेळीं किती तरी भांडणें कमी झाली असतीं व राष्ट्रांत ऐक्यभावना अधिक उत्पन्न झाली असतीं. असो.

## विजोड विवाह

" Women know the miseries of the child marriage as no man can know—Bhagirathi Ammal.

कांहीं गृहस्थ बालविवाहाची बाजू सावरतांना म्हणतात कीं, म्हणे प्रौढ स्त्रीपुरुषांचा संबंध कामुक असतो; अविचारी असतो. बालविवाहामुळें स्त्रीला पती हें दैवत वाटतें. स्वाभाविक पूज्यभाव उत्पन्न होतो वगैरे, पण बालविवाहापेक्षां केव्हांही प्रौढविवाह हजारो पटीनें बरा. " आमच्या विधवा या विषयत्यागाचें मूर्तिमंत उदाहरण होत. आमचे बालविवाह हे ब्राह्मविवाह होत, अशा उच्च चालीरीती जगांत दुसऱ्या कोठें आढळतील काय? अशा विवाहांत कामवासनेचा गंध नसून तें शुद्ध प्रेम असतें अशा प्रकारचे बाष्कळ आलाप सर्वत्र ऐकूं येतात." (विवेकानंद.)

लहानपणापासून गुलामाचें शिक्षण बालवधूला देतां येतें, हा फायदा वरच्या मंडळींना मात्र फार फायदेशीर असतो यांत मुळींच शंका नाहीं. नणदा सासवांना करडा अंमल चालवायला लहान मुलगी जशी बिनशर्त ताबेदार बनूं शकेल तशी प्रौढ वधू होणार नाहीं. नवरा तिच्या आधीन जाण्याचाच संभव लवकर असल्यामुळें सासूसासऱ्यांना बालविवाह संमत असल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

## विषयांध.

या अजाण मुलीला घरीं आणल्यानंतर नवऱ्याच्या अनिवार इच्छेला विरोध करण्याची कुणाची ताकत नसते. बायको लहान असो, थोर असो, ती नवऱ्याची उपभोग्य वस्तु! त्याचे आड कोण येणार? भीतीनें नवऱ्याशेजारीं जाणार नाहीं, म्हणून हट्ट घेऊन बसली तर कांहीं तरी काम सांगून तिला नवऱ्याचे स्वाधीन करणाऱ्या सासूबाई पुष्कळ मिळतात. लग्न हें केवळ पुरुषाच्याच विषयसुखासाठीं असल्यानें त्यांत स्त्रीच्या संमत्तीची पुरुष वाट पहात नाहीं. पुरुषाच्या पशुतुल्य विषयवासनेला स्त्रीला निमूटपणें बळी पडावें लागतें!

१९२६ च्या आक्टोबरच्या यंग इंडियाचे अंकांत अशा कांहीं गोष्टी एका स्त्रीनेंच महात्माजींच्या पुढें ठेवल्या आहेत. कलकत्त्याची गोष्ट. १० च वर्षांची नवरी मुलगी. दोन रात्रीं नवऱ्याचे खोलींत पाय टाकल्यानंतर तिसरे रात्रीं तिनें जाण्याचें नाकारलें. पण सासूबाईनें मुद्दाम कांहीं तरी काम सांगून नवऱ्याकडे पाठवलें. नवऱ्यानें दार बंद केलें व चुकल्याबद्दल बेदम मारलें, त्यांत तिचा अंत झाला."

बर्नर्ड शॉ Marriage विवाह या पुस्तकांत म्हणतात कीं, 'लग्न म्हणजे कायदासंमत व्यभिचार होय.' पण आमच्या हिंदु समाजांतील लग्नसंस्थेंत जबरीसंभोगाचाही समावेश करतां येईल.

दुसरें एक उदाहरण तेथेंच दिलें आहे. नवरी १० वर्षांची. नवऱ्याजवळ येईना म्हणून त्यानें त्याच वर्षी दुसरें लग्न केलें व तिला टाकून दिली. आज ती पहिली बालवधू प्रौढ असून घराबाहेर आहे.

एकाच वयाच्या मुलामुलींचीं लग्नें केल्यास त्यांच्यामध्यें सहवासजन्य खेळीमेळीचें व बंधुभगिनी–प्रेम उत्पन्न होतें. मुलगा थोर झाल्यानंतर ओळखीच्या नेहमींच्या सहवासांतील स्त्रीबद्दल त्याचे ठिकाणीं कामवासना उत्पन्न होत नाहीं. तो दुसरीं दारें पाहूं लागतो. घरीं नक्षत्रासारखी बायको असतांनासुद्धां तिला सोडून कुरूप स्त्रीला जवळ केल्याची उदाहरणें घडतात. त्याला हें एक कारण आहे.

बालविवाहप्रतिबंधक कायदा पास झाला तरी अद्याप तो बदलण्याचा प्रयत्न पुराणमतवादी करीत आहेत. सरकार धर्मांत हात घालत आहे म्हणून त्यांना धमकी देत आहेत. ठिकठिकाणीं या कायद्याविरुद्ध सभा भरवून समाज उलट आहे असें दाखवण्याचा प्रयत्न झाला आहे. पण बालविवाहाचा अनिष्ट परिणाम ज्या स्त्रियांवर होत आहे. त्यांनीं किती सभा भरवल्या आहेत. स्त्रियांची बाजूही पुढें मांडणारे पुरुषच. म्हणजे हल्लीं संस्थानीप्रजेचे प्रतिनिधी आपणच म्हणून राजे लोक पुढें होऊं पाहतात त्यांतलाच हा प्रकार नव्हे काय?

# प्रकरण सहावें

## विधवा



महात्मा गांधी.

" जी सूट विधुरांना आहे ती विधवांना असलीच पाहिजे. नाहीं तर विधवांवर बलात्कार होईल, व बलात्कार म्हणजे हिंसा असल्यामुळें त्याचा परिणाम वाईट होणारच. विधवांच्या विवाहाबद्दलच्या अडचणी उपस्थित करण्यांत येतात, त्याचा विचारहि विधुरांचे बाबतींत करण्यांत येत नाहीं. ह्या एकपक्षी न्यायावरून स्त्रीविषयक कायदे पुरुषांनींच रचले आहेत हेंच दिसून येतें. स्त्रियांनींही कायदे घडविण्यांत भाग घेतला असता, तर पुरुषांहून आपणासाठीं त्यांनीं कमी अधिकार कधींच पतकरले नसते. ज्या ज्या देशांत स्त्रियांना समान अधिकार आहेत, त्या त्या देशांत आपल्यास अवश्यक व अनुकूल कायदे स्त्रियांनीं करून घेतले आहेत. निर्दोष विधवाबालिकेचें लग्न करून देणें हें पित्याचें कर्तव्य आहे. मर्जीविरुद्ध व बलात्कारानें पाळलेलें वैधव्य निंद्य होय."–(महात्मा गांधी.)

## दहन चितेवर व चिंतेवर!

स्त्रियांना सत्तेच्या, मनाच्या, धर्माच्या, रूढीच्या, समाजाच्या व अखेर पैशाच्या गुलाम करून निर्जीव वस्तूंत त्यांची जमा केली. ती वस्तू आपल्या मरणानंतरही दुसऱ्या हातीं पडूं नये, म्हणून आपल्या प्रेताबरोबर आपल्या स्त्रीचें दहन व्हावें अशी व्यवस्था करून, पुरुष निश्चिंत राहिला होता. इतर गोष्टींत सर्वस्वी यशस्वी झाला, पण राजसत्तेमुळें फक्त त्याची अखेरची दहनाची इच्छा तडीस गेली नाहीं.

प्रौढ स्त्रीला जित्या चितेवर लोटून समाजानें ' बालविधवांना चितेंत ' ढकलेलें. एकीच्या जिवंत देहाला आग लावली तर दुसरीच्या अंतःकरणाला पेटवलें. दोन्हीही गोष्टी सारख्याच. ' बिंदुमात्र विशेषतः ' बिंदुभेद आहे एवढेंच ! देह जाळणें एका क्षणाची गोष्ट, त्यावेळीं त्रास होईल तेवढाच ! पण सर्व आयुष्यभर रोज मरण सहन करणें हें अधिक हालाचें आहे. कष्टतर आहे. बालवैधव्य म्हणजे रोज फांशीची शिक्षा आहे ! जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा याहून किती सौख्याची !

अद्याप या अबलांची करुण हांक पुरुषहृदयांतील परमेश्वराला पोचत नाहीं. त्यांच्यांतील भूतदया अद्याप जागीं होत नाहीं !

ज्या स्त्रीला नवरा कोण, कां असावा, याची कल्पनाहि नाहीं, नवऱ्याची तोंडओळखहि झाली नाहीं, ' बाहुलाबाहुलीच्या ' लग्नांत नवऱ्या बाहुली-वर तिचें कौतुकाचें प्रेम तरी बसलें असेल, पण तिचा नवरा म्हणून लोकांनीं मानलेला त्रयस्थ पुरुष मेला, म्हणून एका अजाण बालेवर आजन्म वैधव्य भोगण्याचा प्रसंग यावा हा काय मानवांचा न्याय ! महात्माजी म्हणतात—

" बालविधवा पाहिली म्हणजे माझे अंगावर कांटा येतो "

विधवेला आजन्म सुखाला पारखें करून, तिला सुखाचा वारा न लागेल अशी खबरदारी समाजानें घेतली आहे. स्त्रियांना अबला बनवल्यामुळें त्या परावलंबी झाल्या आहेत, म्हणून त्यांना सर्व जुलूम मुकाट्यानें सहन करावे लागतात. पण असे भलते निर्बंध घालून मनुष्यस्वभाव बदलतां येत नसतो हें समाजाला समजायला पाहिजे. स्त्री किंवा पुरुष एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त झाल्यास त्याला कसें आवरून धरणार ? चोरून होणाऱ्या गोष्टीला अडथळा कसा आणणार ? आणि या गोष्टी अस्वाभाविक नाहींत हेंहि आपण विसरतां कामा नये.

समाज बालविधवेच्या लग्नाला संमती देत नाहीं. आणि निसर्गाला धरून होणाऱ्या स्त्रीपुरुषसहवासाला बंदी करून त्या सहवासास गुन्हा टर-वतो ! ' भीक मागूं नको, घरीं खाऊं नको ' अशा स्थितींत स्त्रीनें कसें वागावें ? अशा स्थितींत तिला मूल झालें तर कायदा तिचा पोटगीचा आधार काढून घेतो ! मूल घेऊन तिला समाजांत वावरतां येत नाहीं.

'पतिता' असा तिच्यावर शिक्का बसलेला असतो. अंगावर मुलाचा बोजा, इकडे सासरची पोटगी बंद व लोकांत छीःथू. यामुळें समाजाच्या, कायद्याच्या व पोटाच्या आंचीमुळें बालहत्येचें पाप समाज आपल्यावर ओढून घेत आहे. मूल ही राष्ट्राची संपत्ति असतांना, त्याची उपजतांच वाट लावणें परिस्थितीनें भाग पाडलें तर अशी परिस्थिति निर्माण करणाऱ्या समाजावरच तें बालहत्येचें पातक नाहीं कां लागणार? "अनाथ गाय चुकून पाय घसरून पापाच्या चिखलांत रुतली तर तिच्या दीन दशेचा मोठ्या मनानें विचार करून तिच्या पापाकडे मनुष्यस्वभावाच्या जाणिवेनें पाहून उदार बुद्धीनें तिच्यावर आपल्या पंखाची छाया पसरणारा राजहंस कुठें तरी आढळेल काय? समाजनिंदेच्या भीतीनें हृदयाच्या चिंधड्या झाल्या नसत्या तर आपल्या लाडक्या पोटच्या गोळ्याचा घात कुणी केला असता? राक्षसी समाजा किती दिवस तूं असे भयानक खेळ खेळणार? राक्षसी पण निर्जीव रुढीला आणखी किती कोमल आणि जिवंत हृदयाचे बळी देणार? चुकासावरून घ्यायच्या नाहींत, इकडे उघड लग्न करूं द्यायचें नाहीं, मग विधवेनें काय करावें? अनाथ विधवेला दुःखमुक्त होण्यासाठीं समाजानें मरणाखेरीज एकतरी मार्ग मोकळा ठेवला आहे काय? (प्रेमसंन्यास.)

स्त्रियांचा दर्जा ज्या समाजांत बरोबरीचा मानलेला असतो त्या समाजांत मुलावर स्त्रीनें आपली मालकी सांगण्यांत तिचा किंवा त्या मुलाचा दर्जा कमी ठरत नाहीं. तशी स्थिति इजिप्तमध्यें होती.

इजिप्तमध्यें 'वारसी व बेवारसी' मूल असा भेद नव्हता. हिंदुस्थानांत मुलावर असा शिक्का बसतो. त्या मुलामुळें स्त्रीला कालिमा लागत असल्यामुळें, ही संतति नाश करण्याकडे विधवेची प्रवृत्ति होत असते. ख्रिस्ती राष्ट्रांतही स्त्रियांची परिस्थिति विचित्र झाली आहे.

ख्रिश्चनराष्ट्रांत एकपत्निव्रत कायद्यानें लादल्यामुळें कित्येक स्त्रियांना नवरे मिळणें अशक्य झालें आहे. कारण पुरुषांची संख्या कमी आहे. लग्न न झालेल्या स्त्रियांना मूल झाल्यास तें महापातक समजलें जातें. तिला समाजांत दर्जा रहात नाहीं. याचा साहजिक परिणाम बालहत्येचें प्रमाण फार वाढलें आहे. जर्मनींत दरसाल होणाऱ्या बालहत्येची संख्या साठ

लाखांवर आहे म्हणतात. लग्नाशिवाय मूल होणें हें पाप असें समजल्यामुळेंच हा अनिष्ट परिणाम घडत असतो. तिकडे विधवांना लग्न करण्यास समाजाची आडकाठी नाहीं; पण पुरुषास दुसऱ्या लग्नाची आडकाठी असल्यामुळें स्त्रियांवर कौमार्य पाळण्याची बळजबरी होत आहे. सर्वसाधारण मनुष्याला हें शक्य नसल्यामुळें अनीति वाढत आहे. हें त्या समाजांचें झालें.

आपल्या समाजांत विधवा न राहतील अशी व्यवस्था केल्यास आपोआपच या अनीतीचे प्रकार कमी होतील. महात्मा गांधींजी या जबरीच्या वैधव्याबद्दल म्हणतात.

"धर्माच्या नांवाखालीं बालिकांवर वैधव्य लादणें हा पशुवृत्तीचा गुन्हा आहे. कोणत्याहि शास्त्राला असें वैधव्य संमत नाहीं. जिला अर्धांगी म्हणून पतिप्रेम वाटत असेल त्या स्त्रीनें स्वखुषीनें व समजून जर वैधव्य मान्य केलें, तर त्या जीविताला शोभा येते. पण खुद्द धर्माच्या नांवाखालीं म्हणून अगर रूढी म्हणून जर वैधव्य लादण्यांत आलें तर तें वैधव्य असह्य होतें. चोरट्या पापामुळें विटाळून जातें व धर्माला कमीपणा येतो. ज्यांची विवाहाला संमति नव्हती व ज्यांनीं विवाहानंतर पतिसुखाचा आस्वाद केव्हांही घेतला नाहीं, अशा कुमारिका एकदम विधवा झाल्या असें केवळ जाहीर केलें म्हणजे त्या विधवा होऊं शकत नाहींत. हा भाषेचा व शब्दाचा दुरुपयोग आहे. हा अधर्म आहे. अशा विधवा कुमारिका असतील तर हा रोग नष्ट करण्यासाठीं त्यांच्यांशीं विवाह करणें हें तुमचें पवित्र कर्तव्य ठरतें."

शरीरधर्माप्रमाणें आचरण करण्याची जिची इच्छा आहे, परंतु समाज तसें बलात्कारानें तिला करूं देत नाहीं, अशी जोपर्यंत एक विधवा समाजांत वावरत आहे तोपर्यंत तीस कोटी लोकांच्या जीवित कारभाराचीं सूत्रें हातीं घेण्यास आपण लायक आहोंत असें तुम्हास वाटतें काय?

तेव्हां बालविधवांचीं लग्नें घडवून आणणें हेंच सर्वदृष्ट्या योग्य नाहीं काय?

## लग्न कुमारिकेशीं कीं विधवेशीं ?

विधवांचीं लग्नें होणें ही गोष्ट न्यायाला, भूतदयेला, धरून आहे. व नीतिरक्षणाला ती अवश्य आहे याबद्दल दुमत होण्याजोगें नाहीं. पण लग्न-

करतांना पुरुषांनीं कुमारिकेऐवजीं विधवा पसंत केली तर त्याला तें सुखकारक होईल काय हा विचार केला, तरीही ही गोष्ट अनिष्ट नाहीं हेंच दिसून येईल. विधुरानें विधवेला पसंत करणें हें न्याय्य होईल, पण तरुणांनींहीं प्रथम वधू विधवा पसंत केली तर तीही व्यवहार्य होईल. कोणत्याही गोष्टीला अनुभवाची जरूरी लागते. नोकरी लागतांना अनुभवी मनुष्याला ती अगोदर मिळते. तेव्हां अनुभव असणें ही गोष्ट केव्हांही त्या माणसाला त्या धंद्यांत नवख्यापेक्षां अधिक उपयोगी पडते. लग्नसंबंध हाही मनुष्याच्या आयुष्यांत एक मोठा प्रयोग आहे. तो प्रयोग यशस्वी होण्याला अनुभवाची जरूरी नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. मनुष्य विद्यार्थिदशेंतून बाहेर पडला. घरीं त्याचें वडील माणूस कोणी नाहीं, नोकरी लागली, पण प्रपंच पाहण्यास घरीं पोक्त माणूस नाहीं, अशा गृहस्थानें प्रौढ विधवेशीं लग्न करणें बरें होईल कीं अननुभवी कुमारिकेशीं लग्न करणें बरें होईल? घरांतील व बाहेरील त्रासाशीं टक्कर देऊन दिवस निभावून नेणारी विधवा संसारशकट चालवण्याला अधिक योग्य ठरेल कीं नवयौवना बाला योग्य ठरेल? चालू रूढी व समाजाच्या ठराविक दुराग्रहाला बाजूला ठेवून, विवक्षित संस्काराचा मनावर झालेला परिणाम बाजूस सारून या म्हणण्याचा विचार केला तर अनुभवी माणूस टाकाऊ नव्हे असेंच वाटेल. महात्मा गांधीजींनीं तरुणांना स्पष्ट भाषेंतच बजावलें आहे कीं, हा अन्याय दूर करण्याकरितां 'तरुणांनीं विधवेशींच लग्न करावें.' निर्मळ सत्यशोधन करणारा मनुष्य रूढीचा गुलाम होत नसतो म्हणूनच गांधीजींनीं सत्य तें प्रतिपादन केलें आहे. त्यांत समाजाचें पापपरिमार्जन तर आहेच, पण स्वार्थही आहे.

## स्मृत्या व पुनर्विवाह

कोणत्याही चांगल्या गोष्टीला शास्त्राधार दाखवलाच पाहिजे असें नाहीं. तसेंच वाईट गोष्टीचें समर्थन शास्त्राधार दाखवून करणें व्यर्थ आहे. शास्त्रें व स्मृत्या वगैरे मनुष्यांनींच लिहिलीं आहेत. कालपरत्वें त्यांत बदल झालाच पाहिजे. कारण काल सारखा बदलत आहे. पुनर्विवाहास बंदी करून

समाजानें आपल्यावर केवढी मोठी आपत्ति ओढवून घेतली आहे त्याची ओझरती कल्पना वाचकांना दिली आहेच. असो.

हिंदुलोक वेदाला अत्यंत पूज्य ग्रंथ म्हणून मानतात. याचा अर्थ वेद सर्वांना माहित आहे, अशांतली कांहीं गोष्ट नाहीं. पण मानतात हें खरें. तसेंच कायदेकानू स्मृतिकारांना वरचा उच्च वर्ग फार मानतो. तेव्हां ते व त्यांचे टीकाकार यांनीं पुनर्विवाहास संमति दिली असल्याचें स्पष्ट आहे.

"नवरा बेपत्ता झाला असल्यास, त्यानें गृहस्थाश्रम म्हणजे प्रपंच टाकला असल्यास, तो पौरुष्यहीन असल्यास किंवा झाल्यास, तो परदेशीं दूर रहात असल्यास, नवऱ्यानेंच त्याग केला असल्यास किंवा तिनें आपणहून त्याचा त्याग केला असल्यास, नवऱ्याची वर्तणूक वाईट असल्यास, तो कायमचा अधू असल्यास, व तो गुलाम झाल्यास स्त्रीनें पुनर्विवाह करावा."

पुनर्विवाह पूर्वी रुढ होते. त्याचे दाखले पुष्कळ सांपडतील.

क्षत्रिय राजाची मुलगी माधवी इचीं चार लग्नें एकामागून एक अशीं झालीं आहेत. प्रथम इक्ष्वाकू घराण्यांतील राजाशीं तिनें लग्न केलें. त्या लग्नापासून तिला एक मुलगा झाला, नंतर काशीचा राजा देवदास याच्याशीं लग्न केलें, त्यापासून एक मुलगा झाला, नंतर उशिनार राजाशीं केलें, त्यापासून एक मुलगा झाला, अखेर विश्वामित्र ऋषीबरोबर होऊन त्यालाही मुलगा झाला. पुरु व यदू हे तिचे बंधू होत. पुरु हा कौरव–पांडवांचा पूर्वज, व यदु हा कृष्ण व बलरामांचा होय. विष्णूनें जरत्कारूच्या विधवा स्त्रीशीं व अर्जुनानें विधवा नागकन्या उलूपीशीं लग्न लावलें आहे. सरस्वती ही ब्रह्मा विष्णु व महेशांची अनुक्रमें पत्नी झाली असल्याचाही उल्लेख आढळतो. नवरा गुलाम झाल्यानंतर त्याचा नवरेपणा नष्ट होतो व तिला पुनर्विवाह करण्याचा अधिकार येतो. ही गोष्ट गुलाम झालेल्या युधिष्ठिरानें द्रौपदीस पणाला लावल्याबरोबर परतंत्र नवऱ्याचा स्त्रीवर अधिकार नाहीं असें द्रौपदीनें बोलून दाखविलें आहे. नल बेपत्ता झाला म्हणून दमयंतीनें स्वयंवर जाहीर केलें होतें. मग नलाची स्वारी गडबडीनें धांवून आली आहे." असे पुरावे पुनर्विवाहाला पुष्कळ मिळत आहेत.

पुनर्विवाहाला बंदी झाली ती रागानें, द्वेषानें व मत्सरानेंच झाली आहे. शांतिपर्वांत अशा प्रकारची गोष्ट आहे. " दीर्घतमा नांवाचा ऋषि अंध होता. त्याची प्रद्वेषी नांवाची स्त्री त्याच्यासाठीं व त्याच्या मुलासाठीं काम करतां करतां कंटाळून त्यास सोडून जाऊं लागली, तेव्हां त्यानें रागावून जन्मभर स्त्रीला एकच पति असावा अशी आज्ञा करून पुनर्विवाहास बंदी केली." यांत समाजाच्या कल्याणाच्या भावनेपेक्षां सूडाची व रागाचीच भावना अधिक दिसते.

दुसरें एक उदाहरण आहे—उद्दालक ऋषीचा पुत्र श्वेतकेतू याच्या मातेचा हात एका ब्राह्मणानें धरला यामुळें रागावून जी स्त्री भर्त्याव्यतिरिक्त अन्य पुरुषाशीं संगत होईल तिला भ्रूणहत्येचें पातक लागेल अशी मर्यादा घातली. गुन्हा पुरुषाचा, शिक्षा स्त्रीला, हा काय न्याय? दोघांवरही सारखें बंधन नको होतें काय? स्त्री जातीवरच एवढा सूड कां?

## सरणावर सौभाग्य!

बालविधवांचीं लग्नें करून देणें हें जसें समाजाचें एक पवित्र कर्तव्य आहे, तसेंच बाला विधवा न होतील अशीहि व्यवस्था समाजानें केली पाहिजे.

सुदैवानें 'बालविवाह' प्रतिबंधक कायदा करून हिंदुस्थानसरकारनें थोडी फार मदत केलीच आहे. पण याचवेळीं बाला–जरठ विवाहासहि बंदी करणें तितकेंच अवश्य होतें. बाला वयांत येते न येते इतक्यांत, तारुण्यभरांत पहिला पाऊल पडतो न पडतो इतक्यांत, जर तिला 'अवघें पाऊणशें वयमान' असलेल्या जख्खडाच्या गळ्यांत बांधली तर लग्नसमारंभासाठीं बांधलेलें मंडपांतील 'बहुलें' व स्मशानांतली 'चिता' याच्यांत फारसा फरक उरणार नाहीं! कायदासंमत बालवयानें उंबरठ्याच्या बाहेर पाऊल टाकण्याची फुरसत, कीं संपत्तीच्या मदानें धुंद झालेले रावण, कुमारीचें हरण करण्यास सदैव तत्पर असतात! पोटासाठीं पोटच्या पोरीचा गळा कापणाऱ्या भिक्षुकांची, दरिद्री हिंदुस्थानांत कमतरता नाहीं. अशा बापांच्या कितीतरी मुलींचा सौदा लग्नहंगामांत नेहमीं होत असतो!

## लग्नाचें कंत्राट.

हिंदुसमाजांत मुला–मुलींच्या विक्रीचा मक्ता बापानें आपल्याचकडे राखून ठेवल्यामुळें 'प्रेमविवाहाची' कल्पना बहुशः कादंबरीच्या बाहेर पडूं शकत नाहीं. शिकलेलीं मुलें केव्हां केव्हां आपल्या सावजाची रूपरेखा, पाहण्याचें धाडस करून, आपल्या बापाच्या अनियंत्रित सत्तेविरुद्ध केव्हां केव्हां जाऊन, त्याच्या जन्मसिद्ध हक्कास धक्का देतात, पण मुलीला आपला नवरा कोळशांतला माणिक आहे, कीं मदनाचा पुतळा आहे, हें पाहण्यास मनाई आहे. अशी इच्छा करणें म्हणजेच अनीतीची गोष्ट आहे!

आजच्या सुशिक्षित मुलानें मुलगी पसंत करण्याचा हक्क मिळवला असला तरी एखादी वस्तू खरेदी करतांना, मोटारगाडी खरेदी करतांना, जसें आपण, ती चालते कशी, दिसते कशी, हॉर्न वाजतो कसा, हें पाहतों त्याप्रमाणें नवरीचा आवाज कसा आहे, ती वाचते कशी, चालते कशी, हंसते कशी, तिचे दांत कसे आहेत, ती तिरपी चालते का सरळ चालते, अशा प्रकारचीच परीक्षा, हा गिऱ्हाइकी वस्तू निरखून पहाण्याचा हक्क (क्रांतीकारक?) सुशिक्षित पिढी अलीकडे मिळवूं लागली आहे.

यांत 'प्रेमविवाहाचा' अपराध (!) चुकूनहि झालेला नसतो. तें पाप (?) आपल्या समाजांत हल्लीं झालेंच तर कुठेंतरी अपवादादाखलच होत असतें. अशा बंडखोर दांपत्यांचा सूड समाज घेतल्याखेरीज रहात नाहीं. गांवांतील कुटाळखोर या दांपत्याच्या चारित्र्यावर वाटेल त्या गोष्टी रचून त्या समाजांत फैलावत असतात. अशीं अपवादादाखल उदाहरणें सोडून दिलीं तर आतांपर्यंत लग्नाच्या कंत्राटाची 'मोनापोली' अव्याहतपणें बापाकडेच चालत आलेली आहे. मुलानें त्यांत थोडा कुठें संमतीनें तर कुठें सत्याग्रहानें कायदाभंग करून शिरकाव केला असला तरी, मुलीच्या बापाची सत्ता पूर्ण, अगदीं अनियंत्रित आहे. रूपवती कन्या म्हणजे खात्रीचें भांडवल, बापाच्या कष्टाची कमाई, अगदी सत्तेचा पैसा! बापाच्या सत्तेविरुद्ध बंडाळी करण्याचें धाडस मुलीच्या अंगीं नसल्यामुळें, गृहराज्याच्या बजेटाची भरपाई करण्यासाठीं आपल्या पोटच्या अजाण असहाय्य गुलाम प्रजेपासून निघेल तेवढी हुंडावसूली करण्यास धनाभिलाषी बाप मागेंपुढें पहात नाहीं. व

' कंबर कमान ' नवरदेवाला आशिंगानें सजवण्यासाठीं आपल्या पोटच्या मुलीला, चितेच्या बहुल्यावर उभी करून, अक्षता टाकण्यास मुलीचा बाप आनंदानें पुढें होतो! आणि दुःखावर डागण्या म्हणूनच कीं काय, निर्दय समाज या बापाच्या पापाचा सूड, त्या तरुण बालेवर, आजन्म वैधव्याची शिक्षा करून उगवून घेतो. पहा न्यायाचा निःपक्षपाती तराजू कसा काटेकोर आहे तो!!

## बेवारसी छाप.

मूल हें स्त्री–पुरुष संबंधाचा नैसर्गिक परिणाम होय. स्त्रीच्या पोटीं जन्मास येणें यांत ती स्त्री लग्नाची असो किंवा बिनलग्नाची असो मुलाच्या संमतीचा संबंध येत नाहीं. आईबापाच्या कोणत्याही कृत्याबद्दल अजाण अर्भकाला जबाबदार धरतां येणार नाहीं. असें असतां समाज त्या मुलांना शिक्षा करतो. यापुढें तरी समाजानें मुलावर होत असलेला अन्याय दूर करून, वारसी व बेवारसी हे भेद नाहींसे केले पाहिजेत.

बेवारसी मुलें निपजण्याला समाज कारण आहे. आणि समाजाच्या या गुन्ह्याबद्दल शिक्षा मात्र भावी पिढीला!

लग्नसंबंध आईबाप ठरवत असल्यामुळें मुलाच्या आवडीचा विचार होत नाहीं. त्यामुळें तो आपली आवड निवडतो. पुरुष उघड अंगवस्त्रें ठेवतो. स्त्रिया भिऊन चोरटा व्यवहार करतात. म्हाताऱ्या नवऱ्यानें विकत घेतलेल्या बायकोस नाइलाजानें परपुरुष पहावा लागतो. विधवांची स्थिति तीच असते. बेवारसी मुलें याच परिस्थितीचा परिणाम होय.

या बेवारसी मुलांना लग्नाची अडचण पडते. इतर मुलांबरोबर तुलना केली असतां बहुधा हीच मुलें सुदृढ निरोगी व हुशार असतात, याचें कारण परस्परांची आवड स्वखुषीनें झालेली असते. अंगवस्त्र ठेवतांना ती सुस्वरूप बांधेसूद पाहूनच मनुष्य ठेवतो. तसेंच इतर होणाऱ्या चोरट्या सहवासांत परस्परांचीच इच्छा व प्रेम असल्यामुळें, आवड मनाजोगी असल्यामुळें, मुलें चांगलीं निपजतात. प्रत्येकाची आवड निराळी असल्यामुळें एखादी स्त्रीच त्याचें फार आकर्षण करू शकते. एखादीबद्दल मनांतून एकदम तिटकारा उत्पन्न होतो. म्हणून मनुष्यामध्यें निवड कर-

ण्याची, आपल्या जातीची स्त्री ( आजच्या जाती नव्हेत ) हुडकून काढ ण्याची बुद्धि नैसर्गिकच असते. अशांचीं लग्नें घडून आल्यास उत्तम जात ( Breed ) निपजत असते असा तज्ञांचा अभिप्राय आहे.

Marriages which were apperently based on physical attraction often yielded the best moral and spiritual results—
—*Keyserling.*

अशा उत्तम योग्य जोडप्याच्या मुलांना समाजानें बहिष्कार घालून आपल्या जातीचें नुकसान केलें आहे. तेव्हां स्वतःचा नाश व मुलांचा अपराध या दोन्हीं दृष्टीनें हा अन्याय गर्हणीय आहे.

## लग्नाची जरूरी स्त्रियांना अधिक.

लग्नसंबंध हे आजच्या हिंदुस्थानच्या परिस्थितींत तरी दोघांनाही अवश्यक आहेत. घरच्या गोष्टी, बाहेरचा व्यवहार, पैसा अडका मिळवणें या गोष्टी एका व्यक्तीलाच होणें अशक्य आहे. तथापि स्त्रियांना लग्नबंधनाची जरूरी, त्या बंधनाचा आधार अधिक अवश्यक आहे. मूल होण्याअगोदर व झाल्यानंतर कांहीं महिने त्या परावलंबी असतात. या मुदतींत त्यांच्या पोटापाण्याची सोय जोंपर्यंत सरकाराकडून झाली नाहीं तोंपर्यंत लग्नाच्या नवऱ्याच्याच आधाराची त्यांना अवश्यकता आहे. लग्नाबाहेर झालेल्या मुलालाही समानसमाजदर्जा असला पाहिजे. पण असा पक्षपात जोंपर्यंत आहे तोपर्यंत त्या मुलांच्या संरक्षणार्थ व मातेच्या संगोपनार्थ लग्नबंधन अवश्यक आहे.

कष्टसायास करून आपल्या हाडाचीं काडें करून, लोकनिंदेचा गहजब सहन करून व आपल्या तोंडचा अर्धा घास चारून लहानाचा मोठा अज्ञानाचा ज्ञानी, भिकाऱ्याचा लक्षाधीश झालेल्या इसमाच्या मातेच्या कमाल स्वार्थत्यागाची समाजाला काडीचीही किंमत नसते. पुरुषाचें स्वतंत्र अस्तित्व समाज मान्य करतो, पण मातेचें स्वतंत्र अस्तित्व समाज अनीतिमान् मानतो या जुलमी समाजसत्तेच्या बळी म्हणजे आमच्या हतभागिनी विधवा या होत.

प्रसिद्ध नाटककार 'ओस्कर वाइल्ड' यांचे एका नाटकांत स्त्रीची करुणाजनक स्थिति मोठी हृदयस्पर्शी दाखवली आहे. एका ढोंगी सभ्यानें एका तरुण स्त्रीस लग्नाचे आशेनें पापमार्गाला लावलें पण तिला कांहीं

दिवस गेले आहेत असें समजतांच त्यानें तिला टाकून तो दुसऱ्या स्त्रीचे मागें लागला. पहिल्या स्त्रीस मूल झालें. तिनें सर्व जननिंदा धाडसानें सहन करून मुलाला मोलमजुरी करून पोसलें व वाढवलें व त्याला शाहणा केला. आपल्या मातेला फसवून तिला बिकट परिस्थितींत टाकून देणाऱ्या नराधमाचा त्यानें पत्ता शोधून आपल्या मातेशीं लग्न करून तिला सामाजिक मान्यता देण्यास त्यानें धमकी घालून कबूल करून घेतलें. त्यावेळीं माता आपल्या मुलाला म्हणते "बाळ ज्या अधमाधमानें मला आशेला लावून पापांत ढकलेलें, मला ज्याचेमुळें अनंत यातना सहन कराव्या लागल्या, ज्या समाज-निंदेमुळें तूं मला अधिकच जवळ झालास, ज्या तुझ्यासाठीं मी रात्रीचा दिवस केला, जिवाचें रान केलें, त्या माझ्या लाडक्या बाळाची 'पतित' माताच राहणें मला अधिक पुण्यकारक वाटतें. या नराधमाची बायको म्हणून वावरण्यापेक्षां जगानें मला पतित म्हटलेलें मला जड वाटणार नाहीं. मला या नरपशूशीं कांहीं कर्तव्य नाहीं. मी एकटीच राहीन. देव मला पापी ठरवणार नाहीं." वाचकहो, या पवित्र पुण्यशील माउलीचा व त्या अर्भकाचा दर्जा तुम्ही कमी ठरवाल काय?

## बापाचें पाप, नातवाचा सूड!

पण समाज तरुण स्त्रीस आजन्म वैधव्याची शिक्षा देतो व जर त्या तरुणीस मूल झालें तर त्या मुलावर जन्मभर अनीतीचा बेवारसी शिक्का मारतो! आईच्या पोटीं जन्म घेणें हा काय मुलाचा अपराध? बिनलग्नाचें मूल व लग्नाचें मूल यांत कोणचा फरक असतो? मग अशा या निसर्गनिर्मित अजाण मुलावर पापाचा शिक्का मारून व बापाच्या अपराधाबद्दल मुलावर सूड उगवून, सर्व प्राणिमात्रांना निर्माण करणाऱ्या प्रभूचा अपराध समाज नाहीं कां करत? या मुलाचा आणि पापाचा संबंध काय? पापी स्वार्थी समाजाचें हें फल आहे. अजाण भावी पिढीवर अपवित्रतेचा शिक्का मारणें ही आपल्या अधिकारांतली गोष्ट नाहीं

Are we not, in fact, brutes to call that work brutish which begets us? —*Montaigne—love.*

भावी पिढीच्या कल्याणासाठीं म्हणून तरी स्त्रियांना अशा सामाजिक अडचणींतून दूर केलें पाहिजे. बालविधवा समाजांत राहूं देतां कामा

नयेत. शक्य तितक्या लवकर त्यांचीं लग्नें लावून दिलीं पाहिजेत व पुनर्विवाहाला समाजांत कमी दर्जा देतां कामा नये.

## अनीतीला प्रोत्साहन नव्हे !

लग्नबंधनांतहि स्त्रियांना गुलाम ठेवण्यांत समाज अनीतीलाच फुरसत देत असतो. स्वातंत्र्याच्या कल्पनेनें वेडावून हिंदी स्त्री प्रत्येक गोष्टींत पुरुषांचें अनुकरण केव्हांच करूं इच्छिणार नाहीं. पुरुष वाटेल तितक्या स्त्रिया करतात, म्हणून आपल्यालाहि अधिक नवरे करण्याचा हक्क असावा अशी इच्छा, सुधारलेल्या, स्वतंत्र वातावरणांत वावरत असलेल्या व त्यांच्या योग्यतेच्या स्त्रियांतहि नाहीं, मग हिंदु स्त्रीच्या ध्यानीं मनीं स्वप्नींही ही गोष्ट येणार नाहीं. नवऱ्याचें प्रेम असेल, नवऱ्याची प्रेमळ वागणूक असली, फार काय वाईट वागवलें नाहीं म्हणजे झालें, तीं इतर गोष्टींकडे डोळेझांक करूनहि नवऱ्याची सेवा करीत दिवस काढूं शकेल. फार काय आपला नवरा कितीहि वाईट असला तरी त्यांची निंदा केलेली, हिंदू स्त्रीस खपणार नाहीं. स्वार्थत्याग, सहिष्णुता व प्रेम यांत हिंदू स्त्रियांची बरोबरी पुरुषाला क्वचितच करतां येईल. नवऱ्यानें आपल्याबरोबर चार गोड शब्द बोलावेत, एवढ्या आशेनेंसुद्धां त्या वाटेल तितका स्वार्थत्याग करूं शकतात. नवऱ्याचा आनंद तो आपला आनंद समजून, त्याच्या अंगवस्त्राची सेवासुद्धां आनंदानें करणाऱ्या, त्या स्त्रियांना पाटातांटावर नाचवणाऱ्या साध्वी स्त्रिया हिंदू समाजांत शेंकड्यांनीं मोजतां येतील. अंतःकरणांत होत असलेली कालवाकालव दाबून, नवऱ्याला आपण सुखी आहोंत हें दाखवण्याकरितां खोटें हास्य आणून नवऱ्याला आपल्या दुःखाची कल्पनाही न देणाऱ्या त्यागी स्त्रिया आमच्या हिंदुसमाजांत घरोघरीं आहेत. पुरुषाला अनेक व्यवसाय असतात. महत्वाकांक्षा असते. पण स्त्रीची महत्वाकांक्षा, तिचें ध्येय सर्व प्रेमांतच असतें. प्रेम हेंच तिचें जीवन आहे.

Man's love is of man's life a thing apart
'T is woman's whole existence—Byron— Don Juan

पण जिथें नवऱ्याचें शाब्दिक प्रेमही नाहीं, स्त्रीबरोबर माणुसकीची वागणूकहि नाहीं, नवऱ्याच्या घरीं जिची पोटाचीहि सोय नाहीं, अपमान,

मारहाण, निर्भत्सना हीच जिच्या वाटेला आली आहे, तिला या गुलामगिरींतून सुटण्याची सवलत द्यायला नको काय? तोंड दाबून बुक्याचा मार स्त्रियांनीं किती वेळ सहन करायचा? स्वतः नांदवून घ्यायचें नाहीं व दुसऱ्याशीं प्रपंच करूं द्यायचा नाहीं. असा जुलूम यापुढें समाजानें स्त्रीजातीवर चालवूं नये. तसेंच नवऱ्याला दुसरें लग्न करण्याची मनाई करावी अशीहि हिंदु स्त्रीची इच्छा नसते. पुष्कळ वेळां त्या स्वखुषीनें नवऱ्यास दुसऱ्या लग्नाची परवानगी देत असतात. पण दुसरें लग्न करतांना पहिल्या स्त्रीच्या परवानगीची तरी अट कायद्यानें मान्य केलीं पाहिजे. तिला दुसऱ्या स्त्रीसह नांदणें शक्य नसलें तर लग्नबंधन तोडून मोकळें होण्याचा अधिकार दिला पाहिजे.

बळजबरीनें लग्नबंधन कायम टिकवण्याचा प्रयत्न करणें, स्त्री-पुरुष नाराज असतां त्यांची सोडवणूक न करणें, हें अनीतीलाच कारण होत असतें. घटस्फोट हा नीतिपोषक नसून नीतिविघातक आहे.

" I look upon divorce as the necessary remedy for a misfortune and as means of preserving the dignity of marriage
Westermarck--Marriage.

बदफैली दांपत्य एका ठिकाणीं राहणें दोघांच्याही मनःस्थितीला घातक असतें. घटस्फोटच त्यांची नीति संभाळूं शकतो.

## मुलाकरितां बंधन

स्त्री गरोदर होण्याअगोदर किंवा मूल झाल्यानंतर मग परस्परसंबंध शक्य तितका न तोडणें बरें, कारण या वेळीं लग्नबंधन हें पूर्ण व्यक्तिविषयक राहिलेलें नसतें. त्यांत तिसऱ्या प्राण्याच्या चांगल्या वाइटांचा संबंध जुळलेला असतो. तेव्हां अशा प्रसंगीं विभक्त होतांना मुलाचा विचार करावा लागेल. लग्नबंधन ही संस्था स्वतःसाठीं फारशी नसून ती समाजासाठीं व मुलासाठींच आहे असें म्हटलें तरी अप्रयोजक होणार नाहीं. लग्नाचा व मुलाचा कसा संबंध आहे हें आफ्रिकेंतील कांहीं लोकांतील चालीवरून दिसून येईल. आफ्रिकन गृहस्थाची बायको मूल न होतांच वारली तर नुकसान भरपाईसाठीं कांहीं रक्कम किंवा तिची बहीण असल्यास ती पुनः जावयास द्यावी लागते. तसेंच आपल्या समाजांतही मूल न झालेले घराण्याचे पितर स्वर्गभ्रष्ट होतात अशी

कल्पना आहे. 'अष्टपुत्रा' स्त्री ही फार मोठ्या दर्जाची मानली जाते. स्त्रीसहवास किंवा स्त्रीप्रेम याला लग्नाची जरूरी नाहीं, यांत समाजाला ढवळाढवळ करण्याचें कारण नाहीं. पण मुलाचा प्रश्न सामाजिक आहे.

The birth of a child is a social act" Havelock Ellis.

सामाजिक नीतीची कल्पना मूल हें केंद्र धरून बसवली आहे.

मुलाची जोपासना स्त्री-पुरुष दोघांवर पडायची तर त्यांच्यांत अपत्य-प्रेम उत्पन्न झालें पाहिजे. आपलेपणाशिवाय अपत्यप्रेम उत्पन्न होणें अशक्य आहे. मातेला आपलें मूल अन्य उपायांनीं ओळखावें लागत नाहीं. ती त्या मुलाला प्रत्यक्ष जन्म देणारी असते. बापाची गोष्ट मात्र तशी नाहीं. बापाला हें आपलें मूल अशी खात्री पटायला स्त्रीच्या पातिव्रत्यावरच अव-लंबून रहावें लागतें. त्या आधारावर आपल्या मुलाविषयीची त्याची कल्पना उभारलेली असते. बापाचेंच आडनांव मुलाकडे येत असतें.

The development of the individual marriage is most intimately dependent upon patriarchy. Dr. Iwan Bloch M. D.


तेव्हां लग्नाची आवश्यकता मुलाच्या वारसासाठीं आहे. बापाला मूल आपलें वाटायचें तर मुलाच्या आईस एकच पति असायला पाहिजे. नवऱ्या-व्यतिरिक्त तिनें संबंध करतां कामा नये. तसें झाल्यास मूल बापाच्या प्रेमास मुकणार. या गोष्टी लग्नबंधनानें सांवरल्या जातात. लग्नबंधन असतांना स्त्रीस होणारें मूल हें बापाचें असें कायदा म्हणतो. विवाहित स्थितींत स्त्रीस होणाऱ्या मुलाची जबाबदारी हिंदुधर्मांत नवऱ्यावर टाकलेली आहे. धृत-राष्ट्र व पंडु हे आईच्या लग्नाच्या नवऱ्यापासूनचे जरी नव्हते तरी त्यांचे पितृत्व कांहीं व्यासाकडे येत नाहीं. संतति होऊन वंश चालण्याकरितां, रोगी नवऱ्याचे स्त्रीस संततीपुरता निराळा पुरुष स्वीकारण्याची परवानगी मनूनें दिलेली दिसते. मुलाचें संगोपन मात्र लग्नाच्या नवऱ्यानें करावें, तें त्यांचेंच मूल आहे असें मानावें असें स्मृतिकार मनूंनीं सुचवलें आहे.

आपल्या भार्येच्या भ्रमानें परभार्येच्याठायीं गमन केल्यास त्यामुळ होणारा पुत्र माझाच होय असें जरी बीजदात्यास ठाऊक असलें तरी तो क्षेत्रवानाचाच होतो "उदाहरणार्थ पाण्याचा ओघ व वायु यांनीं दुसऱ्याच्या

क्षेत्रांतून आणलेलें बीज पेरलें तरी त्यांस त्याचें फळ मिळत नाहीं."—अध्याय ९ मनुस्मृति. श्लोक ५३.

यावरून लग्नबंधनाचा मूळ हेतु, नीतीच्या कल्पनेचा सर्व रोख, मूल हा सामाजिक मध्यबिंदू कल्पूनच, ठेवला आहे. स्त्रियांनीं किती पुरुषाशीं सहवास करणें व पुरुषांनीं किती बायकांना जवळ करणें हा नीतीचा प्रश्न नाहीं. यांना जीं कांहीं बंधनें घालायचीं तीं प्रकृतीसाठीं व समाजस्वास्थ्यासाठींच घालावयाचीं असतात. बायका किती करणें हें त्या मनुष्याच्या प्रकृतीवर अवलंबून आहे. पहिल्या बायकोच्या स्वातंत्र्यास त्या आड येत नसतील तर समाजाला, एकपत्निव्रत व अनेक पत्निव्रत ठरवण्याचा अधिकार नाहीं. एखाद्याला एक भाकरी पचवतां येईल. एखादा दहा भाकरी पचवूं शकेल. या बाबतींत सर्वसामान्य नियम कुणालाच करतां येणार नाहीं. नवराबायकोनें आपल्या मुलांची जबाबदारी पाळावी व कोणत्याही कारणामुळें त्यांतून सुटूं नये, याकरितां लग्नसंस्था अत्यंत आवश्यक आहे. आरोग्य व समाजस्वास्थ्याची दृष्टि टाकून धर्मानें या संस्थेंत प्रमाणापेक्षां जास्त धुडकूस घातला आहे. त्याला जाणत्या मनुष्यांनीं विचारपूर्वक पायबंद घातला पाहिजे. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या आज स्वतंत्र नाहींत. शिक्षणानें तशा होण्याला बराच कालावधि लागेल. तेव्हां नवऱ्याचा आधार आजच्या परिस्थितींत काढून घेऊन केव्हांच चालणार नाहीं. रांगत्या मुलाचा सर्व पुढील खर्च झेपण्याची व त्यापुढील आयुष्यक्रमाची, त्याच्या शिक्षणाची जबाबदारी स्त्रीला झेपणार नाहीं. याकरितां मुलासाठीं लग्नबंधन पाहिजे आहे. या लग्नबंधनावर पुढील पिढीच्या अनेक गोष्टी अवलंबून आहेत.

# प्रकरण सातवें



Our success or failure with that unending stream of babies is the measure of our civilization. H. G. Wells.

" वंश कायम रहावा हा समाजाचा हेतू आहे. भावी समाजाचें कल्याण अकल्याण तुमच्या संततीवर अवलंबून आहे "—विवेकानंद

## भावी पिढी

सर्व विश्व प्राणमय आहे. दगडाधोंड्यांलाहि प्राण आहे, हें पुन्हा जगदीशचंद्र बोस यांनीं प्रयोगानें सिद्ध केलें आहे. हा सर्वाभूतीं असणारा प्राण आहे म्हणूनच जगाचें अस्तित्व आहे. तो काढून टाकला म्हणजे जगांत कांहींच नाहीं. भेसूर प्रेतवत स्तब्धता हीच मग उरेल ! जिथें फुलें उमलत नाहींत, तारे चमकत नाहींत, पानें हलत नाहींत, वायु वहात नाहीं, निर्झर आटले आहेत, अशी प्राणशून्य सृष्टि निर्माण करण्याची ईश्वराची इच्छा नाहीं. तेव्हां भावी पिढीचें संगोपन, त्याची काळजी, सर्वांगीण वाढ कशी होईल ह्याची जबाबदारी चालू पिढीवर पडत आहे.

मनुष्याचें आयुष्य, विषय, प्रेम, महत्वाकांक्षा व अखेर अपत्यप्रेम यांतच गुंतून रहात असतें. अपत्य,प्रेम नसतें, संततीची इच्छा नसती तर जगाला, जगांतील कर्तृत्वाला नव्हे, त्याच्या भावी अँस्तित्वाला मोठा पायबंद पडला असता.

## व्यापक स्वार्थ

मनुष्य स्वार्थी आहे हें खरें. पण तो कितीहि स्वार्थी असला तरी त्याचा स्वार्थ त्याच्या स्वतःपुरताच जन्मभर अकुंचित रहात नाहीं. प्रेमामुळें त्याचा स्वार्थ आपोआप विकास पावत असतो. आईबाप, बहिणभाऊ, शेजारपाजार, भाऊबंद, बायको, तिचे आप्तेष्ट, घर, गल्ली, गांव, प्रांत, देश व जग अशी प्रेमाची ज्या मानानें वाढ होत जाईल त्या मानानें त्याचा आत्मिक दर्जा वाढला जातो. असा विकास पावलेला आत्मा तोच महात्मा होय. त्याला सर्व जग हेंच आपलें घर वाटतें, त्याचा आपपर भाव नाहींसा होतो. गांधीजींना महात्मा हें पद याकरितांच मिळालें आहे.

कोणीही अगदीं संकुचित मनाचा असला तरीसुद्धां त्याचें आयुष्य निव्वळ त्याचेचकरितां खर्चत नसतें. जाणूनबुजून नसलें तरी अजाणता तरी तो असंख्यांच्यासाठीं झटत असतो. एकट्यापुरतें घर असें कोण बांधत असतो ? त्याच्या हयातींत सुद्धां पुरें न होणाऱ्या इमारती तो कुणासाठीं बांधत असतो ? आपल्या अमदानींतहि पुरी न होणारीं सार्वजनिक कामें सरकार आपल्या शिरावर कां घेत असतें ? आपल्या जमीनींत झाड लावलेंअसतां त्या झाडाचें फळ आपल्यास मिळणार नाहीं हें जाणून मनुष्य त्याची लावण करीतच असतो. लढाई सुरू झाली म्हणजे स्वतःचा प्राण देऊन तो कुणासाठीं काय मिळवितो ? कुणाच्या सुखासाठीं स्वतःचा प्राण देऊन झटत असतो ? मारवाडी आपली इस्टेट पै पै करून कुणासाठीं सांठवतो ? विम्याचा हप्ता भरून बाप आपल्या मरणानंतर मुलांना पैशाचा आधार करून कां ठेवत असतो ? मनुष्य अमर आहे ही गोष्ट उपदेशांनीं पटत नसूनहि वागणुकींत मात्र तो न कळत त्या तत्त्वानें चालत असतो. आपण अमर आहे अशाच कल्पनेनें तो संपत्ति सांठवत असतो. यावरून मुलांची तरतूद करणें हें मनुष्याचे अंगीं स्वाभाविक आहे. त्याच भावी पिढीकरितां, अमर अशा

प्राणज्योतीकरितां, मुलाकरितां, लग्नसंबंध तुटूं नयेत, म्हणून लग्नबंधनांतील गुलामगिरी काढून तो पवित्र संबंध केला पाहिजे.

## बेलगामी स्वातंत्र्य नको!

" Freedom is not equevalent to immorality and pleasure seaking " —Dr. Iwan Bloch M. D.

स्वातंत्र्य म्हणजे अनीतीला पूर्ण मुभा नव्हे. विषयवासनेला मोकाट सोडण्याकरितां, किंवा वाटेल तो अनाचार करण्याला मोकळीक म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. एकाच्या स्वातंत्र्यांत दुसऱ्याचें पारतंत्र्य असतां कामा नये. एकाच्या स्वातंत्र्योपभोगांत दुसऱ्याला त्रास होतां कामा नये व स्वातंत्र्य म्हणजे स्वेच्छाचाराला सवलत नव्हे. व्यक्तीच्या कल्याणांत समाजाचें कल्याण, समाजाच्या कल्याणांत व्यक्तीचें कल्याण साधलें पाहिजे. याच तत्वाला धरून स्त्री–पुरुषांवर योग्य तीं बंधनें घातलीं पाहिजेत. नीच मनोवृत्तींनीं उद्दीपित झालेल्या नरपशूंच्या वासनांना सवलत देणारें स्वातंत्र्य नको आहे!

आज लग्नबंधनांतील पुरुषांच्या एकांगी व अयोग्य स्वातंत्र्यामुळें स्त्रियांवर गुलामगिरी लादली गेली आहे. ती गुलामगिरी काढून टाकली पाहिजे व मुलासाठीं परस्पर स्वार्थाला आळा घालून भावी पिढीच्या कल्याणासाठीं म्हणजे मुलासाठीं दोघांनींहि व्यक्तिस्वातंत्र्याला थोडा बांध घातला पाहिजे.

## लग्नबंधन व समाजरक्षण.

या समाजाच्या किल्ल्याचा पाया म्हणजे लग्नबंधन होय. तें मजबूत राहील त्या मानानें त्याचा परिणाम पुढील पिढीवर होणार आहे. हा पाया मजबूत रहायचा तर स्त्री–पुरुषांनीं परस्परांकडून होणाऱ्या स्वाभाविक चुकांकडे दुर्लक्ष केलें पाहिजे. क्षुल्लक चुका पोटांत घातल्या पाहिजेत. स्वभावभिन्नता असली तरी मुलासाठीं ती जुळवून घेतली पाहिजे. 'काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर' या गोष्टींवर ताबा ठेवला पाहिजे. आणि तो विशेषतः लग्नबंधन मोडूं नये याकरितां सहिष्णुता वाढवण्याकरितां, ठेवला पाहिजे.

"भय व संशय ही सारीं पापाचीं भावंडें आहेत." संशय कल्लोळाच्या व क्रोधाच्या तडाक्यांत सांपडलेल्या मनुष्यांचे हातून किती अविचारी गोष्टी होत असतात याची कल्पनाच करवत नाहीं. अथेल्लोनें संशयाच्या भोव-

ऱ्यांत निर्मळ अंतःकरणाच्या डेसडिमोनाला मारली तर स्फटिकवत् आचरणाच्या साध्वी सीतेला रामानें त्रास दिला. भलती शंका घेतली. साशंक मनानें साध्वी माउलींचा उगा छळ होतोच पण अशा वासनेनें पछाडलेल्याचे कोण कुत्रे हाल होत असतील त्याची कल्पना इतरांस येणें शक्य नाहीं. तेव्हां स्वतःच्या व कुटंबाच्या स्वास्थ्यासाठीं शंकापिशाचाला नेहमी दूर ठेवावें. परस्परांबद्दल आदर आणि पूर्ण विश्वास असल्याखेरीज संसारगाडा सुरळीत चालणार नाहीं. अशा शंकेखोराच्या घरीं नेहमींच धांगडधिंगा चालत असल्यानें त्यांच्या मुलावर त्याचा दुष्ट परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. Caesar's wife is above suspiciom— सीझरची बायको शंकातीत आहे हें वाक्य नवऱ्यानें नेहमी समोर ठेवावें.

"मत्सर हा मनुष्याचा भयंकर शत्रु आहे. क्रोधाची एक लहर म्हणजे तितका आपल्या चैतन्य शक्तीचा नाश होय"—विवेकानंद.

ग्रीक लोकांत अशी चाल असे कीं, लढाईहून परत आल्यानंतर घरीं जाण्यापूर्वी आपण आल्याचा निरोप पुढें पाठवून मग घरीं पाऊल टाकायचें फ्रेंच लोकांत अशी चाल असे कीं, बायकोचे आप्तेष्ट किंवा मित्र भेटीस आल्यावर आपण तेथें रहावयाचें नाहीं. नवराबायकोमध्यें वितुष्ट येण्याचे प्रसंग टळावेत, गैरसमजामुळें किंवा कांहीं भावनादोषामुळें लग्नबंधन तुटूं नये हाच या चालींत हेतू आहे.

## मातृप्रेमाची ताटातूट.

मूल हें दोघांना जवळ आणणारी प्रेमाची जादू आहे एकमेकांबरोबर भांडणारीं दांपत्यें, अपत्यप्रेमानें जवळ आलीं आहेत. तीं प्रेम करूं लागलीं आहेत.

मुलाला तर लहानपणीं मातृप्रेमाची, अत्यंत आवश्यकता आहे. नवराबायकोची ताटातूट जर स्त्री गरोदर असतांना किंवा बाळंतपणीं झाली तर ती मुलावर एक मोठी आपत्तीच आहे. यावेळीं स्त्रीनें पतीचा आधार टाकल्यास किंवा नवऱ्यानें स्त्रीला टाकल्यास, तो मुलाचा मोठा अपराध केल्यासारखें होणार आहे. समाजाचा मोठा अपराध केल्यासारखें होणार आहे. कारण मूल हें पुढें होणारें नागरिक आहे. राष्ट्राच्या मालकीचें आहे. त्याची हेळसांड होतां कामा नये. परिस्थिति मुलाला चांगलेंवाईट बनवत असते.

नवराबायकोच्या वितुष्टाचा परिणाम त्या मुलावर होत असतो. स्त्रीवर मुलाची मालकी आज कायद्यानें नाहीं. नवऱ्याला सोडल्यास तिच्याबरोबर तिला मुलाला बरोबर घेतां येत नाहीं. तें बापाच्या मालकीचें असतें. सावत्र आई त्या मुलाला आईसारखें बघणें अशक्य आहे. तेव्हां नवराबायकोच्या वितुष्टाचा परिणाम त्या मुलाचें मातृसुख गमावण्यांत होतो. मातृप्रेमाची तर मुलाला अत्यंत आवश्यकता !!

## माता.

मातृप्रेमाची सर जगांत दुसऱ्या कसल्याहि प्रेमांत नाहीं. जनावर स्वतःच्या पोटाखेरीज दुसऱ्या जनावराची केव्हांच पंचाईत करीत नाहीं. पण मातृप्रेम जनावरालाही कांहीं काल स्वार्थत्यागाची शिकवण देऊं शकतें. अपत्यप्रेम जनावरालाही उच्च कोटींत नेऊं शकतें. जिवावर उदार होऊन आपल्या मुलाचें संरक्षण बहुतेक पशुपक्षी करीत असतात. जनावरालाही उच्च कोटींत नेणारें अपत्यप्रेम, मानव कोटींतील स्त्रीस दैवी कोटींत नेण्यास समर्थ नाहीं कां होणार? मातेला आपलें मूल प्राणापेक्षांहि प्रिय असतें. मुलाच्या सुखासाटीं नवऱ्याचा आत्यंतिक त्रास सहन करण्याची ताकत अपत्यप्रेमामुळें स्त्रींत येत असते. देहाचे, मनाचे व पोटाचे हाल सहन करूनहि मुलासाठीं स्त्री कजाग नवऱ्याकडेहि राहण्यास तयार होते. अशा सात्विक दैवी प्रेमापासून मुलाची ताटातूट न व्हावी अशी दांपत्यानें तशीच समाजानेंहि खटपट केली पाहिजे. स्त्रियांचा सहनशीलपणा पुरुषांनीं आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बालसंगोपन हें कमीप्रतीचें, कमीदर्जाचें काम आहे असें पुरुषांनीं व समाजानें समजतां कामा नये. स्त्रीपुरुषांतील कोणत्याहि जबाबदारींत कमी अधिक दर्जा आहे ही भावना काढून टाकली पाहिजे. गृहसाम्राज्यांतील स्वामिनी होणें, पुरुषाच्या सार्वजनिक कामापेक्षां कोणत्याहि प्रकारें हलकें नाहीं. परस्पर सहकार्याशिवाय दोघांचेंहि चालणार नाहीं. द्रव्यार्जन तसेंच बालसंगोपनही दोन्ही महत्वाचीं कामें आहेत.

## परस्पर सहकार्य.

परस्पर सहकार्याशिवाय राज्यशकट चालणार नाहीं. राजा—प्रजा

एकमेकांची सेवा करण्याकरितां आहेत हा संबंध सुटूं लागला, आपण मालक व प्रजा नोकर अशी भावना उत्पन्न झाली कीं, असंतोषास सुरवात होत असते. प्रेमाचे गुलाम हा संबंध जाऊन सत्तेची गुलामगिरी आली म्हणजे ती असह्य होत असते.

चालू युगाला स्वातंत्र्ययुग म्हणतां येईल. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर विशिष्ट वर्गानें व राजानें बहुसंख्य जनतेवर अनियंत्रित सत्ता भोगण्याचा काल आतां आटपत आला आहे. हिंदुस्थानला पारतंत्र्यांत राहणें यापुढें असह्य झालें आहे. स्वातंत्र्याची पवित्र तृष्णा हिंदुस्थानला लागली आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य पाहिजे म्हणजे काय पुरुषवर्गालाच पाहिजे असें नाहीं. तेहतीस कोटी प्रजेंत काय स्त्रियांचा समावेश होत नाहीं?

## मातेची थोरवी

प्रकृति पुरुष संयोगानेंच विश्वाची उभारणी झाली आहे. या स्त्रीपुरुष-मीलनावरच जगाचें अस्तित्व अवलंबून आहे. ईश्वराची जिवंत स्वरूपाची स्त्री पुरुष हीं दोन अंगें आहेत. 'माता पृथिव्याः मूर्तिः' माता पृथ्वीचें स्वरूप आहे. तिच्या प्रेमाची योग्यता कशाबरोबरही करतां येणार नाहीं.

"मातृरूपानें तुम्हाला जन्म देणाऱ्या, पत्निरूपानें तुमची जन्माची सोबतीण होणाऱ्या, कन्यारूपानें तुमच्या उदरीं जन्म घेणाऱ्या तुमच्या आयुष्यांतील तिन्ही अवस्थांत तुम्हाला कोवळ्या प्रेमाची साक्ष पटवून, पुत्र, पति आणि पिता या चढत्या पदवींना नेणाऱ्या स्त्री जातीची किंमत कमी समजूं नका" (पुण्यप्रभाव.) अभिमन्यूला, शिवाजीला, नेपालियन वगैरे वीरांना पाळण्याच्या झोक्याबरोबर वीर रसाचे घोट देणाऱ्या माताच आहेत.

"स्तन पाजितां, निजवितां, हालवितां, बाळकासि खेळवितां ॥
दे बोध, जो सुदुर्लभ थोरासि सहस्र कल्प मेळवितां ॥ मोरापंत.

पुढची पिढी तेजस्वी बनवणें किंवा निस्तेज, निर्वीर्य बनवणें ज्यांच्या हातीं आहे त्यांना गुलाम करणें म्हणजे पुढची पिढी गुलाम बनवणें नव्हे काय? मुलाचा कोवळा जीव मातेच्याच वक्षस्थलावर वाढला जातो. त्याचे पहिले बोबडे बोल माताच बोलवते, त्याचे पहिले अश्रू तिच्याच पदरांनीं पुसले जातात व अखेरचा उसासाही तिच्याच नांवानें टाकला जातो. ती माता

सदृढ, सुशिक्षित व स्वतंत्र असेल तरच पुढील पिढीहि तशी निपजेल. त्यांच्या उन्नतींत आपली उन्नति आहे. त्यांची अधोगति ती आपली अधोगति हें समजायला नको काय? "स्त्रियांची स्थिति सुधारल्यावांचून जगाच्या कल्याणाच्या गोष्टी व्यर्थ आहेत." —विवेकानंद.

तेहतीस कोटी प्रजेंत स्त्रियांचा समावेश आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय स्वराज्याचा पाया टिकाऊ व मजबूत होणार नाहीं.

## हक्क व कर्तव्य

मोक्षप्राप्ती मिळवायची तर मनानें, देहानें व कृतीनें निष्पाप झालें पाहिजे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवायचें तर तें स्वातंत्र्य इतरांनाहि द्यायला पाहिजे. कर्तव्य न करतां हक्क मागत सुटलों तर ते हक्क उपभोगण्याला आपण पात्र ठरणार नाहीं. निम्या लोकसंख्येला तुरुंगांत डांबून टाकून हिंदुस्थान स्वतंत्र कसें होईल? स्वराज्य मागतांना आपल्या घरीं आपल्या स्त्रीला लग्न-बंधनाच्या तुरुंगवासांतून काढून त्या तुरुंगाला प्रेमाचा किल्ला बनविला पाहिजे. स्त्रीला गुलामगिरींतून मुक्त केलें पाहिजे. आपल्याप्रमाणेंच आपल्या स्त्रीला मनोविकार असतात. स्वातंत्र्यलालसा आपल्याप्रमाणें तिच्या ठायींहि असते. ती आपल्यासारखीच माणूस आहे हे विचार लग्नबंधनांत विसरूं नयेत.

स्वराज्य भोगणाऱ्या तरुण पिढीची जोपासना करणाऱ्या स्त्रियाच आहेत. त्यांना गुलाम बनवलें तर त्यांचीं मुलें स्वतंत्र बाण्याचीं कशीं निपजतील? स्वतंत्र विचार त्यांच्या मनांत कसे रुजतील?

तेव्हां पुरुषवर्गानें आपल्या स्वार्थासाठीं म्हणून तरी स्त्रियांना तुरुंगवासां-तून बाहेर काढलें पाहिजे. लग्नबंधन म्हणजे नीच मनोवृत्तींना थोपवून धरणारा बालेकिल्ला झाला पाहिजे. अशा तटबंदींत स्त्रीस्वातंत्र्याचें रक्षण झालें म्हणजे होणाऱ्या स्वतंत्र पिढीला गुलाम करण्याची कुणाला छाती आहे?

स्वातंत्र्यासाठीं तळमळणाऱ्या राजकारणी राष्ट्रभक्तांनीं स्त्रीस्वातंत्र्याबद्दलचेहि महात्माजींचे विचार डोळ्यासमोर ठेवावेत.

"जोंपर्यंत हिंदुस्थानामध्यें स्त्रियांवरील एक रतिभरहि अन्याय कायम राहील अथवा त्यांचे योग्य हक्क उपभोगावयाला मिळणार नाहीत तोंपर्यंत हिंदुस्थानचा खरा उद्धार होणार नाहीं." —महात्मा गांधी.

---

## प्रकरण ८ वें.

### अंतिम ध्येय.

स्त्रियांवर प्रथमपासून गुलामगिरी कसकशी लादत गेलेली आहे, नीतीची कल्पना ही निरनिराळ्या समाजांत कशी बदलली आहे, त्याचप्रमाणें हीं बंधनें कशीं मोडलीं गेलीं आहेत, व हीं मोडलीं असतांना स्त्रियांनाच कसा त्रास झाला आहे. या गोष्टी वाचकांपुढें ठेवल्या आहेत. भावी पिढीसाठीं तरी आपली वागणूक आतां बदलणें किती अवश्य आहे हेंही पुढें मांडलें आहे.

लेखकाचे, वाचनानें व अनुभवानें बनलेले विचार, एखाद्या जिवलग मित्रासमोर कसलाही संकोच न मानता ठेवावेत, तितक्या आपलेपणानें व उघड्या मनानें वाचकांसमोर ठेवले आहेत.

लग्नबंधन दृढतर करणें हेंच लेखकाचें अंतिम ध्येय आहे. पण हें बंधन स्वरुपीचें, प्रेमाचें, व बरोबरच्या नात्याचें असावें. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, बौद्धिक या सर्व प्रकारच्या जुलूमांतून स्त्री मुक्त होऊन दोघा स्वतंत्र वृत्तींच्या जीवांचें हें मीलन व्हायला पाहिजे.

आर्थिक पारतंत्र्यामुळें स्त्रियांच्या सेवेचें आपण मोल करीत नाहीं. त्यामुळें गुलामगिरी आणखी अधिक वाढली आहे. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांनींहीं नोकरी करावी, निराळे पैसे मिळवावेत, आपलं हित नवऱ्यापासून निराळें करावें, असेंच कांहीं नाहीं. आधुनिक संस्कृतीमुळें म्हणजे या यांत्रिक युगानें, असा तुटक स्वतंत्रपणा युरोपियन राष्ट्रांत येऊं लागला आहे. त्यामुळें

तेथें गृहसौख्य नाहींसें होऊं लागलें आहे. यांत्रिक युगानें स्त्री–पुरुषांचा परस्परावलंबीपणा नाहींसा होत चालला आहे. लग्नसंस्थेची जरूरी कमी होत चालली आहे. स्त्रीपुरुष दोघेही स्वतंत्रपणें धंदा करून पैसा मिळवत आहेत. यामुळें लग्नाची आवश्यकता कमी होऊन सहवासापुरतीच एक-मेकांची गरज भासूं लागली आहे. राहण्याची जेवणाची, व विषयसुखाची सोय बाहेर होत असल्यामुळें मुलांची जबाबदारी घेणें बरें वाटत नाहीं. ती जबाबदारी राष्ट्रीय सरकारवर पडली आहे. ( Sweet home ) गृह-सौख्याला अवश्यक लग्नबंधन तुटत चाललें आहे.

अद्याप हा प्रसंग हिंदुस्थानवर ओढवला नाहीं. यांत्रिक संस्कृतीला थोपवून धरणारा महात्मा निर्माण होऊन राक्षसी संस्कृतीला अडवून धरण्या-करितां त्यानें कंबर कसली आहे.

स्त्री–पुरुष हीं समानदर्जाचीं आहेत. एक श्रेष्ठ तर दुसरें कनिष्ठ हा भेद करतां येणार नाहीं. पण ज्या गोष्टी पुरुष आज करत आहेत त्या सर्व गोष्टी स्त्रियांनीं कराव्यात, ते ते धंदे करावेतच असें नाहीं. घड्या-ळांतील यंत्रें कमी अधिक आकाराचीं असलीं म्हणून तीं कमी,अधिक योग्य-तेचीं ठरत नसतात. आपलें ठराविक काम त्या त्या यंत्रानें करावें लागतें. स्त्रीपुरुष समान योग्यतेचीं आहेत पण प्रत्येकांत कांहीं गुणांचा प्रादुर्भाव कमी अधिक आहे. या दोन्ही गुणांचा योग्य मिलाफ होण्यानेंच संपूर्ण लक्षणाचा पुरुष तयार होतो. प्रत्येक पुरुषांमध्यें स्त्रीजातीचे कांहीं गुण व प्रत्येक स्त्रीमध्यें पुरुषाचें कांहीं गुण झांकलेले असतात. स्त्रियांत ते गुण प्रकट झाल्यास त्यांनीं पुरुषांना त्यांच्याच गुणांत पराभव केला आहे. स्त्रीपुरु-षाची अर्धांगी आहे. तसाच पुरुष स्त्रीचा अर्धांग आहे.

"ब्रह्मदेव आपल्या देहाचे दोन भाग करता झाला. एका भागानें तो स्त्री झाला व दुसऱ्या अर्ध्या भागानें पुरुष झाला" मनु. अ. श्लोक ३१.

"Originally every one is a man and woman at the same time.-Hans Von Hattinberg.

म्हणून स्त्री—पुरुष परस्पर सहाय्यक होण्यानेंच ते पूर्ण होत असतात. पुरुषांची महत्वाकांक्षा, स्त्रीचा स्वार्थत्याग. पुरुषाची झगडणारी लढाऊ वृत्ति, स्त्रीची भूतदया व सेवावृत्ति. एकाची बुद्धि तर दुसऱ्याचें हृदय.

पुरुषाचा बेतालपणा, स्त्रीचें आत्मसंयमन व या सर्वांवर ताण करणारें तिचें मातृपद यामुळें ती पुरुषाहून अधिक श्रेष्ठ अधिक पूज्य व वंदनीय आहे.

या पवित्र मातृत्वापासून तिचें पतन होऊं नये अशी समाजानें खबरदारी घेतली पाहिजे. या मातृत्वाचें पवित्र मंदिर लग्नबंधनानेंच अभेद्य होणार आहे. घर ( Home ) माता व मूल यांना आधार म्हणजे लग्नबंधन आहे. तें परस्पर सहाय्यक झालें, प्रत्येकाच्या श्रमाची योग्यता पटली, तर श्रम-विभागणीच्या समतत्वावरच त्या घराची मजबुती राहणार आहे. स्त्री-पुरुषांचे संबंध निव्वळ व्यापारी होणार नाहींत, अशीच संस्कृति आम्हीं पतकरली पाहिजे. पुढल्या पिढीची मदार यावर अवलंबून आहे. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे आर्थिक सहकार्य झालें पाहिजे. दोघांच्या सहाय्यानेंच संस्कृति निर्माण होत असते.

Man builts civilization without, but women is at the bottom providing impetus and encouragement imparting life and harmony ' Tagore.

स्त्रियांना शिक्षण कोणचें असावें हेंसुद्धां त्यांचें त्यांनींच ठरवावें. त्यांच्या कलाप्रमाणें त्यांना योग्य दिसेल त्या धंद्यांत शिरल्यास त्याला पुरुषांनीं अडथळा आणूं नये. त्यांचें ज्या मानानें शिक्षण होईल त्या मानानें त्याचा मुलावर परिणाम होईल. सर्व विषयांतील थोडें थोडें ज्ञान प्रत्येक स्त्रीला असणें अवश्यक आहे. आणि सर्व विषयाकडे दृष्टि ठेवणें स्त्रियांना जितकें सोपें जाईल तितकें पुरुषांनाही जाणार नाहीं. पुरुषाची महत्वाकांक्षा विशिष्ट धोरणानें ठरलेली असते. स्त्रीला प्रपंचांतील सर्व गोष्टी पाहण्याची सवय असल्यामुळें स्त्रिया अधिक व्यवहारी असतात. त्यांना त्या धोरणानें शिक्षण मिळाल्यास लग्नसंबंध अधिक सुखाचें होईल. मातृत्वाची जबाबदारी पार पाडण्याला ती अधिक लायक होईल.

## सुखमय चित्र.

विवाह म्हणजे आयुष्यांतील एक सुखमय चित्र आहे. ध्येयसिद्धीचें आखलेलें चालतें बोलतें बोहलें आहे.

उत्तम चित्रकार नेहमीं आपल्या चित्रामध्यें आपल्या मनांतील मुख्य हेतूला प्राधान्य देऊन इतर वस्तूंना उठाव देत नाहीं. इतर गोष्टी, प्रसंग,

च वस्तू मूळ हेतूला फक्त पुष्टिकारक म्हणून रंगवावयाच्या असतात. त्यांना महत्व दिल्यास चित्राची किंमत नाहींशी होते.

स्त्री–पुरुषांच्या आयुष्यांत 'लग्नबंधन' हें चित्र दोघांनीं रंगवण्याचें असल्यामुळें त्या चित्रावर काळें फांसणाऱ्या गोष्टीस दोघांनीं फार महत्व देतां कामा नये. नाहींतर त्याच गोष्टी प्रामुख्यानें पुढें येऊन चित्राची खराबी होईल. इतर गोष्टींना प्रकाशांत आणतां कामा नये. चित्रकाराचें सर्व कसब मुख्य हेतूला गोंडसपणा आणण्यांत खर्चलें पाहिजे. "लग्न-बंधन' ही एकच गोष्ट प्रकाशमय झाली पाहिजे. प्रेमाच्या पवित्र प्रकाशानें ती सजली पाहिजे. स्वार्थ, मत्सर राग, शंका, मालकी या रंगांत प्रेमी चिताऱ्यांनीं आपला कुंचला बुडवूं नये. बुडवला तरी तो आजूबाजूसच उपयोगांत आणावा तो अशा रीतीनें कीं मुख्य चित्र वाण न होतां त्याला खुलावटच चढेल. चित्रकाराची ही मनोवृत्ति अंगीं बाणली तर आयुष्य म्हणजे एक गोड काव्य नाहीं कां बनणार ?

## सुंदर देखावा.

एकादा सुंदर देखावा आपल्या दृष्टीपुढें आला म्हणजे प्रथम आपली दृष्टि कुठेंच स्थिरावत नाहीं. नदीनाले डोंगर आसपासचीं झाडें झुडपें पदार्थ माणसें जनावरें डोळ्यापुढें येऊन गोंधळ उडतो. पुढें बारकाईनें पाहूं लागल्यावर सटरफटर गोष्टी मागें पडून एखादीच सुंदर गोष्ट, उगवता किंवा मावळता सूर्यनारायण, आकाशांतील एखादीच फुललेली ढगाची कळी, किंवा लांब क्षितिजांत मिळून जाणारी पर्वताची रांग, प्रशांत सरोवरांतील एखादेंच कमल-पुष्प, अशा एखाद्या गोष्टीवर दृष्टि खिळून मनुष्य सृष्टीशीं तन्मय होतो. त्या अखेर गवसलेल्या किल्लीनें त्याची जिवाची तिजोरी खोलली जाते. त्याला आपली ओळख पटते.

## भिन्नतेंत ऐक्य.

सतारीला पुष्कळ तारा असतात. त्या प्रत्येक तारेचा आवाज निरनिराळा चढउतर असतो. त्या प्रत्येकाचें निराळें अस्तित्व असतें. पण त्या सर्व तारांचें सूर एका ठरीवक सुराबरोबर लागतात, त्याचवेळीं त्यांतून कर्ण मनोहर आवाज निघूं लागून श्रोते डुलूं लागतात. अनेक तानांची एक-

तानता होईल त्याच वेळीं वाजवणाऱ्यांचा, गाणाऱ्याचा, ठेका धरणाऱ्याचा व ऐकणाऱ्यांचा एक लय लागतो.

स्त्री–पुरुषांचा ' विवाह ' ही अशाच प्रकारची वीणा आहे. दोघांची स्वभावभिन्नता मिळवून ज्यावेळीं ऐक्याचा सूर निघेल त्याचवेळी जीवित सुखमय होतें. ऐक्याचा सूर निघतांनाही तारा निराळ्याच राहतांत त्यांच्यात अंतर हें रहावेंच लागतें. त्या अगदीं निकट असत नाहींत.

कोणत्याही गोष्टीचा नवीनपणा गेला म्हणजे त्यांतील गोडी कमी होते हा मनुष्य स्वभाव आहे. प्रयत्नांत जें सुख आहे तें प्राप्तींत नाहीं. या स्वभावामुळें कित्येक पुरुष घरच्या नक्षत्रासारख्या बायकाकडे दुर्लक्ष करून बाहेरचे उंबरठे झिजवत असतात. स्त्रीपुरुषांनीं लग्न संबंध कंटाळवाणा होऊं नये म्हणून नाविन्य आणण्याची खटपट केली पाहिजे. एकाच ठिकाणीं, एकाच घरांत एकाच खोलींत व एकाच शय्येवर नेहमी झोपणें चांगलें नव्हे.

Let there be spaces in your togetherness, stand together yet not too near together."—Kahil Gibran

मंदिराला भक्कमपणा, त्याला आवरून धरणाऱ्या खांबामुळें येत असतो पण ते खांब परस्पराशेजारीं असतात पण अगदीं निकटही नसतात. हाच नियम स्त्री पुरुषांनींही पाळणें जरूर आहे. लहानपणीं माहेरीं जाण्याची चाल असते पण पुढें पुढें मोठेपणीं बहुधा स्त्रिया माहेरीं जाणें कमी करतात. याचवेळीं नाविन्याची जरूरी असते. या तात्पुरत्या विरहानें नाविन्य उत्पन्न होतें. या नाविन्यानें बंधन दृढतर होतें. म्हणून लग्नबंधनांत नाविन्य राखण्याचा प्रयत्न करणें दोघांसही सुखावह असतो.

## बंधमुक्तता.

'लग्नबंधन' ही मनुष्याला बंधनातून मुक्त करण्याची शाळा आहे. विचारी मनुष्यानें या दृष्टीनेंच या संस्थेकडे पाहिलें पाहिजे व या दृष्टीनें तिचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

इतःस्ततः वावरणाऱ्या आपल्या चंचलवृत्तींना आवरून त्यांना ठराविक सन्मार्गाच्या रुळावर आणण्याला बंधनाची अवश्यकता आहे. जगांत आपण एकटेंच नाहीं. स्त्रीपुत्र, बापभाऊ, शेजार पाजार, या व्यापक गोता-

चळ्यांत गोवलेला आपण धागा आहोंत याची जाणीव पत्निप्रेमानें आपल्याला मिळूं शकते. जगांत रहावयाचें तर आपल्या एककल्ली एकतंली विचारांना, आपल्या व्यक्तिविषयक आवडी निवडीला, रागालोभाला, हेकेखोर हट्टी स्वभावाला लगाम घालावा लागतो, अशा प्रकारचें शिक्षण ' एकपत्निव्रतानें मिळूं शकतें. मनाला आवरण्याची एकदां सवय लागली, आत्मसंयमनांत मनुष्य निढावला म्हणजे देहावरचा ताबा ठेवून मनाचा विकास करणें सोपें जातें. ज्या मानानें मनाचा विकास होईल त्या मानानें मनुष्य महात्मा होत असतो.

भवसागरांत ढकललेल्या होडीला निश्चित मार्गाकडे नेण्याची स्त्रीपुरुष हीं दोन वल्हीं आहेत. स्त्री ही त्याला खालीं ओढणारी नसून सहाय्यकच आहे. व्यवहारांत आलेल्या संकटांना तोंड देऊन नीच वासनेला पाया-खालीं तुडवून परस्परांस हात देणारीं हीं ईश्वराचीं लेकरें आहेत. त्यांच्या प्रेमाच्या जोरावर ते नवी सृष्टि निर्माण करूं शकणार आहेत. कवि ओमर खय्याम म्हणतात.

" लाडके नशीबानें उचल खाल्ली तर या जगाची उलथापालथ करून आपण आपल्या मनाजोगी नवी सृष्टि नाहीं कां निर्माण करणार ? " मनांत आल्यास प्रत्येकाला अशी इच्छित सृष्टि निर्माण नाहीं कां करता येणार ? हें नशीब आपल्याच हातीं आहे. "

अशी इच्छित सृष्टि निर्माण करायची तर दोघांनींही तें ध्येय गाठण्याचा निर्धार केला पाहिजे. चुका सहन करण्याची शक्ति राखायची तशीच दोघांनीं आपआपल्यामधील दुर्बलता काढून टाकण्याचीही पराकाष्ठा केली पाहिजे. ज्या मानानें ही दुर्बलता कमी होईल त्या मानानें एकपत्नि-व्रताचें ( monagamy ) ध्येय पाळणें हेंच बरें वाटेल. हें बंधनच अखेर सुखदायी होईल. पतिपत्नीची योग्य जोडी जमल्यानंतर, त्यांत पावित्र्य हें साहजिकच उत्पन्न होतें. या पवित्र बंधनांतच मनुष्याची खरी बंधमुक्तता आहे.

---

# नव्या पिढीचें राजकारण

### लेखक—माधव खंडेराव बागल

## अभिप्राय ( सारांशानें )

**ज्ञानप्रकाश, पुणें**—समाजसत्तावादी पंथाच्या कार्यक्रमाचें विवेचन मराठींत इतक्या सुबोध रीतीनें दिलेलें आमच्या तरी पाहण्यांत नाहीं.

**नवाकाळ, मुंबई**—खऱ्या सत्यशोधनाच्या या इषाऱ्याचें 'नामधारी सत्यशोधकांनीं' व भांडकुदळांनीं अनेकवार मनन करावें आणि त्यांतील 'अहिंसा शांति व समता' इत्यादि विश्वबंधुत्वाचीं उच्च व उदार तत्वें आपल्या हृदयपटलांत कोरून ठेवून त्याप्रमाणें आपले विचार, उच्चार व आचार यांना वळण लावण्याचा प्रयत्न करावा म्हणजे देशाच्या भाग्योदयास कालावधि लागणार नाहीं.

**चित्रमय जगत्, पुणें**—इषारा अंतर्भेदी आहे व राजकारण सखोल व विचारप्रवर्तक आहे. उतारे वेचक, मार्मिक व स्थलानुरूप असल्यानें लेखकाच्या बहुश्रुततेचा प्रत्यय येतो. पुस्तक नवविचारलिप्सु तरुणांना मार्गदर्शक होईल.

**हुतात्मा श्रद्धानंद**—हिंदुसंघटनेच्या यच्चयावत् अभिमान्यासहि पुस्तकांतील प्रकरणें वाचनीय व विवेचनीय झालीं आहेत. विचार, पक्षपातानें बहुधा अलिप्त असून एकंदरींत फार उदात्त आणि हितप्रद आहेत. कामकऱ्या शेतकऱ्यापासून तो अस्पृश्यवर्गापर्यंत सर्वांच्या चिरंतन कल्याणाची कळकळ पानापानांतून प्रकटत आहे.

**तरुण भारत, बेळगांव**—पुस्तक सुंदर आहे. सोपें आहे. ठिकठिकाणीं विखुरलेलीं सुंदर अवतरणें पाहून हा छोटा ज्ञानकोशच आहे असें वाटूं लागतें. विवेचन प्रायः निर्दोष आहे. कांहीं प्रकरणें इतकीं सुंदर आहेत कीं तीं पुनः पुनः वाचावीं असा मोह वाचकाला होतो.

**जागृति, बडोदा**—प्रस्तुत परिस्थितींत हें पुस्तक म्हणजे सत्यशोधकांची गीता होण्यास पात्र आहे.

**दीनबंधु, पुणें**—माधवरावांची ओजस्वी भाषासरणी व अंतःकरणांतील कळकळ पुस्तकांतून ओतप्रोत ओथंबलेली दिसते. यांतून प्रत्येक व्यक्तीस कांहीं तरी नवीन सांपडेल.

**कर्मयोगी, सोलापूर**—भाषा सहज व अनलंकृत पण जोरदार, मांडणी तर्कशुद्ध व साधार व पाल्हाळरहित अशी आहे. एकंदरींत ग्रंथ अत्यंत मननीय झाला आहे. म्हणून या ग्रंथाबद्दल अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे.

**महाराष्ट्र नागपूर**—चर्चा मार्मिक आणि सणसणीत असून सत्य-शोधक समाजाची सुधारणा व्हावयाला पुस्तकानें चांगली मदत होईल.

**दीनमित्र, अहमदनगर** —लेखकाची एक प्रकारची लोकहितविषयक तळमळ क्षणोक्षणीं दृग्गोचर झाल्यावांचून रहात नाहीं.

**चिकित्सक, बेळगांव**—पुस्तकानें समाजाच्या वाङ्मयांत बहुमूल्य भर घातली आहे एवढेंच नव्हे, तर बहुजनसमाजास उलगडण्यास गहन अशीं अर्थशास्त्रांतील कोडीं सहज आणि साध्या भाषेत सुंदर रीतीनें सोड-वून त्याचा राज व समाजकारणांशीं किती अन्योन्य संबंध आहे हें सप्र-माण दाखवलें आहे.

**विजयी मराठा, पुणें**—सत्यशोधक समाजाच्या तत्वाचें राजकीय, सामा-जिक व आर्थिक दृष्टीनें विवेचन करणारें सोशियालिझमचें (समाजसत्ता वादाचें ) विवरण करणारें सत्यशोधकांना नवी दृष्टि देणारें असें हें क्रांति-कारक पुस्तक आहे.

**जनता, नागपूर**—लेखक स्वतः सत्यशोधक समाजाचे पुरस्कर्ते असूनही त्यांनीं त्या समाजास इषारा दिला आहे. यावरून ते क्रांतिकारक कटु दिसत असले तरी सत्य आहेत व त्यांनीं सत्यशोधकांना खऱ्या कर्तव्याची जाणीव करून दिली आहे.

**ऐक्य, सातारा**—तत्वविवेचन या दृष्टीनें हें लेख खरोखरी वाचनीय असून सत्यशोधक समाजाचें ध्येय व्यापक असल्याची जाणीव करून देण्याचा हा प्रयत्न निःसंशय स्तुत्य आहे.

**वसुंधरा, मुंबई**—पुस्तक केवळ सत्यशोधकासाठीं नसून राजकीय घडा-मोडींत ज्या शेतकऱ्याचें स्वराज्य स्थापन करण्याचें कांग्रेसचें ध्येय आहे, त्या ध्येयाला पोषक अशा हेतूनेंच सर्वसामान्य वाचकांसाठीं लिहिलें आहे.

**विजयी भारत, इसलामपूर**—पुस्तक वाचून झाल्यावर श्री. बागल यांनीं सत्यशोधकाच्या विचारसृष्टीवर अभिनव विचाराचें नवीन मन्वंतर सुरू केलें आहे असें वाटल्याचून रहात नाहीं.

**पुरुषार्थ, औंध**—नव्या पिढीच्या व नव्या वळणाच्या राजकारणांत काम करण्यासाठीं आपली तयारी कशी करावी तें स्पष्ट व जोरदार शब्दांनीं सांगितलें आहे.

**प्रगति आणि जिनविजय**—खऱ्या सत्यशोधकांना आपल्या कार्याची भरीव दिशा ठरवण्यास पुस्तक मार्गदर्शक होईल.

**परीक्षक, बेळगांव**—प्रदर्शित केलेले विचार सर्वांना मान्य होण्यासारखे नसले तरी ते सर्वांनींच विचार करण्यासारखे आहेत. पण आपल्या देशाच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन बोलशेव्हिझमचें भूत कोणीही अज्ञ बहुजन समाजांत सोडून देणें योग्य नव्हे, असा इषारा देणें आम्हास योग्य वाटतें.

**प्रगति, मुंबई**—समाजसत्तावादाची बहुतेक तत्वें ग्रंथकारांनीं स्वीकारलीं आहेत. फक्त बोलशेव्हिकाप्रमाणें वर्गकलहाचें तत्व त्यांना इष्ट दिसत नाहीं किंवा सर्व समाजाची उलथापालथ करण्याची त्यांची तयारी नाहीं.

**केसरी, पुणें**—समतेच्या तत्वाचा पुरस्कार केव्हांही तारतम्यानेंच करावा लागतो. नाहींपेक्षां विद्वानाविरुद्ध अविद्वानास, श्रीमंताविरुद्ध गरीबास सावकाराविरुद्ध शेतूकऱ्यास चिथावणी दिल्याप्रमाणें होऊन सर्वच जोड्या खड्ड्यांत पडतील हा इषारा आम्हांस द्यावासा वाटतो.

**सुबोध पत्रिका-मुंबई**—सत्यशोधन करणारा मग तो कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा असो त्याला सदरहू पुस्तकांत नमूद केलेली विचार सरणी पसंत पडल्याशिवाय राहणार नाहीं. समाजसत्तावादाचीं तत्वें लेखकाला मान्य आहेत पण वर्ग कलहाची ते तरफदारी करीत नाहींत.

**उदय, नागपूर**—हैदोस धुडाची तरफदारी या पुस्तकांत केलेली असाव असा पुस्तकाच्या नांवावरून ग्रह होतो; तो वाचनानंतर नाहींसा झाल्याशिवाय रहात नाहीं. भाषा चटकदार पण प्रकरणें सोपीं सुटसुटीत असून वाचतांना मुळींच कंटाळवाणें वाटत नाहीं.

**महादेव शास्त्री दिवेकर व प्रभाकर हरी खाडिलकर**—सत्यशोधक व ब्राह्मणेतर या नांवाशीं गेल्या दहा बारा वर्षांत ब्राह्मणद्वेषाचा अविभाज्य वाटला जाणारा संबंध जोडला गेला होता तसा तो नाहीं असा

४६११

विश्वास या पुस्तकाच्या वाचनानें झाला आहे. त्या मताच्या भूमिकेचा पुरस्कार या पुस्तकांत केला आहे त्या मताच्या भूमिकेची सर्वांनाच आवश्यकता आहे.

**दक्षिण महाराष्ट्र, सांगली**—नव्या पिढीचे गळीं असलें क्रांतिकारक राजकारण उतरविण्याचा प्रयत्न लेखकानें केला नसता तर बरें......तरुण भावनाप्रधान वाचकांची मात्र या पुस्तकानें दिशाभूल होणार आहे. हल्लींच्या परिस्थितींत पुस्तकांतील वेदांत यत्किंचितही उपकारक होईल असें वाटत नाहीं.

**बलवंत, रत्नागिरी**—लोकसेवेचें कंकण हातीं बांधून काय करणाऱ्या कोणाही पुढाऱ्याला आपल्या चळवळीच्या ध्येयाचें सुकाणू सोशियालिझम-कडे वळवणें भाग पडतें. या दृष्टीनें पुस्तक विशेषतः नवीन पिढीला अवश्य वाचनीय आहे. पुस्तकाची भाषा रचना आणि विवेचनपद्धति व्यवस्थित आहे.

**भारतमाता,** इसलामपूर—माधवराव बागल यांची ओळख आमच्या या प्रांतांत पुष्कळ असून, त्यांनीं गेल्या वर्षातील व्याख्यानें याच विचार-सरणीनें दिलीं होतीं. ... उपदेश करणारे ब्राह्मणे-तरांत व सत्यशोधक ... शभक्त होत असें म्हट-ल्यास गैर होणार ... सत्यशोधकास नसून सर्व हिंदी जनतेस आहे.

REFBK-0004612

**संस्थानी स्वराज्य, पुणें**—लेखनपद्धति उच्च दर्जाची असून भाषा साधी पण आकर्षक आहे. नव्या पिढीचें राजकारण कोणच्या तऱ्हेचें असावयास पाहिजे याचें उत्तम प्रकारें दिग्दर्शन केलें आहे.

**प्रो. शंकरराव जावडेकर**—यांतील विचार सत्यशोधक समाज, ब्राह्म-तर जनता व एकंदर महाराष्ट्र यानें ग्रहण केल्यास महाराष्ट्राच्या कर्तृत्वास योग्य दिशा लागून त्याच्या चालू इतिहासास नवें वळण लागेल. विशेषतः गांधींचा अहिंसावाद व कम्युनिझम् यांची जी जोड या पुस्तकांत दृष्टीस पडते. ती माझ्या मतें फार महत्वाची आहे.

**शंकरराव देव** ( स. स्वराज्य–पुणें )—आपण प्रगट केलेले उदात्त सा व खोल विचार गांनीं आम्हां सर्वांना आपणाला फार निकट बन-वलें अ हे वि ार आचारांत उतरविण्यासाठीं कांहीं संघटनात्मक कार्य